
३० वें

अंक

# श्रीसाईलीला



ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर १९५३

# श्रीसाई लीला 'त्रैमासिक' मिळण्याचीं ठिकाणें

(१) श्री. बाबुराव डी. बागवे,
चीफ एजंट, खटाव बिल्डिंग, गिरगांव नाका, मुंबई ४.

(२) श्री. बोवलेकर, दादर बी. बी. स्टेशन समोर, मुंबई.

(३) श्री. सावळाराम खंडू दांगट, बोरीबंदर, मुंबई.

(४) श्री. इ. आर. मालपेकर,
दागिन्यांचें दुकान, जितेकर चाळ, ठाकूरद्वार, मुंबई २.

(५) श्री. भाऊ मोरोबा ठगे,
टोप्यांचे व्यापारी, ठाकूरद्वार, मुंबई २.

(६) मेसर्स मनोहर बुक डेपो,
गोखले सोसायटी लेन, पोयबावडी, परेल, मुंबई १२.

(७) मेसर्स ठकार आणि कंपनी,
कोहिनूर सिनेमा समोर, रानडे रोड, दादर, मुंबई २८.

(८) धी बॉम्बे बुक डेपो, गिरगांव. मुंबई ४,

(९) मेसर्स सारंग बुक डेपो.
मुनीम हाऊस, चिंचपोकळी, मुंबई १२.

(१०) मेसर्स दातार आणि पुरोहित,
वैद्यवाडा, बॉम्बे रोड, ठाणें.

(११) मेसर्स मंगला वस्तु भांडार,
अहिल्याबाई चौक, कल्याण.

(१२) पनवेल न्यूज पेपर स्टॉल, पनवेल.

(१३) श्री. भाऊसाहेब लोंबर,
४०७/४०८ बुधवार पेठ, पुणें २.

(१४) श्री साईप्रसाद मिना फोटोचा कारखाना.
३३६, बुधवार पेठ, पुणें २.

(१५) नाडकर्णी आणि कं.
खेळाच्या वस्तूंचे व्यापारी, धोबीतलाव, मुंबई, २.

(१६) श्री बाबुराव अण्णाराव चौघुले,
२५२ ठळकवाडी, बेळगांव.

(१) साईलीला 'त्रैमासिक' अंक इतर अनेक ठिकाणीं विक्रीस ठेविले जातात, पण जागेच्या अभावी त्यांचीं नांवें दिलीं नाहींत.

(२) बाहेरगांवीं एजंट्स नेमणें आहे, तरी मुंबई ऑफिसच्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

---

[महत्त्वाची दुरुस्ती–पृष्ठ ४९ वर लेखकाचें नांव चुकून खंडेराव ज. त्रिकोलेकर असें पडलें आहे. तें 'खंडेराव स. त्रिलोकेकर' असें वाचावें–संपादक]

दादर भागांत फॅशनेबल व टिकाऊ शिलाईचे कपडे
व्यवस्थित व किफायतशीर दरानें शिवून मिळण्याचें

: प्रख्यात ठिकाण :

## –रावळ टेलरिंग फर्म–

मोहमद बिल्डिंग, चित्रा सिनेमाजवळ, व्हिन्सेंट रोड,
दादर, मुंबई १४

## RAWAL TAILORING FIRM

TAILORS & OUTFITTERS

Mohamad Building (Near Chitra Cinema)
Vincent Road, Dadar, Bombay 14

FOR BEST STYLES AT MODERATE RATES
BOOK YOUR ORDER FOR DASSERA--
DIWALI FESTIVALS

## जाहिरातींचे दर

| | कव्हर पेज २ रें–३ रें | कव्हर पेज ४ थें | आंतील पान |
|---|---|---|---|
| पूर्ण पान एकाच वेळेस | रु. ६० | रु. ७५ | रु. ४० |
| अर्धे ,, ,, ,, | रु. ३५ | रु. ४० | रु. २५ |
| ¼ ,, ,, ,, | रु — | रु. — | रु. २५ |
| पूर्ण पान एक वर्षाकरितां | रु. २०० | रु. २५० | रु. १३५ |
| अर्धे ,, ,, ,, | रु. १२० | रु. १३५ | रु. ८५ |
| ¼ ,, ,, ,, | रु. — | रु. — | रु. ५० |

वि. सू.:–जाहिरात देतेवेळीं ५ टक्के आगाऊ पाठविण्याची विनंती




संगीत, नृत्य, शिल्प, साहित्य आणि चित्र—यांपैकीं कुठल्याहि उच्च कलाकृतींत एक प्रकारची तालबद्धता असते, एक लय असते, एक ठेका असतो !

यथार्थ चित्रदर्शनासाठीं—

# डी. डी. नेरॉय

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स
अँड ऑफसेट प्लेट मेकर्स, स्टीरियो टाइपर्स
अँड कॅलेंडर मॅन्युफॅक्चरर्स

५३४ सँडहर्स्ट ब्रिज
चौपाटी
मुंबई *

: टेलिफोन :
७१०५७

: शाखा :
नं. १९ 'कमलराज'
गणेशवाडी,
फर्ग्युसन कॉलेज रोड,
पुणें नं. २

[ स्थापना १९२१ ]

गेलीं सतत ३२ वर्षें सोन्या–चांदीचें, जड जवाहिराचें मनपसंत काम करून जनतेच्या विश्वासास पात्र झालेल्या आमच्या दुकानास, लग्नांत लागणाऱ्या दागिन्यांसाठीं अवश्य भेट द्या, आणि मनपसंत घाटदार, सुंदर दागिने तयार करून घ्या.

अगर

घाटदार, सुंदर तयार असलेल्या दागिन्यांतून आपल्या पसंतीची निवड करा.

●



## आमच्या दुकानीं

श्री साईबाबांच्या सोन्याचांदीच्या सुंदर मूर्ती, आंगठ्या, लॉकेटस्, फ्रेमसहित फोटो व पूजेचीं चांदीचीं भांडीं, देव्हारे, सिंहासनें तयार मिळतात.

◆

लग्न, मुंज आणि वाढदिवस, या शुभ प्रसंगीं भेट देण्यालायक सुंदर व सुबक वस्तू नेहमीं तयार असतात.

●

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ

ठाकुरद्वार, मुंबई २

ता. १ जानेवारी १९५४ ला प्रसिद्ध होईल !

# निर्णयसागर पंचांग

## शके १८७६

सतत ऐशीं वर्षे निर्णयसागर पंचांग बहुजन समाजास अत्यंत मान्य झालेलें आहे. धर्मशास्त्र व दृक्प्रत्यय यांचा मेळ असलेलें सूक्ष्म गणित यासाठीं हेंच पंचांग सर्वत्र वापरतात.

शेंकडा १८ रुपये. एका प्रतीस ४ आणे

१००० प्रतींस रु. १७० ५०० प्रतींस रु. ८९

## सन १९५४ चें निर्णयसागर कॅलेंडर

यांत बँक हॉलिडेज, महत्त्वाचे हिंदु सण, प्रमुख तिथ्या वगैरे नित्योपयोगी माहिती दिली असून, तें जनतेंत अति उपयुक्त असें ठरलें आहे.

शेंकडा १८ रुपये. १ प्रतीस ४ आणे.

इतर पुस्तकांसाठीं कॅटलॉग मागवा.

## निर्णयसागर प्रेस,

२६–२८ कोलभाट स्ट्रीट, मुंबई नं. २

(टे. नं. २२२९०)



# श्रीसाई लीलामृत

गोष्टीरूपांत संस्थान कमिटीतर्फे श्रीसाईनाथ पुण्यतिथीच्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध झालें. या पुस्तकांत श्री साईबाबांचीं व त्यांच्या निरनिराळ्या वास्तव्याच्या जागेचीं छांयाचित्रें आहेत.

किंमत फक्त रु. २ आहे. ट. ख. निराळा.

## श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीस असलेलीं पुस्तकें

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित | (मराठी) | किंमत | रु. | ७–०–० |
| (२) | सच्चरित | (इंग्रजी) | ,, | ,, | ४–०–० |
| (३) | दासगणूकृत श्रीसाईनाथ–स्तवनमंजरी | | ,, | ,, | ०–२–० |
| (४) | ,, | (अध्याय ४) | ,, | ,, | ०–८–० |
| (५) | सगुणोपासना | | | | ०–३–० |
| (६) | प्रधानकृत पुस्तक (इंग्रजी) | | ,, | ,, | १–०–० |
| (७) | श्री साई लीलामृत | | ,, | ,, | २–०–० |
| (८) | श्री साई सुमनांजली | | ,, | ,, | ०–३–० |

वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील:—

(१) हेड कारकून, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान,
पोस्ट–शिरडी, जि. अहमदनगर.

(२) श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, मुंबई ऑफिस
२५, बँक स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.

# MATUNGA CLEANING WORKS

ESTD. 1934. *Prop.* S. V. PRADHAN

MODI NIWAS, BOMBAY 19

Washers, Dyers and Dry Cleaners.

A Pleasure to you—a Satisfaction to us

**Chemical Cleaners, Super Fine Darners**

**Master Dyer**

*FOR*

**Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths**

सर्व तऱ्हेच्या कपड्यांची धुलाई, रंग व रफू काम

व्यवस्थित करणार

## मा टुं गा क्ली निं ग व र्क्स

( स्थापना १९३४ ) मालक : एस्. व्ही. प्रधान

मोदी निवास, मुंबई १९



# स्वदेशी ट्रंक फॅक्टरी अँड शॉप

मालक : महादेव विनायक इंदूलकर

आमच्या फॅक्टरींत हरतऱ्हेच्या मजबूत व टिकावू ट्रंक्स, साध्या व हॉस्पिटल्साठीं लागणाऱ्या कॉटस् , पाळणे, तसेंच होल्डॉल्स् , लेदर सूट केसीस, छत्र्या, रेनकोटस तयार होतात

घाऊक व किरकोळ मार्केट भावानें खालील ठिकाणीं मिळतात.

| | | |
|---|---|---|
| (१) सरकारी तबेला | (२) फॅक्टरी | (३) विजयनगर |
| २५२, गिरगांव | भवानीशंकर रोड | बी. बी. स्टेशन समोर |
| मुंबई ४ | दादरकर वाडी, मुंबई १४ | दादर, मुंबई २८ |

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी, या संस्थेनें चालविलेलें

# श्रीसाई लीला त्रैमासिक

संपादक

श्री. नागेश आत्माराम सावंत

व्यवस्थापक

श्री. रामचंद्र महादेव राणे

साहाय्यक मंडळ

श्री. वसंतराव नारायण गोरक्षकर

प्रो. गोपाळ वामन भागवत, एम्. ए.

श्री. बाळकृष्ण सखाराम पाताडे

श्री. कृष्णराव जयराम भट

वार्षिक वर्गणी
रु. २-४-० (ट. ख. स.)

फिरकोळ अंक
दहा आणे

# अनुक्रमणिका


| अ. नं. | विषय | लेखकाचें नांव | पृष्ठांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | श्रीसाई-वाक्सुधा | | ७ |
| २ | प्रिय वाचक | संपादकीय | ८ |
| ३ | श्रीसाईबाबांचा ३५ वा पुण्यतिथि-उत्सव | | ११ |
| ४ | बाबांची लीला | आमचे प्रतिनिधि | १४ |
| ५ | श्रीसाईनाथ-स्तोत्र | रा. गो. जोशी | ३५ |
| ६ | चमत्कार खरे कीं खोटे ? | ल. स. त्रिलोकेकर | ३६ |
| ७ | 'श्रीसाईलीलामृत' (प्रस्तावना) | ना. आ. सावंत | ४० |
| ८ | श्रीसाईनाथ-माहात्म्य | मि. रा. पेडणेकर | ४४ |
| ९ | संतांचे उपकार | सौ. लीलाबाई ज. पुरंदरे | ४५ |
| १० | गुरुकृपेनें वासनाजय | पुरुषोत्तम मराठे | ४८ |
| ११ | जीवन-सृष्टींतील मार्गदर्शक | वा. ह. शिंदे | ५२ |
| १२ | शिरडी-वृत्त | | ५४ |
| १३ | बाबा ! अतुल आहे तुमचा प्रभाव | कु. मनोरमा कृ. भट | ५९ |
| १४ | स्फूर्तीच्या ठिणग्या | | ६० |


## श्रीसाईलीला मासिकासंबंधीं


* श्रीसाईलीला त्रैमासिकाचे अंक दर वर्षी मार्च, जून, सप्टेंबर व डिसेंबर या महिन्यांत ३० तारखेस प्रसिद्ध होतात.
* फिरकोळ अंकास दहा आणे.
* वार्षिक वर्गणी ट. ख. सह रु. २-४-०
* वर्षारंभ जानेवारीपासून असला तरी वर्गणीदार कोणत्याही महिन्यापासून होतां येतें.
* मागणी केल्यास वर्षारंभापासूनचे अंक शिल्लक असल्यास पाठविले जातात.
* वर्गणी मनिऑर्डरनें 'संपादक, श्रीसाईलीला त्रैमासिक कार्यालय, २५ बँक स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १' या पत्त्यावर पाठवावी.
* या मासिकांत प्रामुख्यानें धार्मिक व तत्त्वज्ञानात्मक स्वरूपाचेच विषय येतात.
* आलेले लेख प्रसिद्ध करणें अगर न करणें व त्यांत जरूर तो फेरबदल करणें याबद्दल सर्व हक्क संपादकांकडे आहेत.

—संपादक

# श्रीसाई लीला



## श्री साई वाक्सुधा

[ वांद्रें येथील सुप्रसिद्ध साईभक्त कै. श्री. रामचंद्र तखड ह्यांच्या सौभाग्यवती शिरडी येथें खाणावळींत जेवणास बसल्या असतां तेथें एक भुकेनें व्याकुळ असें कुत्रें आणि चिखलांत माखलेलें डुक्कर आलें. बाईनें त्या भुकेनें व्याकुळ झालेल्या प्राण्यांस पानांतील एक एक भाकर दिली. बाई खाणावळींत आणि श्रीसाईमहाराज मशिदींत! परंतु सर्वसाक्षी श्रीसाईबाबांस हा प्रकार अज्ञात नव्हता. भोजनोत्तर बाई मशिदींत दर्शनास जातांच श्रीसाईबाबांनीं बाईस केलेला सुंदर उपदेश. ]

आई ! माझे प्राण भुकेनें आज व्याकुळ झाले होते. अशा वेळीं तूं मला जें प्रेमानें जेवूं घातलेंस त्या अन्नाच्या गोडीनें माझें पोट आकंठ भरलें ! तूं जेवणास बसली असतां तुझ्याकडे क्षुधेनें पीडित असें कुत्रें आलें. त्याचा आणि माझा आत्मा एकच आहे बरें ! त्याचप्रमाणें ज्या चिखलांत माखलेल्या डुकराची तुला दया आली त्याच्याशीं सुद्धां माझी एकात्मता आहे ! त्या प्रेमाच्या भाकरी खाऊन मीं निर्भर तृप्त झालों असून अजूनही मला त्या तृप्ततेचे ढेंकर येत आहेत ! असेंच नेहमीं करीत जावें. हेंच एक आपल्या कामास येईल. सर्वांभूतीं मला पाहून अशीच माझी दया जाणावी. आधीं भुकेल्यास भाकर द्यावी, मग आपण सेवावी हें भूतदयेचें तत्त्व नीट जीवीं साठव. मी कधीं कुत्रें, कधीं डुक्कर, कधीं माशी, कधीं गाई, कधीं जलचर अशा अनेक रूपानें वावरतो. सर्व भूतमात्रांत मीच आहे, ह्या अभेद बुद्धीनें माझी सेवा करणारा भक्त माझ्या पांच प्राणांपेक्षांही मी प्रिय मानतो. नेहमीं ह्या सर्वात्मक भावानेंच माझी भक्ति करीत जावी.

( श्रीसाईसच्चरित, अध्याय ९ )

# प्रिय वाचक—

श्रीसाईलीलेचा चालू वर्षाचा हा अखेरचा अंक. यंदां साईलीलेची जबाबदारी मजकडे आली तेव्हां ती कशी काय माझ्याकडून पार पडते याबद्दल मी साशंक होतों. परंतु श्रीसाईकृपेनें आणि लेखक वाचकांच्या प्रेमळ साहाय्यानें आकर्षकता आणि वाचनीयता या दोन्ही गुणांत हें त्रैमासिक उत्तरोत्तर सरस होत गेलें आहे. अंक अधिकाधिक चांगले निघत गेले असल्याचें अनेक वाचकांनीं पत्ररूपानें वा प्रत्यक्ष कळविलें, त्यामुळें आम्हांला या कामाचा अधिक हुरुप आला. त्रैमासिक सर्वांगसुंदर करण्यासाठीं व्यवस्थापक श्री. रा. म. राणे यांनीं जी मेहनत घेतली तिला खरोखरी तोड नाहीं. दिवसांतला कोणताहि क्षण त्यांनीं स्वतःचा असा मानला नाहीं, आणि त्रैमासिकाचें कसलेंहि काम जातीनें करण्यांत त्यांनीं कसूर केली नाहीं. त्रैमासिकाचें जें यश आहे त्यांत त्यांच्या श्रमाचांच फार मोठा वांटा आहे असें मला कृतज्ञतेनें नमूद केलें पाहिजे. साहाय्यक मंडळांतील श्री. वसंतराव गोरक्षकर, प्रो. गो. वा. भागवत, श्री. बा. स. पाताडे व श्री. कृ. ज. भट यांनींहि वेळोवेळीं केलेल्या साहाय्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. श्रीसाईबाबांच्या कृपेनें सश्रद्ध व चिकित्सक अशा सर्व वाचकवर्गाच्या मायेची पाखर या त्रैमासिकावर सदैव राहो आणि साईबाबांची अधिकाधिक सेवा या रूपानें आमच्या हातून घडो.

× × ×

येत्या जानेवारीस अखिल भारतीय साईभक्त संमेलन भरावयाचें आहे. प्रथमतः हें संमेलन शिरडी येथें ता. २०, २१ व २२ नोव्हेंबरला भरणार असें निश्चित करण्यांत आलें होतें. नंतर या तारखा सोयीच्या न आढळल्यानें तें जानेवारीपर्यंत पुढें ढकलावें लागलें. आतां तें शिरडीस न भरतां मुंबईस भरणार असल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे.

या संमेलनाच्या निमित्तानें डिसेंबरचा साईलीलेचा अंक हा खास संमेलन–अंक म्हणून काढण्याचा संकल्प होता. परंतु त्यासाठीं प्रसंगोचित पुरेसें साहित्य वेळेवर हातीं न आल्यामुळें तो बेत सोडून द्यावा लागत आहे. गेल्या अंकीं या विशेषांकाचा संकल्प आम्हीं जाहीर केला होता. पण तो पुरा होऊं शकत नसल्यानें वाचकांचा जो अपेक्षाभंग होईल त्याबद्दल मला दिलगिरी वाटते.

श्री. रॉय किणीकर यांच्या संपादकत्वाखालीं 'द्वारकामाई' नांवाचें साप्ताहिक गेल्या १० डिसेंबरपासून सुरू झालें आहे. बाबांचा संदेश घरोघर जाण्यास या

साताहिकाचा बहुमोलाचा उपयोग होईल. मी या साताहिकाला अंतःकरणपूर्वक सुयश इच्छितों.

× × ×

श्रीसाईलीलेसाठीं जे लेख येतात त्यांमध्यें अनेकदां आम्हांला आमच्या दृष्टीनें इष्ट ती काटछाट करणें भाग पडतें. पृष्ठसंख्येची मर्यादा लक्षांत घेऊन अनेकदां मूळ लेखांतला कांहीं भाग कापणें आवश्यक असतें. हें करतांना लेखाचा आशय आणि लेखांत ज्यावर विशेष भर दिलेला असतो तो मुद्दा यांना धक्का लागणार नाहीं अशी मी काळजी घेत असतों. पण लेखामध्यें अशा रीतीनें केलेली काटछाट अनेक लेखकांना स्वाभाविक आवडत नाहीं आणि ते त्यामुळें रुष्ट होतात. याबाबतींत आमच्या अडचणी लेखकांनीं ध्यानीं घ्याव्या अशी माझी त्यांना नम्र विनंती आहे. एखाद्या लेखांतील एखादा भाग मी कमी करतों तेव्हां तो चांगला नसतो असा त्याचा मुळींच अर्थ नाहीं. परंतु चांगला असला तरी लेख प्रमाणाबाहेर वाढूं नये एवढ्याच कारणासाठीं तो कापणें नाइलाजानें अपरिहार्य ठरतें. श्रीसाईलीलेंत चांगले चांगले लेख अधिकाधिक देतां यावेत यासाठींच कांहीं उत्कृष्ट लेखहि फार मोठे वाटल्यास कमी करावे लागतात. हें ध्यानीं घेऊन लेखकांनीं याबाबत रोष न बाळगतां आमच्याशीं सहकार्य करावें अशी माझी नम्र प्रार्थना आहे. सामान्यतः साईलीलेसाठीं पाठवावयाचा लेख दोन हजार शब्दांहून मोठा असू नये व तो एकाच बाजूलाच लिहिलेला असावा. चालू वर्षांत अनेक नामवंत लेखकांनीं श्रीसाईलीलेला लेखन साहाय्य केलें आहे. तें ते पुढेंहि चालू ठेवतील अशी मला आशा आहे.

× × ×

श्रीसाईबाबांचा नामघोष दिवसेंदिवस अधिकाधिक घुमघुमूं लागला आहे. बाबांच्या जीवनचरित्राकडे जनतेचें लक्ष अधिकाधिक प्रमाणांत जाऊं लागलें आहे. साहित्याला वाहिलेलीं मासिकेंहि साईबाबांचें चरित्र वर्णन करणारे खास अंक काढूं लागलीं आहेत. बाबांच्या जीवनकथेवर आधारलेला चित्रपट निघणार असल्याच्याहि जाहिराती येऊं लागल्या आहेत.

बाबांच्या जीवनाचा जनमनावर पडत असलेला हा वाढता प्रभाव पाहून त्याचा अयोग्य फायदा घेण्याचे प्रकार कुठेंकुठें चालू झालेले कानांवर येऊं लागले आहेत. शिरडीहून उदी आणून, अथवा इतर कोणती तरी साधी रक्षा ही उदी आहे असें भासवून भाविकांना ती विकण्याचे प्रकार सुरू झाले असल्याचें आढळून येऊं लागलें आहे! बाबांची कृपा होण्याला मध्यस्थाची गरज नाहीं, 'एजंटा' ची जरूरी नाहीं, हें जनतेनें ध्यानीं घ्यावें. निष्ठापूर्ण भक्ति व आर्त प्रार्थना एवढ्याच गोष्टींची बाबांना जरूरी आहे. 'आर्तत्राण' हें बाबांचें ब्रीद आहे. त्यांना मनःपूर्वक शरण जावें. यापलीकडे कोणा मध्यस्थाकडून बाबांची कोणत्याहि स्वरूपांत कृपा 'विकत' मिळूं

शकणार नाहीं. ही गोष्ट अत्यंत उघड असूनहि पैशाच्या मोलानें प्रत्येक गोष्टीचें मोजमाप करणारे संसारी जीव, त्याच मोलानें बाबांची कृपा संपादन करूं पाहतात. पण बाबांच्या भक्तीचा हा मार्ग नव्हे, हें मला कटाक्षानें सुचवावेंसें वाटतें.

गेल्या अंकीं एका वेडाचाराचा मीं उल्लेख केला होता. त्याबद्दलहि आज पुन्हां एकदां लिहावेंसें वाटतें. 'मी लिहिल्याप्रमाणें नऊ पत्रें लिहून नऊ जणांना पाठवा, म्हणजे साईबाबांची तुमच्यावर कृपा होईल; नाहीतर त्यांचा कोप होईल' अशा आशयाचीं काडें कोणाच्या तरी पत्त्यावर पाठविण्याचें एक खूळ हल्लीं सुरू झालेलें आहे. अनेक वृत्तपत्रांच्या कचेरींतहि अशीं पत्रें जाऊं लागलीं आहेत व हा काय प्रकार आहे, अशी आमच्याकडे पुष्कळांकडून विचारणा होऊं लागली आहे. हा प्रकार म्हणजे निर्मळ खुळेपणा आहे आणि बाबांच्या भक्तीचा यांत यत्किंचितहि संबंध नाहीं. भीति वाटून अशीं काडांची सांखळी पुढें चालू ठेवण्याचा घाबरट प्रकार कोणी करूं नये. धमकी देऊन देवाची भक्ति वाढत नसते. बाबांना भक्तांची प्रीति हवी आहे, भीति नको. जिथें प्रीति असते तिथें भीतीचा लवलेश आढळणार नाहीं, व जिथें भीति आहे तिथें प्रीतीचा ठावठिकाणा असणार नाहीं. बाबांच्या कृपेचा बाजार मांडणारे आणि त्यांच्या कोपाचा धाक घालणारे अशा दोन्ही तऱ्हेच्या समाजकंटकांपासून खऱ्या भक्तांनीं दोन हात दूर राहावें हें चांगलें.

—संपादक

* प्रभु रामचंद्राच्या इच्छेला आपण संपूर्ण शरण गेलों म्हणजे देहबुद्धि नष्ट होते आणि आपल्या अंतर्यामीं वास करणाऱ्या व बाह्य जग व्यापून राहिलेल्या रामाशीं आपण एकरूप झालों आहोंत, त्याच्याशीं तादात्म्य पावलों आहोंत असा आपल्याला अनुभव येतो. या स्थितींत, भिन्नत्वाची जाणीव निर्माण करणारा द्वेष लुप्त होऊन जातो आणि या स्थितींतच दिव्य प्रेमाचा-एकरूपत्वाचा अनुभव ही काय चीज आहे याचा साक्षात्कार होतो.

—स्वामी रामदास

साँच बराबर तप नहीं, झूठ बराबर पाप ।
जाके हिरदे साँच है, ता हिरदे हरि आप ॥

—कबीर

भावार्थः—सत्यासारखें दुसरें तप नाहीं. असत्यासारखें दुसरें पाप नाहीं. ज्याच्या अंतःकरणांत सत्य आहे त्याच्या हृदयांत ईश्वराचा वास आहे, असें समजावें.

# शिरडी येथें साजरा झालेला
# श्रीसाईबाबांचा ३५ वा पुण्यतिथि–उत्सव

आधुनिक संतचूडामणी श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज, शिरडी जि. अहमदनगर यांचा ३५ वा पुण्यतिथि–उत्सव सालाबादप्रमाणें, संस्थान व्यवस्थापक समितीतर्फे शिरडी येथें शनिवार ता. १७–१०–५३ ते सोमवार ता. १९–१०–५३ पर्यंत तीन दिवस मोठ्या थाटामाटांत आणि उत्साहानें साजरा झाला. यंदा दसऱ्याला जोडूनच रविवार आल्यामुळें नोकरपेशाच्या साईभक्तांना अनायासेंच दोन दिवस सुट्टी लाभली होती; आणि तिला जोडूनच कांहींजणांनीं आगेमागें सुट्ट्या घेतल्यामुळें उत्सवासाठीं शिर्डीस येणाऱ्या बाहेरगांवच्या भक्त लोकांची गर्दी गुरुवारपासून सुरू झाली. व्यवस्थापक समितीतर्फे समाधिमंदिरावर व देवळांतहि विजेच्या दिव्यांची सुंदर रंगीबेरंगी रोषणाई केली होती आणि रस्त्यावर ठिकठिकाणीं शोभिवंत कमानी व तोरणें उभारलीं होतीं.

अशा आनंदमय, पवित्र व उत्साहाच्या वातावरणांत उत्सवास ता. १७–१०–५३ रोजीं सुरवात झाली. अगदीं सकाळपासूनच जिकडे पहावें तिकडे भक्त लोकांच्या रांगाच रांगा व समुदाय दिसू लागले. स्नानाच्या ठिकाणीं तर फार गर्दी होती. मंदिरांत जाऊन पहावें तर तें भक्त लोकांनीं नुसतें फुलून गेलें होतें. नेहमीप्रमाणें श्रींचें मंगलस्नान झालें. भक्तांचा तो प्रचंड समुदाय पाहून प्रत्यक्ष महासागरच श्रींस मंगलस्नान घालण्यास आला आहे कीं काय असें वाटे. अनेक भाविक भक्तांनीं कोपरगांवाहून शिर्डीस येतांना वाटेंत उतरून गंगेचें (गोदावरी नदी) पाणी आपल्याबरोबर आणलें होतें व त्यानें श्रींस स्नान घातलें. या वेळेस बाहेर सनईचा सुस्वर आवाज चालू होता. तसेंच चौघडा, ताशे, वाजंत्री, बँड वगैरे वाद्येंहि वाजत होतीं. नंतर भक्तांचे अभिषेक सुरू झाले. याच सुमारास सुमारें ८॥–९ वाजतां भिक्षा मागण्याचा कार्यक्रम झाला. संस्थानचे व्यवस्थापक विश्वस्त श्री. नागेशराव सावंत हे प्रमुख भिक्षेकरी होते. श्री. द. व. राणे, श्री. रा. म. राणे, श्री. देव या व्यवस्थापक समितीच्या पदाधिकाऱ्यांनीं, तसेंच इतरहि बऱ्याच साईभक्तांनीं यांत अत्यंत आपुलकीनें भाग घेतला होता. ही भिक्षेची मिरवणूक वाद्यांच्या गजरांत व साईनामाचा जयजयकार करीत गांवांतून फिरली व अनेक ठिकाणीं भिक्षा गोळा करून सुमारें १० वाजतां समाधिमंदिरांत येऊन विसर्जन झाली. नंतर भजन, गाण्याचे कार्यक्रम झाले. श्रींची महाआरती झाली. व नंतर तीर्थ-प्रसाद वांटण्यांत आला. दुपारीं व्यवस्थापक समितीचे एक विश्वस्त श्री. श्री. बा. देव यांचें सुंदर कीर्तन झालें. कीर्तनास बरीच गर्दी जमलेली होती व बरेच लोक रंगलेले

दिसत होते. नंतर संध्याकाळीं शिलंगणाची मिरवणूक झाली. रात्रीं श्रींच्या रथाची मिरवणूक निघाली. मिरवणुकींत बँड, डफडे, चौघडा वगैरे वाद्यें वाजत होतीं. या मिरवणुकींत भाग घेण्यासाठीं व श्रींची सेवा करण्यासाठीं म्हणून मुंबईचे सुप्रसिद्ध 'श्रीकृष्ण बँड पथक' मुद्दाम आलें होतें. त्यांचें बँड-वादन उत्तम प्रतीचें होतें. रथ-मिरवणुकीस अलोट गर्दी होती. रथ भोजनगृहाजवळ आल्यावर तेथें गारुड माकडाचे ११२ कार्यक्रम झाले व रथ देवळासमोर गेला. त्यानंतर शेजारतीचा कार्यक्रम झाला. रात्रौ संस्थान कचेरी-समोरील भव्य पटांगणांत मुंबईच्या सुप्रसिद्ध रंगविलास नाटक कंपनीनें आपल्या 'सिकंदर' नाटकाचा प्रयोग उत्तम करून साईभक्तांची व त्याचबरोबर श्रींची अत्यंत गोड सेवा केली.

दुसरे दिवसाचा (ता. १८-७-५३) नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त विशेष कार्यक्रम म्हणजे शनिवारप्रमाणेंच याहि दिवशीं भिक्षेचा कार्यक्रम झाला. या मिरवणुकीचें ठिकठिकाणीं फोटो घेण्यांत आले. त्यानंतर समाधि-मंदिरांत श्री. देव यांचें 'पुण्यतिथि'-दिनानिमित्त कीर्तन १२॥ पर्यंत झालें. नंतर पुण्याचे महापौर श्री. गणपतराव नलावडे यांचे हस्तें श्रीसाईबाबा संस्थानतर्फे प्रकाशित झालेल्या 'श्रीसाईलीलामृत' ग्रंथाचा व श्री. म. द. जोशी यांच्या 'कैलासनाथाच्या कुशींत' या पुस्तकाचा उद्‌घाटन-समारंभ झाला. या प्रसंगीं संस्थान व्यवस्थापक समितीचे एक विश्वस्त श्री. बाजीराव पाटील, दु. चिटणीस श्री. हरिभाऊ शेळके व सन्माननीय चिटणीस श्री. द. ब. राणे यांची भाषणें झालीं. पुष्कळांना 'श्रीसाईसच्चरित' हा ७ रुपयांचा ग्रंथ विकत घेतां येत नाहीं. तेव्हां मध्यम व गरीब वर्गीय लोकांना थोडक्या पैशांत बाबांचें अधिकृत चरित्र वाचा-वयास मिळावें या हेतूनें 'श्रीसाइलीलामृत' या ग्रंथाचे प्रकाशन संस्थाननें केलें. बाबां-वरील भक्तीनें प्रेरित होऊनंच या ग्रंथाचे लेखक श्री. प्र. सुं. आगासकर यांनीं हा ग्रंथ लिहिला आहे.

त्यानंतर आरतीचा कार्यक्रम झाला व तीर्थप्रसाद वांटण्यांत आला. ह्याच सुमारास भोजनगृहांतील तळमजल्यावरील एका खोलींत बाबांचा श्राद्ध-विधि चालू होता. ह्यास आराधनाविधि म्हणतात. हा विधि कसा केला जातो ह्याचें समग्र वर्णन मागील महिन्याच्या (सप्टेंबर १९५३) श्रीसाईलीला त्रैमासिकांत आलेंच आहे. हा विधि अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीप्रमाणें करण्यांत आला. श्राद्धास १६ ब्राह्मण बसविले होते. यंदा संस्थान विश्वस्तांपैकीं एक विश्वस्त श्रीपाद बाळकृष्ण देव यांनीं हा विधि समस्त साई-भक्तांतर्फे केला. या आराधना-विधीप्रीत्यर्थ रात्रौ मंदिरांत मंत्र-जागर करण्यांत आला. रात्रौ पालखीची मिरवणूक वाद्यांचे गजरांत निघाली. नंतर शेजारतीचा कार्यक्रम न होतां या दिवशीं मंदिरांत रात्रभर जागर करण्यांत आला. या प्रसंगीं अनेक नामवंत कलावंतांनीं भाग घेऊन श्रींची भक्तिपूर्वक सेवा केली. या प्रसंगीं गायन, वादन, नृत्य, नकला, तंतुवाद्य वगैरेंचे सुश्राव्य व मनावेधक कार्यक्रम झाले.

तिसरे दिवसाचा कार्यक्रम म्हणजे श्रींच्या समाधीस प्रथम मंगल स्नानाचा. पुढें नित्याचे कार्यक्रम होऊन काल्याचा कार्यक्रम झाला. या प्रसंगीं श्री. देव यांचें कीर्तन झालें. नंतर दही-हंडी वगैरे फोडण्यांत येऊन प्रसाद सर्वांस वांटण्यांत आला व मग आरतीचा कार्यक्रम होऊन उत्सवाची समाप्ति झाली.

या उत्सवास भक्त लोकांची जरी अलोट गर्दी लोटली होती तरी त्या सर्वांची राहण्याची वगैरे सोय संस्थाननें चांगल्या रीतीनें केली. भक्तांनींहि उत्तम प्रकारें सहकार्य केल्यामुळें ह्या वेळेस तक्रारी अथवा फारशा गाजल्याच नाहींत. उत्सवास मुंबई, पुणें, नगर, भुसावळ, सोलापूर, बेळगांव, हैद्राबाद, हुबळी, बंगलूर, मद्रास, विजापूर, धारवाड, तसेंच सुरत, अहमदाबाद, राजकोट, नागपूर, कलकत्ता वगैरे लांब लांबचे लोक आले होते. दुसऱ्या दिवशीं पाऊस पडल्यामुळें संस्थानतर्फे भक्त लोकांस राहण्यासाठीं उभारण्यांत आलेल्या तंबूंत पाणी शिरलें, परंतु संस्थाननें तंबूंत राहण्याऱ्या सर्व भक्तांची सोय त्वरेनें दुसरीकडे केल्यामुळें ह्या भक्त लोकांची बरीच गैरसोय व त्रास टळला. उत्सवाचे तिन्ही दिवसांत संस्थानतर्फे बाबांच्या कपड्यांची व चांदीच्या वस्तूंची लिलांव रूपानें विक्री झाली. अनेक साईभक्तांनीं या वस्तू बाबांचा प्रसाद म्हणून विकत घेतल्या.

या उत्सवास श्री. ना. आ. सावंत, श्री. द. ब. राणे, श्री. वि. शा. कीर्तिकर, श्री. रा. म. राणे, श्री. श्री. बाळकृष्ण देव ही मंडळी मुंबईहून व श्री. बाजीराव पाटील, श्री. रामचंद्र दादा पाटील व श्री. हरिभाऊ शेळके ही स्थानिक मंडळी व्यवस्थापक मंडळातर्फे हजर होती. या सर्वांनीं उत्सवाची जातीनें देखरेख ठेवली. स्वयंस्फूर्तीनें स्वयंसेवकाचें काम करून व्यवस्था ठेवण्याच्या कामीं कांहीं भक्तांनीं कमिटीस मदत केली. पोलीस बंदोबस्त उत्तम होता. संस्थानतर्फे सॅनिटेशनची व्यवस्थाहि उत्तम प्रकारें ठेवण्यांत आली. मंदिरांतील कार्यक्रम दूरवर ऐकूं जावेत म्हणून खास दूर-ध्वनिक्षेपकाची व्यवस्था करण्यांत आली.

ज्या साईभक्तांनीं, कलावंतांनीं, व इतर अनेकांनीं व्यवस्थापक समितीशीं सहकार्य केलें व बाबांची सेवा करून हा उत्सव आनंदमय वातावरणांत साजरा केला त्या सर्वांची व्यवस्थापक समिति आभारी आहे. श्रीसाईबाबा सर्व साईभक्तांचें कल्याण करोत

* * *

* या पृथ्वीतलावर मानवी जीवनवृक्षावर अत्यंत दुर्मिळ अशीं फुलें मधून मधून फुललेलीं आढळून येतात. प्रेम आणि सेवा यांचा सुगंध आपल्या आसमंतांत पसरवावा आणि जगताला सुखाचा ठेवा प्राप्त करून द्यावा, एवढाच या फुलांच्या अस्तित्वाचा एकमेव हेतु असतो. हीं फुलें कोणतीं ? जगाच्या इतिहासांत भिन्न भिन्न काळीं आणि भिन्न भिन्न स्थळीं अवतार घेणारे साधुसंत, हीं तीं फुलें होत !

—स्वामी रामदास




संकलकः—आमचे प्रतिनिधि

## १ चांदीच्या पणत्यांचा नवस

श्री. जीमी एन्. कथावाला ( फायरवूड ॲंड चारकोल मर्चंट आणि कमिशन एजंट, सय्यदपुरा, आगाची वाडी, सुरत ) ह्या पार्शी गृहस्थांनीं साईबाबा आपल्या नवसास कसे पावले याची हकीगत खालील अनुभवांत सांगितली आहे. ते म्हणतातः

'बाबांची माहिती मला तशी पुष्कळ दिवसापासून आहे. माझे घरांत व दुकानांत बाबांचे फोटोही आहेत. परंतु त्यांच्यावरील माझी दृढ श्रद्धा व भक्ति खालील प्रसंगामुळेंच वाढली हें निश्चित.'

'१९५१–५२ सालची गोष्ट. माझा धंदा तोट्यांत चालत होता. नुकसान फार येऊं लागलें. अनेक प्रयत्न करूनहि धंदा सांवरेना. तेव्हां मीं बाबांस नवस केला कीं, 'बाबा, जर माझा धंदा आपण भरभराटींत आणून मला ऊर्जित काल दाखविलात तर शिर्डीस मी आपले दर्शनास येईन व चांदीच्या पणत्या, त्यांत तूप व वात घालून आपणांपुढें लावीन आणि त्या आपणांस ( उज्वलतेच्या व भरभाटीच्या निदर्शक म्हणून ) अर्पण करीन.' ह्या नवस केल्यानंतर माझ्या प्रयत्नांस यशच येत गेलें व माझा धंदा भरभराटीस आला. मी शिर्डीस ता १५–६–५२ रोजीं आलों व नवस फेडला. श्रीसाईबाबा नवसास पावतात यांत शंकाच नाहीं.'

× × ×

## २ कळकळीच्या प्रार्थनेचें फळ

श्रीबाबांची आपणांस कशी माहिती झाली व त्यांचेवर पूर्ण निष्ठा ठेवून सबूरी धरल्यामुळें आपला खालावलेला मोटारधंदा परत भरभराटीस कसा आला याची हकीगत श्री. भाऊ रामचंद्र वैशंपायन (वैशंपायन वाडा, ११७ नारायण पेठ, पुणें नं २) यांनीं आपल्या खालील अनुभवांत सांगितली आहे.

'१९३० सालची गोष्ट. त्यावेळेस मी खेड येथें ( पुणें जिल्ह्यांतील मंचर जवळील ) रहात होतों. माझा मोटारचा धंदा होता, व खेड ते पुणें अशी सर्व्हिस होती. त्यावेळेस मजजवळ एकच गाडी होतीः परंतु ती चालविणेंही मला जड जात होतें. धंदा बसला होता व अगदीं हलाखीची परिस्थिती होती. कर्ज वाढत चाललें होतें.



मोठी कृपाळू ही मशीदमाई । भोळ्या भाविकांची ही आई ।। कोणी कसाही पडो अपायीं । करील ही ठायींच रक्षण ।।

अशा स्थितींत एक दिवस खेडहून पुण्यास मोटार घेऊन आलों. मांबुडें स्टँडवर मोटार उभी केली. त्यावेळेस माझे एक मित्र श्री. दादासाहेब फडतारे तेथेंच होते. त्यांनीं मला बाबांची माहिती सांगितली आणि म्हणाले, 'शिर्डीस चल.' मजजवळ फक्त ३ रुपये होते व तेवढ्या पैशांत शिर्डीस जाणें शक्य नव्हतें. अल्पकाळांत जास्त पैशाची व्यवस्थाहि करणें कठीणच होतें. परंतु श्री. फडतारे यांनीं स्वखर्चानें मला शिर्डीस नेलें. मीं क्लीनरला मोटार संभाळण्यास सांगितलें व त्याप्रमाणें त्यानें तीन दिवस मोटार सांभाळली. इकडे आम्ही साईबाबांचें दर्शन व्यवस्थित घेतलें. फार समाधान लाभलें. तिसरे दिवशीं आम्ही परत पुण्यास गेलों. पुढें मी दर गुरुपौर्णिमेस शिर्डीस येऊं लागलों.

अशीं तीन चार वर्षें लोटलीं, परंतु धंद्यांत कांहीं फरक होईना; जणूं कांहीं श्रीबाबा माझी परीक्षाच पहात होते. १९३५ सालीं नेहमींप्रमाणेंच शिर्डीस मी गुरुपौर्णिमेस आलों. बाबांची कळकळीनें प्रार्थना केली. दुसरें दिवशीं पहांटे ३ च्या सुमारास मला एक स्वप्न पडलें. स्वप्नांत बाबा शेतकऱ्याच्या रूपानें आले. अंगानें तेजःपुंज, धोतर गुंडाळलेलें, हातांत काठी आणि डोक्यास फडकें असा त्यांचा वेष होता. ते मला म्हणाले, 'बच्चा तुम नीति अच्छा रखो. तुमारे लिये हम अल्लाके पास प्रार्थना करते हैं. तुमको अच्छे दिन आयेंगे' एवढें बोलले आणि बाबा नाहींसे झाले. मीहि लगेच जागा झालों. बाबा कुठें गेले म्हणून पाहूं लागलों. परंतु ते दिसलेच नाहींत. कारण त्यांनीं मला स्वप्नांतच आशीर्वाद दिला व स्वप्नांतच ते नाहींसे झाले होते. लगेच मी मंदिरांत गेलों व बाबांचे समाधीस अनन्यभावानें नमस्कार केला.

या दृष्टांतानंतर माझ्या परिस्थितींत चांगला पालट पडला. कर्ज वगैरे थोड्याच दिवसांत नाहींसें झालें आणि १९४० सालापासून तर धंद्यांत माझी भरभराटच होत गेली. हल्लीं माझें स्वतःचें घर पुण्यास आहे व माझ्या मालकीच्या टॅक्सी आहेत. सर्व दृष्टीनें हल्लीं मी सुखी आहे. अनन्य भावानें केलेल्या प्रार्थनेस बाबा साद देतात, यांत शंकाच नाहीं; मात्र निष्ठा आणि सबुरी पाहिजे.

× × ×

## ३ बाबांचे अनाकलनीय मार्ग

आपले आई-वडिलांस श्रीसाईबाबांनीं येथें कसें बोलावून घेतलें व त्यांची निष्ठा पहाण्यासाठीं बाबांनीं कशी परीक्षा घेतली याची एक जुनी आठवण श्री. बाळा पिलाजी गुरव ( संस्थान नोकर शिर्डी ) यांनीं खालीं सांगितली आहे.

'शिर्डीपासून ३ मैलांवर कोऱ्हाळें म्हणून एक गांव आहे. आम्ही मूळ तेथील राहणारे. १९१२ सालची गोष्ट. त्यावेळेस मी १३।१४ वर्षांचा होतों. एके बुधवारी रात्रीं माझे आईस स्वप्न पडलें. वडिलांसही त्याच दिवशीं स्वप्न पडलें. आईचे स्वप्नांत बाबा आले त्यांनीं आईला ८ आणे दिले व सांगितलें कीं हें तुझ्या पैशांत टाक तुला बरकत येईल. नंतर आईजवळ एक धुडकें मागितलें. वडिलांच्याही स्वप्नांत बाबाच आले होते. बाबांनीं माझ्या वडिलांस सांगितलें कीं, तूं शिर्डीस ये तुला अर्धी भाकर नक्की मिळेल.

'दुसरे दिवशीं राहत्याच्या बाजाराला माझे वडिल व मी गेलों होतों. त्याच वेळेस बाबांचे एक निस्सीम भक्त कै. तात्या पाटील कोते यांचे दिवाणजी (नथुभाऊ जाधव) हेहि बाजारालाच आले होते. त्यांनीं माझे वडिलांची मुद्दाम गांठ घेतली व शिर्डीस पाटलांनीं बोलावलें आहे असा निरोप सांगितला. तेव्हां शुक्रवारीं माझे वडील शिर्डीस आले व त्यांनीं पाटलांची गांठ घेतली. 'तुला बाबांच्या येथें सनई वाजवायला यायला पाहिजे' असें पाटलांनीं सांगताच माझे वडिल त्या गोष्टीस आनंदानें कबूल झाले व नंतर १।२ दिवसांत आम्ही सर्वच येथें आलों व माझ्या वडिलांनीं लगेच आपल्या कामास सुरवात केली. अशा रीतीनें बाबांनीं दिलेल्या दृष्टांताचा आम्हांस ताबडतोब प्रत्यय आला.

'परंतु १।२ दिवसांतच माझ्या आई-वडिलांच्या चेहऱ्यावर चिंतेची छाया पसरली. माझे वडील बाबांचे समोर वाजवायला गेले म्हणजे बाबा त्यांना रोज शिव्या देत. सनईचा आवाज ऐकला रे ऐकला.कीं बाबा शिव्या देत म्हणायचे, 'गुरवड्या, मला सनईतून शिवी देत जाऊं नकोस.' परंतु बाबांच्या या बोलण्याकडे माझ्या वडिलांनीं लक्षच दिलें नाहीं व ते आपलें काम करीतच राहिले. पुढें कांहीं दिवसांनीं संध्याकाळीं फेरीच्या वेळेला माझे वडिल सनई वाजवत असतांना बाबा एकदम संतापाचे भरांत माझ्या वडिलांना म्हणाले, 'गुरवड्या, तूं मला नेहमीं सनईतून शिव्या देतोस, थांब' व त्यांनीं रागानें माझे वडिलांस वीट मारली. ती वीट माझे वडिलांना लागली खरी, परंतु आश्चर्याची गोष्ट अशी कीं त्या विटेमुळें आपणांस मार बसला आहे असें त्यांना वाटलेंच नाहीं. पण ह्या प्रकारानें माझे वडिल घाबरले व ते पळायला लागले. तेव्हां बाबाहि त्यांचे मागें धांवले आणि म्हणाले, 'गुरवड्या, थांब; मी तुला मारीत नाहीं. उभा रहा.' तेव्हां माझे वडिल उभे राहिले. तोंच बाबा धांवत आले आणि त्यांनीं माझे वडिलांचा अंगरखा गुंडीजवळ घट्ट धरला व म्हणाले, 'मीं तुझ्या बापाचे काय खाल्लें ? कां मला सनईतून रोज रोज शिव्या देतोस ? पहा, मी खोटें बोलत नाहीं.' आणि नंतर एकदम लालबुंद होऊन त्वेषानें म्हणाले, 'तुला येथें गाडीन व तुझ्या पोरालाहि येथेंच गाडीन. तूं काय समजलास !' आणि नंतर लगेच सोडून दिलें.

'रात्रीं आमचे वडिल काकासाहेब दिक्षितांकडे नेहमीप्रमाणें गेले. तेथें बाबांच्या फोटोची आरती होत असे व माझे वडिल त्या वेळेस सनई वाजवीत.त्यांनीं काकासाहेबांना सर्व हकिगत सांगितली व म्हटलें, 'काकासाहेब, आतां बाबांच्यापुढें सनई वाजविण्याची मला भीति वाटते तर आतां कसें काय करावें ? बाबांच्या वागण्याचा किंवा बोलण्याचा आम्हां कोणास उलगडा होत नाहीं तेव्हां काकासाहेब लगेच म्हणाले, अरे ह्यांच्यांत भीतीचें काय कारण आहे ? बाबा तुमची निष्ठा पहात आहेत तुला येथें गाडीन व तुझ्या मुलालाहि येथें गाडीन, असें जें बाबा म्हणाले त्याचा अर्थ म्हणजे तुझी व तुझ्या मुलाची सोय मी शिर्डीतच करीन व तुम्हांला शिर्डीत कांहीं कमी पडणार नाहीं. त्यामुळें तूं व तुझा मुलगा सुखासमाधानानें शिर्डीतच आपली जीवनयात्रा घालवाल. व येथेंच आपलें

आयुष्य संपवाल. तेव्हां काळजीचें कांहींच कारण नाहीं. उद्यांपासून तुम्ही आनंदानें बाबांच्यापुढें सनई वाजवण्यास जा.

'आणि खरेंच दुसरें दिवशीं माझे वडिल हंसतमुखानें बाबांचे पुढें सनई वाजवूं लागले. बाबांनीं एकदां माझ्या वडिलांच्या चेहऱ्याकडे पाहिलें आणि मग त्यांचाही चेहरा हंसरा झाला त्यानंतर बाबांनीं माझे वडिलांना कधीहि त्रास दिला नाही. माझे वडिल सुखासमाधानानें येथेंच वारले व आजही मी संस्थानच्या नोकरींत असून सुखासमाधानानें कालक्रमणा करीत आहें.

तेव्हां बाबांच्या शिव्या म्हणजे सुद्धां एक प्रकारचा वर असें जें म्हटलें जातें त्याचा प्रत्यय आम्हांस अशा रीतीनें आला.'

× × ×

## ४ बाबांची भक्ति करणारा बैल

श्री. आर्. एस्. ट्रेसी [तालमाकी वाडी १६।८ ताडदेव रोड, मुंबई नं. ७] हे बाबांचें दर्शनास शिर्डीस वारंवार येतात. बाबांना ते शंकराचा अवतार समजतात व त्या दृष्टीनें ते बाबांना भजतात. आणि आपण शंकराचेंच अवतार आहोंत याबद्दलची खात्रीहि श्रीबाबांनीं आपल्या या भक्तास नुकतीच पटवून दिली. याबद्दलचा त्यांनीं सांगितलेला अनुभव खालीं देत आहे.

'गेल्या वर्षी बाबांच्या पुण्यतिथीस [सप्टेंबर १९५२] ज्या वेळेस समाधि-मंदिरावर सुवर्ण कळस चढविण्यांत आला त्या प्रसंगीं मी मुद्दाम हजर होतों. लेंडीबागेच्या दरवाजाकडे जातांना विद्युत्गृहासमोर ज्या १२ समाध्या लागतात त्यांपैकीं एका समाधीजवळ उभा राहून मी हा सोहळा पहात होतों. तेथें आणखीहि कांहीं माणसें हा प्रसंग पाहण्याकरितां उभीं होतीं. इतक्यांत एक मोठा बैल तेथें आला. हा बैल शिर्डीस जाणाऱ्या साईभक्तांच्या परिचयाचा आहे. हा बैल बाबांना अर्पण केला असल्याचें बोललें जातें. तो रोज द्वारकामाईत जाऊन तेथील पायऱ्यांजवळ उभा राहून बाबांपुढें मान वाकवून नमस्कार करतो असें म्हणतात. तेव्हां हा बैल तेथें आलेला पाहतांच माझें कुतूहल जागृत होऊन हा पुढें काय करतो हें जाणण्याची उत्सुकता लागली. तो बैल तेथेंच उभा राहिला. आजूबाजूस बरेच लोक होते, पण त्या सर्वांचें लक्ष कळस चढविण्याच्या प्रसंगाकडेच होतें. कोणीहि कुतूहलानें त्या बैलाच्या हालचालींकडे पहात नव्हतें.

'मी मात्र त्या बैलाच्या हालचालींकडे बारकाईनें पहात होतों, आणि ज्या वेळेस त्या बैलाचेंहि लक्ष कळसाकडेच आहे हें माझ्या लक्षांत आलें त्या वेळेस मला फार आश्चर्य वाटलें. ज्या क्षणीं सुवर्ण कळसाची स्थापना होऊन वाद्यें वाजूं लागलीं त्याच क्षणीं तो बैल खालीं आपल्या गुडघ्यावर बसला आणि नमस्कार केल्यागत मान वांकवून

लगेच उभा राहिला. या घटनेचें मला फार फार आश्चर्य वाटलें व मीं आजुबाजुच्या लोकांस याबाबत विचारलें. पण ते म्हणाले कीं, आमचें या गोष्टीकडे लक्षच नव्हतें, आम्ही कळसाकडेच पहात होतों.

'मला मात्र असें वाटतें कीं, बाबांना मी शंकराचा अवतार समजत असल्यामुळें आपण खरोखरच शंकराचे अवतार कसे आहोंत हें बाबांनीं लीला दाखवून या प्रसंगानें मला पटवून दिलें.'

× × ×

## ५ दत्ताच्या देवळाची कथा

शिर्डीपासून १६ कोसांवर संगमनेरजवळ जोखें म्हणून एक गांव आहे. तेथें १९१२ सालीं दत्ताची स्थापना झाली. आजमितीस तें देऊळ म्हणजे गांवचें एक भूषण आहे. त्या प्रसंगीं बाबांच्या लीलेचा जो अनुभव आला त्याची हकीगत श्री. राजाराम रामजी कोते पाटील, शिर्डी व श्री. सगुण मेरु नाईक यांनीं नुकतीच मजजवळ सांगितली ती अशीः—

जोखे गांवकऱ्यांची अशी इच्छा होती कीं आपल्या गांवीं दत्ताचें एक सुंदर देऊळ असावें; म्हणून गांवकऱ्यांनीं देऊळ बांधण्यासाठीं वर्गणी गोळा करण्यास सुरवात केली. बरेच महिने झाले परंतु अपेक्षित वर्गणी जमली नाहीं, व हें देऊळ कधीं काळीं आपल्या हातून बांधून होईल कीं काय याबद्दल गांवकऱ्यांनाच चिंता वाटूं लागली. तेव्हां कोणी तरी सुचविलें कीं, शिर्डीस साईबाबांकडे जा म्हणजे हें देऊळ बांधण्यासाठीं ते पैसे देतील. त्याप्रमाणें कांहीं प्रमुख गांवकरी मंडळी शिर्डीस आली व त्यांनीं बाबांना सर्व हकीगत सांगितली. त्या प्रसंगीं श्री. राजाराम कोते पाटील तेथेंच जवळ उभे होते. आतां बाबा काय सांगतात याकडे सर्वांचें उत्सुकतेनें लक्ष होतें; कारण या लोकांनीं बाबांजवळ आर्थिक मदत मागितली होती. तेव्हां बाबा आतां कांहीं मदत देतात का शिव्या देऊन बोळवण करतात याबद्दल ज्याला त्याला चिंता होती. इतक्यांत बाबा हंसत म्हणाले, 'अरे, चिंता कशाला करतां ? तुम्ही आपल्या गांवीं परत जा. दोन महिन्यांत तुमच्या गांवीं एक धनिक येऊन तो सुंदर दत्ताचें देऊळ बांधील. जा.' एवढें बोलल्यावर बाबांच्यापुढें आणखी कांहीं बोलण्याची सोयच नव्हती. सर्व गांवकरी उठले. त्यांच्या तोंडावर निराशा पसरली. कारण बाबांच्या बोलण्यावर त्यांचा झटकन् विश्वास बसला नाहीं. ते आर्थिक मदत मिळविण्याच्या हेतूनें आले, पण प्रत्यक्षांत त्यांना हात हलवीत परत जावें लागलें. त्यामुळें त्यांना फार वाईट वाटलें.

परंतु खरोखरच दोन महिन्यांत त्या गांवीं शींवचे तात्याजी ऊर्फ काशिनाथ नवरे या नांवाचे एक धनिक गृहस्थ आले. आपल्या वडिलांच्या इच्छेनुसार (श्री. नवरे ह्यांचे वडिलांनीं मरते समयीं कांहीं ठराविक रकम बाजूस काढून ठेवली होती व तींतून देवळें बांधावींत असें त्यांनीं आपल्या मुलास सांगून ठेवलें होतें). ते प्रवरेच्या कांठाकांठानें देवळें बांधींत चालले व जोखे या गांवींहि देऊळ बांधण्याची त्यांनीं गोष्ट काढतांच गांव-

कन्यांच्या आश्चर्यास पारावार राहिला नाहीं. त्यांनीं मोठ्या आनंदानें श्री. नवर यांच्याशीं सहकार्य केलें. आतां त्या गांवीं एक सुंदर दत्ताचें देऊळ बांधलें गल आहे व तें त्या गांवचे एक भूषणच आहे.

अशा रीतीनें तेथील गांवकऱ्यांना बाबांच्या लीलेचा प्रत्यय आला व त्याचें त्यांना अजूनहि मोठें कौतुक वाटत आहे.

× × ×

## ६ प्रार्थनेचा प्रभाव

श्री. सदाशिव गजानन जयवंत (दत्तात्रय-निवास, बी. ब्लॉक, खोली नं. ३१, तिसरा माळा, पोर्तुगीज चर्चजवळ, दादर-मुंबई नं. २८) यांचा अनुभवः—

१९५० च्या ऑगष्टमध्यें माझी पत्नी टायफॉईडनें आजारी होती. डॉक्टरचें औषध चालू होतें. आजारीपणाच्या १३ व्या दिवशीं तिचें दुखणें एकदम विकोपास गेलें. डॉक्टरांनाहि काळजी वाटूं लागली. दुसरे दिवशीं एखाद्या तज्ज्ञ एम्. डी. डॉक्टरला आणावयासच पाहिजे असें ते मला म्हणाले. तेव्हां मीहि फार घाबरलों. मी साईभक्त आहेंच व आपण आतां मनःपूर्वक सर्व भार साईबाबांवरच टाकला तरच माझी पत्नी हातीं लागेल असें मला वाटलें. मीं आमचे डॉक्टरांस म्हटलें कीं उद्यां तज्ज्ञ डॉक्टरास बोलवण्याचे अगोदर पुन्हां एकदां माझ्या पत्नीची प्रकृति तपासा व नंतर वाटल्यास दुसऱ्या डॉक्टरास घेऊन या. डॉक्टरांना जरा आश्चर्यच वाटलें, पण ते 'बरं, बरं' म्हणत निघून गेले.

डॉक्टर गेल्यावर मी अगदीं सुन्न होऊन गेलों. पत्नीच्या अंथरुणाकडे लक्ष जातांच तिची स्थिती पाहून मला एकदम मडमडून आलें व त्या आवेगांत मी बाबांची मनःपूर्वक प्रार्थना करून मला जें काय त्यांना सांगावयासारखें वाटलें तें मीं सर्व सांगून टाकलें, आणि नंतर स्वस्थ बसलों. रात्रीं तिला शांत झोंप लागली.

दुसरे दिवशीं (म्हणजे आजारीपणाच्या १४ व्या दिवशीं) अगदीं पहांटेसच ती घाबरून जागी झाली. मीं विचारतां तिनें मला सांगितलें कीं,तिला एक नुकतेंच स्वप्न पडलें व त्या स्वप्नामुळें ती घाबरली. स्वप्नांत तिला दिसलें कीं तिला एका तिरडीवर उचलून ठेवलें आहे; तेवढ्यांत एक फकीरी वेषांतील बाबांच्या सारखा म्हातारा आला. त्यानें अंगावरून हात फिरवून तिची छाती उघडली व आंतड्या बाहेर काढून धुतल्या व पुन्हां बसविल्या. आणि या एकंदर दृश्यामुळें ती एकदम घाबरून जागी झाली. मला मात्र हें ऐकून फार आनंद झाला व बाबांनीं कृपा करून माझ्या पत्नीचें दुखणें हटविलें असें मला खात्रीपूर्वक वाटलें. मीं माझ्या पत्नीस स्वप्नाचा अर्थ सांगून तिला धीर दिला.

नंतर सकाळीं ९।१० चे सुमारास डॉक्टर आले. त्यांनीं माझ्या पत्नीस तपासलें व ताप पाहतांच तो नॉर्मलवर आलेला दिसला. तेव्हां त्यांना आश्चर्य वाटलें. ते मला म्हणाले कीं, आतां मोठ्या डॉक्टरास आणण्याची अजियात जरूरी नाहीं;

तुमच्या पत्नीचें दुखणें पळालें. व पुढें सहज थट्टेनें म्हणाले, ' काय किमया करून तुम्ही हा ताप उतरवलात ? ' मी सर्व हकीगत सांगून म्हणालों मीं बाबांची अगदीं मनःपूर्वक प्रार्थना केली, दुसरें कांहीं नाहीं. त्यांनींच काय करावयाचें तें केलें.

अशा रीतीनें बाबांनीं आमच्यावर फार मोठी कृपा केली.

× × ×

## ७ नऊ महिन्यांच्या गरोदर स्त्रीची गोष्ट

श्री. पी. रामचंद्रन [ रेल्वे नोकर; ८।३९२ वसंत बिल्डिंग, माटुंगा, पश्चिम रेल्वे, मुंबई ] यांचा अनुभव—

१९५० सालीं प्रथमच मला साईबाबांची माहिती झाली. त्या वर्षी तामिळ मार्फ- तील ' श्रीसाईसच्चरित्र ' हें पुस्तक माझ्या वाचण्यांत आलें. पुस्तकाचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. विशेषतः ' मी जवळ असतांना तुम्ही कां घाबरतां ? या बाबांच्या आश्वासनानें मी फार भारावून गेलों व आपोआपच त्यांच्याबद्दल माझ्या मनांत भक्ति उत्पन्न झाली.

त्याच सालीं माझी बायको ९ महिन्यांची गरोदर असतांना तिला घेऊन मला मद्रास प्रांतांतील तिच्या माहेरीं तिच्या मरणोन्मुख स्थितींत असलेल्या आजारी आईस भेटण्यासाठीं म्हणून घेऊन जाणें भाग पडलें. अशा ९ महिने भरलेल्या स्थितींत इतक्या लांबचा प्रवास म्हणजे एक महान संकटच होतें. परंतु जाणें भागच पडलें व डॉक्टरांनींहि ' कांहीं त्रास होणार नाहीं ' असें आश्वासून आम्हांस जाण्याची परवानगी दिली. परंतु संकटाची जाणीव कांहीं मन सोडीना आणि त्यामुळें मी पदोपदीं अत्यंत अंतःकरणपूर्वक बाबांची प्रार्थना करी कीं, ' बाबा, आमचा सर्व भार आतां तुमचेवरच आहे. परिस्थितीमुळेंच हा इतक्या लांबचा प्रवास करणें आम्हांस भाग पडत आहे. संकटाची छाया स्पष्ट दिसत आहे. पण आतां तुम्हींच साहाय्य करून आम्हांस संभाळून घ्या व आमचा प्रवास सुखरूप पार पडूं द्या. रात्रीच्या मद्रास मेलनें जाण्यासाठीं म्हणून आम्हीं तयारी केली. इतक्यांत माझा चुलत बंधु आला व त्यानें मद्रासमध्यें असलेल्या त्यांच्या वडिलांस देण्यासाठीं म्हणून मजजवळ १०० रुपये दिले.

'आम्हीं रात्रीच्या मद्रास मेलनें मुंबईहून निघालों. रात्र सुखरूप पार पडली. पण दुसरे दिवशीं सकाळींच माझ्या पत्नीच्या पोटांत कळा येऊं लागल्या. मी सारखी बाबांची प्रार्थना करित होतों. साधारण ८ वाजण्याच्या सुमारास माझ्या पत्नीस फार त्रास होऊं लागला. मजजवळ औषधपाणी कांहींच नव्हतें. इतक्यांत अचानक गाडी थांबली व एक मुसलमान उतारू गाडींत चढला. ते एक लहानसेंच स्टेशन होतें व तो एकुलता एकच उतारू आमच्या डब्यांत शिरला. तो एखादा डाक्टर असावा असें वाटल्यावरून मी त्याजजवळ माझ्या पत्नीसाठीं औषध मागतांच त्यानें ताबडतोब ३ पुड्या तयार केल्या व त्यापैकीं एक त्यानें स्वतःच माझ्या पत्नीस ताबडतोब दिली व दुसऱ्या २ पुड्या

त्यानें २१२ तासानें देण्यास मला सांगितलें त्यानंतर सोलापूर स्टेशन आलेंच व तो तेथेंच उतरला. मला वाटतें कीं बाबांनींच आम्हांस मदत करण्यासाठीं म्हणून त्याला अगदीं योग्य वेळीं पाठविलें कारण त्या औषधाच्या पुडीनें माझ्या पत्नीस पुष्कळंच आराम पडला.

'संध्याकाळीं माझ्या पत्नीस वेणा येऊं लागल्या. ४ च्या सुमारास ती अडोनी स्टेशन येण्याचे अगोदर संडासास गेली असतां तेथेंच बाळंतीण झाली. गाडी चालूच होती. मी अगदीं गोंधळून गेलों व घाबरलोंहि. काय करावें तें सुचेना. इतक्यांत अडोनी स्टेशन आलें. मी संडासाच्या दाराजवळ चिंतेतच उभा होतों. घाबरल्याची स्पष्ट छटा माझ्या तोंडावर उमटलेली असावी असें वाटतें. कारण 'घाबरूं नका, मी येथें आहे. असें शब्द कोणी तरी उच्चारल्याचें मीं ऐकलें व म्हणून इकडे तिकडे मी पाहूं लागलों तों २ बायका [कामकरी वर्गातल्या] दरवाजांतून आंत शिरतांना दिसल्या व त्यापैकीं एक बाई मलाच उद्देशून वरील शब्द बोलली. मीं घाई घाईत तिला सुईणीचें काम येतें का म्हणून विचारलें. तिनें हो म्हणतांच मीं तिला सांगितलें कीं माझी पत्नी संडासांत बाळंत झाली आहे तर तिची सुटका कर. त्यावर त्या दोन्ही बायका ताबडतोब आंत गेल्या. नंतर त्यांनीं चाकू मागून घेऊन सर्व काम व्यवस्थित पार पाडलें व त्या जाण्यास निघाल्या. त्या बायकांना मी ५ रुपये बक्षिसादाखल देतांच त्या जशा अचानक आल्या तशाच अचानक नाहीशा झाल्या. त्या कुठून आल्या, त्या माझ्याच डब्यांत कशा आल्या आणि त्या अचानक परत कां गेल्या हें त्यांचे त्यांनाच व श्रीसाईबाबांस माहित. मला मात्र यांत सर्वस्वीं बाबांचीच कृपा दिसते.

नंतर ही सर्व गोष्ट स्टेशन मास्तरला कळविण्यांत आली. त्याबरोबर त्यानें स्ट्रेचर आणून माझ्या पत्नीस गाडींतून खालीं उतरविलें. पुढें अडोनी येथील हॉस्पिटलमध्यें आम्हांस १३ दिवस राहणें भाग पडलें. या बाबतींत एका अमेरिकन मिशनरी लेडी डॉक्टरची फार बहुमोल मदत झाली. अडोनीसारख्या परक्या स्थळीं व अशा अवस्थेंत आम्हांस दिवस काढावे लागतील याची मला कल्पना नव्हती. मजजवळ हा सर्व खर्च करण्याइतके पैसेहि नव्हते. परंतु ह्या प्रसंगाची मला कल्पना नव्हती तरी त्याची जाणीव श्रीसाईबाबांना पूर्णपणें होती व म्हणून त्यांनींच माझ्या चुलत बंधूस मजजवळ मी निघतेवेळीं १०० रुपये देण्याची बुद्धि दिली. ते १०० रुपये ह्या वेळेस मला फार फार उपयोगी पडले. आपल्या भक्तांविषयींची बाबांची ही कळकळ पाहून कोणाचें हृदय प्रेमभरानें उचंबळून येणार नाहीं!

पुढील गोष्टी सर्व व्यवस्थित पार पडून आमचा पुढचा प्रवास सुखकर झाला.

× × ×

## ८ रामचंद्रन् यांचा आणखी एक अनुभव

वर सांगितलेंच आहे कीं माझी बायको गाडींतच बाळंत होऊन तिला एक मूल झालें तो मुलगा होता. परंतु अवघा पांचएक महिन्यांचा होऊन तो वारला. आम्हांस

फार वाईट वाटलें. आम्हांस मुलें आहेत. परंतु मुलींच तेवढ्या जिवंत राहिल्या व मुलगे मात्र सर्व वारले, आम्हांस बाबांच्या कृपेची प्रचीती आलीच होती. तेव्हां याही बाबतींत बाबाच काय तें करूं शकतील याची आम्हांस पूर्ण खात्री पटली. मीं बाबांस प्रार्थिलें व नवस केला कीं, बाबा जर मला आपल्या कृपेनें मुलगा झाला तर तो सहा महिन्यांचा पूर्ण होतांच मी त्यास आपले दर्शनास शिर्डीस आणीन. हा नवस मीं मुद्दाम केला. कारणः माझा कोणताच मुलगा ६ महिनेपर्यंतहि जगला नाहीं.

एक वर्षानंतर माझी बायको पुन्हां गर्भार राहिली. परंतु या वेळेस जें मूल बाहेर आलें तें मुळीं मेलेंलेंच. सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे तो मुलगाच होता परंतु आमच्या नशिबांत नव्हता. आमचें नशीब काय होतें हें आम्हांस पुरतेपणीं ठाऊक होतें. म्हणून आम्हांस मुलगा झालाच तर तो बाबांच्याच कृपेनें होईल एरवी नाहीं याबद्दल मला पूर्ण खात्री होती. बाबांना आमच्यावर कृपा दाखविणें कांहीं अशक्य गोष्ट नव्हती: परंतु आमची निष्ठा पाहण्यासाठींच बाबांनीं ह्यावेळेस आमचेवर कृपा केली नाहीं असें मला खात्रीपूर्वक वाटलें. मी पुन्हां बाबांनाच शरण गेलों आणि त्यांना पुन्हां पुन्हां विनविलें कीं, 'आपल्या कृपाप्रसादाशिवाय आम्हांस मुलगा होणेंच शक्य नाहीं व आमच्या नशिबानें यदाकदाचित झालाच तर वांचणें शक्य नाहीं. म्हणून आमचा अंत न पाहतां आमच्यावर आतां आपण तावडतोब कृपा करा. माझा मुलगा ६ महिन्यांचा पूर्ण झाला म्हणजे मी त्यास जरूर शिर्डीस आपले दर्शनास आणीन.'

माझी बायको पुन्हां गर्भार राहिली व ता. ८-९-१९५२ रोजीं प्रसूत झाली. या वेळेस एक फार मोठें आश्चर्य घडलें. माझ्या पत्नीस जुळें झालें १ मुलगा १ मुलगी मुलाचं वजन ५ पौंड होते तर मुलीचें अवघे २ ½ पौंड मुलगी ३ दिवसांतच वारली. आणि मुलगा मात्र जगून तो ६ महिन्यांचा पूर्ण झाला व म्हणून नवस फेडण्यासाठीं आम्हीं त्यास घेऊन आतां शिर्डीस बाबांचे दर्शनास व त्यांना आमचे आदरपूर्वक प्रणाम अर्पण करण्यास आलों आहोंत.

'रेखेवरी मेख मारी जो' असें जें बाबांचें वर्णन त्यांच्या स्तुतींत केलेलें आढळतें तें सर्वस्वीं खरें आहे. त्यांच्याशिवाय आमच्या प्रारब्धावर कोण मात करूं शकणार? आणि बाबांनीं काय युक्ति केली पहा—त्यांनीं या वेळेस आम्हांस दोन मुलें देऊन आमच्या पूर्वजन्मींच्या वैऱ्यास, किंवा दुष्ट ग्रहांस म्हणा, आमची मुलगी अर्पण केली व अशा रीतीनें माझ्या मुलाचा बचाव केला. बाबांची लीला अगाध खरीच!

× × ×

## ९ लष्करी जवानांना प्रेरणा कोणाची?

श्री. एस्. जी. दसाई (सरकारी नौकरी—सौराष्ट्र, पत्ता—श्रीनिवास रानीका स्ट्रीट, भावनगर), यांचा अनुभव:—

बाबांचें दर्शनास शिर्डीस येण्यासाठीं म्हणून मी सहकुटुंब निघालों. १८-७-५३ च्या

रात्रींच्या नागपूर एक्सप्रेसनें निघून आम्हीं मनमाडास पहांटेसच आलों. कोपरगांवकडे जाणाऱ्या गाडींत बसण्यासाठीं म्हणून आम्ही तिकडे गेलों, तर प्लॅटफॉर्मवर ही धिकार गर्दी ! ही गर्दी पाहूनच आमचा जीव दडपून गेला. सुमारें पांच एक हजार लोक फलाटावर असावेत असें वाटतें; व त्या सर्वांचा त्याच गाडीनें जाण्याचा प्रयत्न चालला होता. एवढ्या प्रचंड गर्दीतील बहुतेक सर्व लोक एकादशीनिमित्त पंढरपुरास जाणारे होते. ह्या सर्व लोकांची जागा मिळविण्याची धडपड पाहून मी तर अगदीं निराश झालों. पावसाळ्यामुळें एस्. टी. ची मनमाड ते शिर्डी बस–सर्व्हिसही चालू नव्हती. त्यामुळें रेल्वेनेंच जाणें भाग होतें.

'इतक्यांत एका डब्याभोंवतीं बरीच गर्दी जमली आहे असें माझ्या नजरेस आलें म्हणून मी तिकडे गेलों. पाहतों तों त्या डब्यांतील एका कंपार्टमेंटमध्यें कांहीं लष्करी जवान होते व आंत जागा असल्यामुळें उतारू लोक आपणांस आंत घेण्याविषयीं त्यांना विनवीत होते. पण त्यांनीं सर्वांनाच नकार दिला. तें पाहून मी आणखी जास्तच हताश झालों व परत आपल्या ठिकाणीं आलों. वाटलें कीं आतां आपणांस शिर्डीस जावयास मिळत नाहीं ह्या गाडींत तर आतां जागा मिळणें अशक्यच होते पण पुढच्या कोणत्या तरी गाडींत जागा मिळेल ही आशाही मावळून गेली. कारण ह्या गर्दीतील कांहीं उतारू जरी ह्या गाडींतून गेले तरी नवीन उतारू येणारच व गर्दी कायमच राहणार, इतकेंच नव्हे तर ती वाढण्याचाही संभव होता. त्यामुळें बाबांचें दर्शन न घडतांच आम्हांस आमच्या गांवीं, बाबांच्या इतक्या जवळ येऊनही परत जावें लागणार अशी मला भीति वाटूं लागली.

अशा विकल मनःस्थितींत बाबांचा धांवा करण्यापलिकडे माझ्या हातांत काय होतें ! मी त्यांना मनःपूर्वक प्रार्थिलें आणि म्हटलें कीं, इतक्या जवळ आम्हीं आलों असतांना आम्हांला येथून परतवून लावूं नका. आणि अशा रीतीनें त्यांच्या नांवाचा मी जप करीत असतां एकाएकीं मला हुरूप येऊन असा एक मनांत विचार आला कीं आपण त्या लष्करी जवानांच्या अधिकाऱ्यालाच एकदां विचारून पाहूं या ना. आणि त्याप्रमाणें मी तावडतोब त्या डब्याकडे गेलों व त्याला विचारतां अत्यंत आश्चर्याची गोष्ट अशी कीं त्यानें कोणत्याही रीतीनें अडथळा न करतां अथवा नाखुशी न दर्शवितां आम्हांस त्यांच्या डब्यांत येण्याची परवानगी दिली. आम्हीं बायका व मुलें मिळून ६ माणसें होतों व आम्हां सर्वांस त्यांनीं मुबलक व ऐसपैस जागा बसण्यास दिली. आमच्याशीं अत्यंत सौजन्यपूर्वक ते सर्व जवान वागले. आम्ही योग्य वेळीं कांहींहि त्रास न होतां शिर्डीस सुखरूप येऊन पोंचलों.

× × ×

## १० हातावर उठलेल्या अक्षरांची हकीकत

श्रीसाईबाबांना बोललेला नवस योग्य वेळीं फेडला न गेल्यामुळें बाबांनीं त्या नवसाची आपणांस कशी आठवण दिली व नवस कसा फेडून घेतला, याची हकिगत श्री.

जीवराज चतुर्भुज अंचाडे, जैन, वय ७१ वर्षें [ राहणार–अंचाडें, ता.–धुळे, पोस्ट–फागने जि.–पश्चिम खानदेश ] यांनीं आपल्या खालील अनुभवांत सांगितली आहे—

' सुमारें चार वर्षांपूर्वी, माझा मुलगा चि. अमरचंद याची सोयरीक ठरविण्यासाठीं म्हणून मी कोपरगांवास आलों होतों. शिर्डीस, सुमारें ४५ वर्षांपूर्वी, बाबा असतांना मी एकदां आलों होतों व त्यांचें दर्शनही घेतलें होतें. पण नंतर शिर्डीची आठवण विसरूनच गेलों. आतां पुन्हां कोपरगांवास आलों असतांना शिर्डीची आठवण झाली व बाबांचे दर्शन घेण्यासाठीं मुद्दाम, ४५ वर्षांनंतर प्रथमच पुन्हां एकदां शिर्डीस गेलों.

' ह्या वेळेस माझी तब्येत अगदींच खालावलेली होती व मुलाचें कार्य मी माझ्या डोळ्यांनीं पाहीन किंवा नाहीं याची मला खात्री नव्हती. समाधिमंदिरांत मी बाबांचें दर्शन घेत असतां बाबांना नवस बोललों कीं ' जर मला या दुखण्यांतून बरें वाटलें व मुलाची सोयरिक जमून हें कार्य माझे हातून पार पडलें तर मी आपणांस ५१ रुपये अर्पण करीन.'

' बाबांच्या कृपेनें, माझ्या इच्छेप्रमाणें सर्व गोष्टी पार पडल्या व माझी तब्येतही सुधारली. त्यानंतर मी लवकरच पुन्हां एकदां कोपरगांवास व्याह्यांकडे आलों असतांना मुद्दाम शिर्डीस आलों व नवसाच्या ५१ रुपयांपैकीं बाबांना २१ रुपये अर्पण केले. ३० रुपये देण्याचे राहिले आणि ती गोष्ट मी साफ विसरून गेलों.

' मार्च १९५२ मधील गोष्ट. माझी सून ( अमरचंदची पत्नी संध्याकाळचे वेळेस मैदानांत बसली असतांना एकाएकीं म्हणूं लागली कीं डाव्या हातास झणझण होत आहे. कांहींतरी किडामुंगी चावली असेल अशी आम्हांला शंका आली. म्हणून त्या ठिकाणीं तूप लावलें, पण झणझण थांबली नाहीं. तेथली जागा काळीभोर पडली. तेव्हां आम्हांस दुसराच संशय आला व उंदीर, विंचू, साप वगैरे सर्वांचे मंत्र, जें कुणी जसें सुचविलें तसें, टाकले. पण गुण नाही. नंतर कडूलिंबाची, प्रत्येक वेळेस २॥ याप्रमाणें ३।४ वेळेस पानें खावयास दिलीं पण तीं पानें तिला कडू न लागतां गोडच लागलीं. आम्हांला याचें आश्चर्य न वाटतां एक प्रकारची भीतीच वाटली व ही कांहींतरी मोठीच विषबाधा अथवा कांहींतरी दैविक बाधा असावी असें वाटूं लागलें.

दुसरे दिवशीं सकाळीं आमच्या सूनबाईच्या हातावरील ज्या ठिकाणीं काळा चट्टा पडला होता तेथील चामडें निघून गेलें व त्या ठिकाणाहून रक्त वाहूं लागलें. बोदगांव, विंचूर, दमाणें इत्यादि ठिकाणीं कांहीं प्रभावी मांत्रिक आहेत असें समजल्यावरून तेथेंही जाऊन आलों व सापाचे मंत्र टाकले पण गुण नाहीं. शेवटीं धुळ्यास सिव्हिल हॉस्पिटल-मध्यें गेलों. तेथें ४ दिवस पट्टी बांधली व पोटांत औषधही घेतलें. पण कोणत्याहि रीतीनें तिची झणझण थांबेना व कांहींच गुण येईना. वेल्हाणास चांग्या पाशाचा भगत आहे त्यानें हा सर्व त्रास आमच्या कुलदेवीच्या कोपामुळें झाला आहे असें सांगितलें व तें मला पटलें; कारण माझ्या मुलाचें एवढें लग्न झालें पण मी आमच्या कुलदेवीस कांहींच

अर्पण केलें नव्हतें. तेव्हां ११ रुपया मी आमच्या कुलदेवीस प्रार्थनापूर्वक अर्पण केला. पण कांहीं गुण नाहीं.

' अशा रीतीनें सर्व उपाय करून थकल्यावर मग मला साईबाबांची आठवण झाली. त्यांचा फोटो मजजवळ होताच. त्यांची अत्यंत पवित्र स्थितींत पूजा केली व बाबांचें पुढें स्तवनमंजिरी वाचली ( ता. २१-५-५२ ) आणि त्यांचेवर सर्व भार टाकून त्यांना विनविलें कीं, काय चुकी झाली असेल ती मी कबूल करतों. चुकीची आठवण द्यावी. हा सर्व त्रास आमच्या चुकीची आठवण देण्यासाठींच आपण निर्माण केला आहे व तो आपणच थांबवूं शकाल तरी दृष्टांत देऊन उलगडा करावा व या गरिबास माफी करावी.' त्या दिवशीं आम्हीं माळ्यावर निजलों. माझी सून एकाएकीं उठली व गुंगींत माळ्यावरून खालीं उतरली व खोलींत निजली. हवेच्या योगानें तिच्या हातास त्रास होत असावा असें वाटून आम्हीं कांहीं बोललों नाहीं. सकाळीं उठल्यावर माझ्या पुतण्यानें तिच्या जखमी हातावर ' साई ' अशीं अक्षरें उमटलेलीं पाहिलीं. पुढें आणखी अक्षरें होतीं, पण हातावर जे डाग होते त्यांत तीं मिसळलीं गेलीं होतीं, त्यामुळें पुढें 'बाबा' का 'नाथ' यांपैकीं कोणता शब्द होता तें कोणासच वाचतां आलें नाहीं. हीं अशीं अक्षरें कशीं उमटलीं याबद्दल आम्हांस संशय आल्यामुळें ती जागा साबण पाणी लावून धुवून टाकली तर तीं अक्षरें जास्त काळीभोर झालीं. ह्या अक्षरांपासून तिला तकलीफ होत नव्हती. अशी गोष्ट आम्हीं पाहिली नाहीं, म्हणून चावडींत कांहीं प्रमुख माणसें बोलावलीं व त्यांना माझ्या सुनेचा हात समक्ष दाखविला. त्यांच्या समक्ष तीं अक्षरें पुन्हां साबणानें धुतलीं पण तीं अक्षरें पुसलीं गेलीं नाहींत. सर्वांस अचंबा वाटला. तीं अक्षरें आपोआप उमटलेलींच असावींत असें सर्वांचें मत पडलें. इतक्यांत माझ्या मुलास आठवण झाली कीं शिर्डीस बाबांचें एक लिंबाचें झाड आहे त्याचा पाला गोड लागतो. त्याबरोबर आमच्या सुनेस लिंबाचा पाला खावयास दिला असतां तो गोड कां लागला याचा उलगडा आम्हांस झाला आणि त्याचबरोबर मला नवसाची आठवण होऊन बाबांचे ३० रुपये देणें शिल्लक राहिलें होतें ह्याचें स्मरण झालें आणि मग ही सर्व बाबांचीच लीला होय याची आम्हां सर्वांस खात्री पटली. तेव्हां लोक मला म्हणाले कीं, तुम्हीं 'ताबडतोब शिर्डीस जाऊन नवस फेडून या. मग मीं बाबांस प्रार्थिलें कीं, ' मला माझी 'चूक कबूल आहे. मी शिर्डीस सर्व मंडळीसहच आपले दर्शनास येतों व राहिलेले ३० रुपये भरून नवस फेडतों. मला क्षमा करा, पण सुनेच्या हातास ताबडतोब उतार पडूं द्या.'

' त्याच दिवसापासून सुनेस आराम पडला व रक्त गळण्याचें थांबलें. रविवार ता. २४-५-५२ रोजीं सुनेस पहाटे स्वप्न पडले. स्वप्नांत तिला बाबा दिसले व तें तिला म्हणत होते, ' रख्या रख्या कई करो मैं फेकू झका सबच घ्यानमें रखो । ऐ

गुरुदेव दयाके सागर सब गुण आगर ज्ञान अनंत ' त्यानंतर ती एकाएकीं जागी झाली, त्यानंतर २।३ दिवसांत तिचा हात बराच झाला. ती सारखी त्या दुसऱ्या हातावर उदी लावीत असे. त्यानंतर आम्हीं बाबांनीं साक्षात् प्रचीती दिल्यामुळें, सर्वजण शिर्डीस येण्यास निघालों, व येथें (शिर्डीस) कचरू मारवाड्याकडे (ता. २८–५–५३ रोजीं) आलों. वाटेंत व येथेंहि पुष्कळांनीं तिचा हात पाहून तीं अक्षरें खरोखरींच आपोआप उमटलेलीं आहेत असे उद्गार काढले. असो. बाबांची लीला आपणांस कशी समजणार व त्याचा उलगडा तरी आपणांस कसा करतां येणार ! जें खरोखर घडलें तेंच मीं सांगितलें आहे.

शिर्डीस आल्यावर बाबांचें दर्शन घेऊन ३० रुपये समाधीवरील पेटींत टाकून नवस पूर्णपणें फेडून टाकला.

× × ×

## ११ दमेकरी मुलीच्या श्रद्धेचें फळ

मुंबई सरकारच्या सिव्हिल सप्लाय खात्यांतील अन्न–नियंत्रणाधिकाऱ्याच्या ( Food Controller ) मुंबई ऑफिसमधील एका पारसी वॉच ॲंड वॉर्ड इन्स्पेक्टरचा अनुभव—

' मी, एक पारसी आहें. १९४५ सालीं बाबांची मला माहिती झाली १९४७ सालीं शिर्डीस मी प्रथमच गेलों होतों. बाबांच्या फोटोचें व त्यांच्या समाधीचें प्रत्यक्ष दर्शन घेतल्यावर बाबांवरील माझी श्रद्धा वाढीसच लागली. परत जातांना मी साईबाबांची एक आंगठी घेतली होती व ती माझे बोटांत असे.

' मी अविवाहित आहे पण एका रोमन कॅथॉलिक मुलीच्या संगोपनाची जबाबदारी (वय १२ वर्षें)-मीं पत्करली आहे. कारण हिच्या बापानें, (तो माझा मित्र होता) हिला टाकून देऊन वाईट लोकांच्या नादानें कुठेंतरी पलायन केलें त्याचा अद्याप पत्ता नाहीं. ह्या मुलीस दम्याचा त्रास आहे. कांहीं विषारी वनस्पती व फुलें यांच्याशीं खेळल्या-मुळें तिचा दमा तारीख २५–६–५३ रोजीं एकाएकीं उमळला तिला वर्सोवा येथील डॉ. भट्ट यांच्या रुक्मिणी हॉस्पिटलमध्यें मीं ठेवलें ता. २७–६–५३ रोजीं दम्याचा जोर विलक्षण वाढून तिला फार त्रास होऊं लागला. अशा स्थितींत सहजगत्या तिचें लक्ष माझ्या बोटांतील साईबाबांच्या आंगठीकडे गेलें. तिनें ती आंगठीं मजजवळून मागून घेतली व लगेच नाकपुडीला लावून बाबांची प्रार्थना केली कीं, ' बाबा, तुम्ही आपला श्वास मला द्या.' तिचें लक्ष ह्या त्रासांतून दुसरीकडे जावें म्हणजे दम्याकडेच तिचें लक्ष जाणार नाहा व त्यामुळें तिला हलकें हलकें आराम पडेल ह्या हेतूनें ह्या वेळेस मी तिच्याशा हॉस्पिटल बेडवर पत्ते खेळत बसलों होतों. माझी आंगठी तिजजवळ होत व ती अधुन–मधून सारखी नाकाला लावीत असे. इतक्यांत प्रत्यक्ष श्रीसाईबाबाच माझ्या जवळ बसलेले आहेत असें तिला दिसलें व ती मला म्हणाली, ' साईबाबा तुमच्याजवळ बसलेले असून ते मला म्हणतात कीं, तूं चिंता करूं नकोस. ते मला म्हणतात कीं

मरणार नाहींस.तूं फक्त म्यायली आहेस आणि आज रात्रींच मी तुझा भित्रेपणा घालवून टाकीन ' सर्व दुपारभर तिनें त्या दिवशीं साईबाबांना पाहिलें. रात्री तिला शांत झोंप लागली. दुसरे दिवशींहि दुपारीं पुन्हां तिला साईबाबा तिच्या बिछान्याजवळ बसलेले व हंसत असलेले दिसले. त्यानंतर तिचा दमा गेलाच व दुसरे दिवशीं डॉक्टरांच्या परवानगीनेंच मीं तिला घरीं आणलें. त्यानंतर तिनें शिर्डीस जाऊन बाबांच्या समाधीचें दर्शन घेण्याचा हट्टच धरला, म्हणून मी तिला ता. १८–८–५३ रोजीं शिर्डीस बाबांच्या दर्शनास घेऊन आलों.

× × ×

## १२ बाबांच्या कृपेचा अनुभव

श्री. वासुदेव जनार्दन सातमाई (वय ७२ वर्षें), पेन्शनर कोपरगांव, हे तारीख २–७–१९५३ रोजीं बाबांचे दर्शनास शिर्डीस आले असतां श्रीसाईकृपेबद्दलचा त्यांनीं जो अनुभव सांगितला तो खालीं दिला आहे—

१९०१ सालीं श्रीसाईंच्या दर्शनाचा मला प्रत्यक्ष योग आला आणि तो योगहि मोठ्या चमत्कारिक रीतीनेंच आला. त्या वेळेस मी सेन्सस खात्यांत साधा कारकून होतों. श्री. नानासाहेब चांदोरकर हे त्या वेळेस आमच्या खात्यांत सुपरिन्टेन्डण्ट म्हणून होते. नानासाहेब हे बाबांचे एक अत्यंत निष्ठावंत भक्त होते हें सर्वांस माहीतच आहे. ते वारंवार शिर्डीस नित्य कांहीं नवी मंडळी बरोबर घेऊन बाबांचे दर्शनास जात. मलाहि ते शिर्डीस चलण्याचा नेहमींच आग्रह करीत. आणि प्रत्येक वेळीं मी त्यांना नकार देई. शेवटीं माझें भाग्य उदयाला यायचें होतें म्हणून म्हणा कीं कांहीं म्हणा, श्री. नानासाहेबांनीं मला अगदीं जवळ जवळ ओढूनच शिर्डीस बाबांचे दर्शनास नेलें. आम्हांस चावडींत उतरविलें व पुढें बाबांच्या दर्शनाची वगैरे व्यवस्था सर्व त्यांनींच केली. सकाळीं ८।८॥ चे सुमारास मी नानासाहेबांसमवेत बाबांचे दर्शनास गेलों. नानासाहेबांची कांहीं स्नेही मंडळी व इतर परगांवची आणि स्थानिक मंडळी मिळून एकंदर १८।२० माणसें त्या वेळेस द्वारकामाईत बाबांचे समोर बसलीं होतीं. मीच ह्या सर्व मंडळींत तरुण होतों. अगदीं समोर व बाबांचे पुढ्यांतच जवळ जवळ मी बसलों होतों, असें म्हणण्यास हरकत नाहीं. इतक्यांत बाबा चिलिम ओढूं लागले. मी तंबाखू वगैरे कांहीं खात नसे व विडी किंवा चिलीम ओढीत नसे. त्यामुळें बाबांच्या चिलिम ओढण्याचें मला कांहींच वाटलें नाहीं, परंतु इतरांच्या चेहऱ्यावर मात्र एक प्रकारची आतुरता–आपणांस ती चिलिम ओढण्यास मिळेल कां याबद्दलच बहुतेक असावी–मला दिसून आली.

इतक्यांत बाबा मला म्हणाले, 'बेटा, चिलीम लेव' मला चिलीम ओढण्याची संवय नसल्यामुळे मी अळंटळं करूं लागलों; तेव्हां नानासाहेब लगेच माझ्या कानांत म्हणाले, 'अरे, अनमान करूं नकोस. ओढ. कल्याण होईल.' मीं लगेच घाई घाईनें बाबांनीं दिलेली चिलीम तीन वेळेस ओढली. नंतर बाबांनीं ती मजजवळून परत घेतली

आणि, मला पक्कें आठवतें कीं, त्यांनीं ती चिलीम त्यावेळेस इतर मंडळीस ओढण्यास दिली नाहीं. सर्व मंडळी जागचे जागीं चूप बसली. नंतर आम्ही निघून गेलों.

'त्यानंतर माझ्या मार्गांत हळू हळूं उत्तमच पालट होत गेला. मी नंतर रेव्हेन्यू डिपार्टमेंटकडे गेलों व तेथें चांगल्या हुद्यापर्यंत चढून योग्य कालीं सेवानिवृत्त झालों. त्यानंतरहि सारखी भरभराटच होत गेली. जें कार्य हातीं घ्यावें त्यांत बाबांच्या कृपेनें यशच येत गेलें. हल्लीं बेलापूर कोपरगांव इलेक्ट्रिक कंपनी कं. लि. कोपरगांव, या कंपनीचा मी मॅनेजिंग एजंट असून सातमाई वॅाटर सप्लाय कं. लि. वगैरे अनेक धंदे माझ्या मालकीचे आहेत बाबांचें दर्शन होण्याचे अगोदर माझी घरची स्थिती अगदीं साधारणच होती, पण आज मला पैशाची ददात नाहीं व कोणत्याहि प्रकारची काळजी नाहीं; हाच बाबांच्या कृपेचा अनुभव.

× × ×

## १३ शिर्डीची यात्रा कशी घडली ?

श्री. कुंकु विश्वनाथ चेट्टी, कमिशन एजंट, पो. बॉक्स् नं. ७, चिमनचराला (ताळुका–उटी, जिल्हा–गुंटकल) हे तारीख ५–८–१९५३ रोजीं शिर्डीस बाबांचे दर्शनास आले असतां, ह्या वेळेस शिर्डीचा यात्रा करण्याचा योग कसा आला याबद्दलचा खालील अनुभव सांगितला—

'मी प्रथम १९५२ मध्यें बेलापुरास धंद्याचे निमित्तानें आलों असतां शिर्डीची त्या वळेस माहिती झाली व बाबांचें दर्शनहि त्या वेळेस मीं प्रथमच घेतलें. त्यानंतर धंद्यांत माझी उत्तरोत्तर भरभराटच होत गेली. माझी बाबांवर दृढ भक्ति बसली. घरांत मीं बाबांची पूजा–अर्चा श्रद्धापूर्वक रोज करीतच असतों.

'जुलै १९५३ मधील गोष्ट. एके रात्रीं स्वप्नांत मला निरनिराळ्या देवतांचीं देवळें दिसलीं. साईबाबांचेंहि देऊळ दिसलें. व्यंकटेश, राघवेंद्रस्वामी वगैरे देवांची पूजा मीं केली, परंतु साईबाबांची पूजा करण्याचें विसरून गेलों. त्यानंतर मी स्वप्नांतून जागा झालों आणि जव्हां ह्या स्वप्नाचा विचार करूं लागलों तेव्हां एक प्रकारची हुरहूर मनास लागली साईबाबांनीं मजकडून आपली पूजा कां करवून घेतली नाहीं ह्याचीच टोंचणी सारखी मनाला लागली लगेच मीं शिरडी ऑफिसला एक जोड कार्ड लिहिलें व विचारणा केली कीं, बाबांची पूजा कोणकोणत्या प्रकारनें होतें व त्या प्रत्येकाचा खर्च काय ? पत्र अर्थातच तेलगु भाषेत होतें. हें पत्र लिहिल्यानंतर सुमारें ८ दिवसांनी रविवार ता. २–८–५३ रोजीं पहांटे स्वप्नांत मला बाबांची समाधि दिसली. समाधीची पूजा चालली होती व नंतर तिच्यावर कपडे चढवून फुलें, हार, वगैरे घालण्यांत आल्याचें मीं स्वप्नांत पाहिलें आणि लगेच जागा झालों.

'आतां शिर्डी ऑफिसमधून आपणांस योग्य तें खुलासेवार पत्र येईल व मग आपण पैसे पाठवूं म्हणजे आपले नांवें बाबांची पूजा केली जाईल, असे विचार माझे

मनांत चालू होते. समाधीची पूजा झालेली दिसली. तेव्हां बाबांनीं आतां आपल्या-वरचा राग सोडला आहे व ते आतां मजकडून पूजा करवून घेतील असें मला वाटूं लागल्यामुळें वरील आशयाचें सर्व खुलासेवार पत्र शिर्डीहून येईल. याबद्दल माझी खात्री होती. परंतु मी पाठविलेल्या जोड पत्राचें उत्तर जें शिर्डीहून, ता. ३–८–५३ रोजीं परत आलें त्यावर 'कांहीं समजत नाहीं' हीं अक्षरें पाहतांच मनांत पुन्हां शंकाकुशंकांच्या नाना लहरी उत्पन्न झाल्या. बाबांची अवकृपा झाली कीं काय अशी पुन्हां भीति वाटूं लागली. इतक्यांत बाबांच्याच प्रेरणेनें एक विचार मनांत चमकला कीं ज्याअर्थी बाबांनीं समाधीची पूजा चालू असल्याचें पण ती पूजा करांत असलेल्या भक्तांत मी नसल्याचें दृश्य स्वप्नांत मला दाखविलें त्याअर्थी बाबांची इच्छा अशी असली पाहिजे कीं मीं स्वतः शिर्डीस येऊन बाबांच्या समाधीची पूजा करावी. आणि हा विचार माझ्या मनाला पूर्ण पटला. मी माझ्या सर्व कुटुंबासह तावडतोब निघालों व शिर्डीस बुधवार ता. ५–८–५३ ला आलों. गुरुवार ता. ६–८५३ ला आम्हीं सर्वांनीं बाबांची अंतःकरणपूर्वक प्रेमानें यथासांग पूजा केली. अशा रीतीनें बाबांनीं लीला दाखवून शिर्डीची यात्रा ह्या वेळेस आमचेकडून करवून घेतली.'

× × ×

## १४ उदीचा आश्चर्यजनक प्रभाव

श्री. वसंतराव नारायण सावंत (आगाखान बिल्डिंग, १ ला माळा, जेकब सर्कल, मुंबई) हे ता. २२–८–५३ रोजीं शिर्डीस बाबांचे दर्शनास प्रथमच आले असतां त्यांनीं खालील दोन अनुभव सांगितले—

१९५२ सालीं मला मूळव्याधीचा फार त्रास सुरू झाला. सतत ८।९ महिने रक्त वाहात होते. डॉक्टरी इलाज केले, पण गुण नाहीं. शेवटीं डॉक्टरांच्या सांगण्या-वरून व त्यांच्या सततच्या आग्रहामुळें मी मूळव्याधीचें ऑपरेशन करून घेण्यास तयार झालों, व ऑपरेशनसाठीं के. ई. एम्. इस्पितळांत दाखल झालों (ऑक्टोबर १९५२) परंतु आयत्या वेळेस माझ्या मनावर भितीचा पगडा बसून मी ऑपरेशन करवून घेण्यास कबूल झालों नाहीं. त्याच दिवशीं संध्याकाळीं मी घरीं परत आलों.

नंतर एक दिवस ऑफिसमध्यें (टाईम्स ऑफ इंडियाच्या) मला श्रीसाईलीला त्रैमासिकाचा अंक सहज वाचावयास मिळाला. त्यांतील अनुभव वाचून एक प्रकारचें समाधान वाटलें व आपणहि बाबांवर भार टाकून जशी आपणांस त्यांची सेवा करतां येईल तशी करावी व तोच संकट हरण्याचा व माझ्या मूळव्याधीच्या त्रासाचा शमन होण्याचा एकमेव उपाय आहे, असें माझ्या मनाला वाटूं लागलें. मीं बाबांबद्दल अधिक माहिती मिळविण्याचा तावडतोब प्रयत्न केला. मुंबई पोलिस खात्यांतील श्री. गावडे या माझ्या मित्रानें सांगितलें कीं, कुर्ल्यास डॉ. के. बी. गव्हाणकर यांचेकडे बाबांची नित्य पूजा अर्चा होत असते तर तेथें तूं जा, म्हणजे तुझें सर्व काम होईल. त्याप्रमाणें मी डॉक्टरांकडे गेलों. तेथें बाबांचा भव्य फोटो पाहिल्यावर माझी श्रद्धा आणखी

जास्तच वाढली, नंतर डॉक्टरांनीं थोडक्यांत बाबांची माहिती सांगून प्रसाद म्हणून उदी दिली. ती उदी मी नित्य नेमानें व भक्तिपूर्वक अंतःकरणानें बाबांवर संपूर्ण विश्वास ठेवून रोज थोडी खात असें. ह्याच अवधींत माझे कांहीं मित्र शिरडीस गेले होते. त्यांना सांगितल्यावरून त्यांनीं मजकरतां शिरडीहून उदी आणली. त्यामुळें उदीचा पुरवठा बरेच दिवस कायम राहिला. डॉ. गव्हाणकरांकडून आणलेली उदी घेण्यास सुरवात केल्यावर सुमारें १५।२० दिवसांत माझा मूळव्याधीचा त्रास नाहींसा झाला. तो अद्याप उसळला नाहीं. मी नेहमी बाबांचें स्तोत्र वाचीत असतों व त्यांच्या फोटोची मनोभावें रोज पूजा करीत असतों.

सुमारें ६ महिन्यांपूर्वी माझी पत्नी सौ. वासंतीबाई ही सावंतवाडीस आमचे घरीं गेली. आमचें घरदार सावंतवाडीसच आहे, पण नोकरी निमित्तानें मला मुंबईस राहावें लागतें. सावंतवाडीस ती पाय सुजल्यामुळें आजारी झाली. डॉक्टरी अथवा वैद्यकीय उपाय कांहींच चालू नव्हते. घरगुती शेकपाणी तेवढें चालू होतें. मला या तिच्या आजाराची कांहींच कल्पना नव्हती, कारण मी मुंबईस होतों व सावंतवाडीहून मला पत्र अथवा निरोप कांहीं बरेच दिवसांत आलें नव्हतें. परंतु एके रात्रीं मला स्वप्न पडलें व माझी पत्नी 'बाबा' 'बाबा' अशी ओरडत असल्याचें दृश्य दिसलें. मीं दचकून ताबडतोब जागा झालों. दुसरे दिवशीं लगेच सावंतवाडीस एक 'एक्सप्रेस' पत्र पाठवून पत्नीची खुशाली विचारली. त्याचें उत्तर आलें कीं, ती पायाच्या सुजेमुळें आजारी असून फार त्रासली आहे. घरगुती शेकपाणी चालू आहे, पण गुण नाहीं. माझ्याजवळ ह्या वेळेस उदी नसल्यामुळें मी ताबडतोब डॉक्टर गव्हाणकरसाहेबांकडे जाऊन त्यांचे जवळून उदी घेऊन ती मीं माझ्या पत्नीस ताबडतोब पाकिटांतून पाठविली; आणि त्यांच पाकिटांत लिहिलें कीं, ही उदी पाण्यांतून कालवून रोज बाबांचें नांव घेऊन घ्यावी. नक्कीच उतार पडेल. त्याप्रमाणें ७।८ दिवसांतच तिला पूर्ण बरें वाटलें व तशा आशयाचें पत्र तिनें मला पाठविलें. केवळ उदीमुळेंच माझे पत्नीस बरें वाटलें यांत शंका नाहीं.

वरील दोन प्रसंगांमुळें बाबांवर व त्यांच्या उदीवर माझा अत्यंत विश्वास बसला व मुद्दाम बाबांचें दर्शन घेऊन त्यांना माझे आदरपूर्वक प्रणाम सादर करण्यासाठीं म्हणून मी शिर्डीस तारीख २२–८–५३ रोजीं आलों.

× × ×

## १५ तेरा वर्षांची व्याधि कायमची गेली

श्री भानुशंकर मियाशंकर मांकड, (मास्तर, गुजराती स्कूल, श्रीरामपूर–जिल्हा अहमदनगर) यांचा अनुभव—

'दोन वर्षांपूर्वी (म्ह. १९५१ मध्यें) मी प्रथम शिरडीस आलों. बाबांची कृपा झाली म्हणूनच त्या वेळेस आमचें येणें झालें. माझी पत्नी ही (हिस्टेरिया म्हणा अथवा बाहेरची बाधा म्हणा) १३ वर्षें आजारी होती. महिन्यांतून २।३ वेळां फिट्स् यावया-

च्याच व त्यांत ती बेशुद्ध होत असे. दागिने फेकी आणि खूप बडबड करी. दानतीन तासांनंतर तिच्या नाकास लसूण वगैरे लावून अथवा नाकांत काडी वगैरे घातल्यावर ती शुद्धीवर यावयाची. बेशुद्ध पडल्यावर जरी हे उपचार तावडतोब केले तरी गुण कांहीं यावयचा नाहीं. पुष्कळ डॉक्टरी इलाज झाले; मंत्र, जप, देवदेवस्की सर्व झालें; पण कांहींच गुण आला नाहीं. ती दिवसेंदिवस अत्यंत खंगत चालली. आम्हांस फार काळजी वाटूं लागली.

'तेव्हां २ वर्षांपूर्वी आम्हांस श्रीसाईबाबांची सहज माहिती मिळाली. मनास समाधान वाटलें, व बाबांवरच सर्व भार टाकण्याचें ठरविलें. मीं बाबांचा फोटो वगैरे कांहीं घेतला नाहीं. उदीहि मजजवळ नव्हतीच. बाबांचा फोटो मात्र मीं पाहिला होता. तेव्हां त्या फोटोंतली मूर्ति डोळ्यासमोर आणून मीं बाबांची अंतःकरणपूर्वक प्रार्थना केली व म्हटलें कीं, जर माझ्या पत्नीचें दुखणें आपण नाहींसें केलेंत तर मी आपले दर्शनास शिर्डीस येईन. ३।४ महिन्यांत मला असें दिसून आलें कीं, माझ्या पत्नीस दुखणें जरी येत होते तरी तिचा त्रास कमी कमी होत होता व तिचें बेशुद्ध पडणें अजिबात बंद झालें. तेव्हां मला विश्वास वाटला कीं तिचे कोणी तरी रक्षण करीत आहे. आणि ते बाबाच होत. याची मला पूर्ण खात्री पटली. कारण तिला आतां कोणाचेंच औषधपाणी चालू नव्हतें व आम्ही फक्त साईबाबांचीच प्रार्थना करीत होतों. तेव्हां लगेच मी आमच्या सर्व कुटुंबासह बाबांचे दर्शनास बोलल्याप्रमाणें शिर्डीस आलों. मंदिरांत आल्यावर माझ्या पत्नीची प्रकृती एकाएकीं बिघडली. आम्हांस भीति वाटूं लागली कीं आतां पुढें कोणता प्रसंग येऊन ठेपणार आहे! तिचें डोकें सुन्न झाल्यासारखें दिसूं लागलें. पण ती बेशुद्ध झाली नाहीं व खालींहि पडली नाहीं. दुपारची आरती झाल्यावर बाबांच्या दर्शनास जात नव्हती. शेवटीं फार सांगितल्यावर गेली; तिनें समाधीच्या पायरीवर डोकें ठेवतांच तिला वाटलें कीं, प्रत्यक्ष साईबाबाच तेथें आहेत व ते हात वर करून आपणांला आशीर्वाद देत आहेत; आणि म्हणत आहेत कीं, 'आतां तुम्हीं घाबरूं नका.' तेव्हां आमच्या पत्नीस धीर आला व तिला पटलें कीं बाबा आतां आपलें रक्षण करतील. तेव्हांपासून सतत १२ वर्षें सोसत असलेली तिची तकलीफ जी नाहींशी झाली ती कायमचीच असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण गेल्या दोन वर्षांत ही तकलीफ तिला पुन्हां झाली नाहीं. तिची तब्येतहि त्यानंतर चांगलीच सुधारली.'

× × ×

## १६ मृत्यूच्या दाढेंतून बाहेर काढलें

श्री. एन्. एल्. हेबळीकर, बी. ए., बी. कॉम्. एल्एल्. बी., डेक्कन जिमखाना, पुणें हे लिहितातः—

मी आठदहा महिने पाठीच्या दुखण्यानें आजारी होतों. मान खांदे हे भागहि अत्यंत दुखत. एप्रिल अखेरीस माझें हें दुखणें अतिशय विकोपास गेलें. डॉक्टरनां प्रकृति

दाखविली. त्यांनीं माझी संपूर्ण तपासणी करून क्ष–किरणांनीं छायालेखहि घेतला. मानें-तील एक हाड फाजील वाढल्यामुळें नसांवर दाब पडून हें दुखणें सुरू झालें असल्याचें डॉक्टरांचें मत पडलें. शस्त्रक्रिया करणें हा यावर एकच उपाय असल्याचें डॉक्टरनीं मत दिलें मध्यंतरांत अनेक इंजेक्शनें, क्ष-किरणोपचार आणि विविध औषधें झालीं. गुण पडला नाहींच उलट मला ताप येऊं लागला, भूक गेली, वजन घटलें आणि अशक्तपणा फार वाढला.

डॉक्टरनां चिंता वाटूं लागली. पाठीच्या कण्याला क्षयाची विकृति असावी असा त्यांना संशय वाटूं लागला. उपचारांसाठीं अवश्य असणारा पैसा मजपाशीं नव्हता. काय करावें हें मला व माझ्या आईला सुचेना.

अखेर आम्हीं शिरडीला जाऊन बाबांना शरण जाण्याचा विचार ठरविला. मी ऑफिसमधून एक महिन्याची रजा घेतली आणि १० मे रोजीं शिरडीस जाण्यास निघालों. निघतांना माझ्या अंगांत १०१ डिग्री ताप होता. शिरडीस पोंचल्यावर स्नान करून मी बाबांचें दर्शन घेतलें.

दुसऱ्या दिवशीं बाबांचें दर्शन घेऊन मी डॉ. पी. रुस्तुमजी यांचेकडे जावयाचें आणि पुण्याच्या डॉक्टरनीं मजकडे देऊन ठेवलेलें इंजेक्शन घ्यायचें असें मी ठरविलें. समाधिमंदिरांत मी बाबांना नमस्कार करतांना इंजेक्शनच्या बाटलीची छोटी पेटी बाजूस ठेवली होती. तिला एका मुलीचा पाय लागून पेटी उलटीपालटी झाली. मी इंजेक्शन घेऊं नये अशी साईबाबांची इच्छा असल्याचें माझ्या मनांत आलें.

मी नंतर डॉ. रुस्तुमजीकडे गेलों. इंजेक्शनची गरज नाहीं असें त्यांनीं सांगितलें; व दुसरे दिवशीं त्यांनीं तपासणीसाठीं मला बोलावलें.

१२ मे रोजीं मीं स्नान करून बाबांचें दर्शन घेतलें आणि डॉ. रुस्तुमजी यांचे-कडे गेलों. त्यांनीं मला प्यायला थोडें औषध दिलें आणि होमिओपाथीच्या गोळ्यांची एक लहानशी बाटली दिली.

जेवणानंतर डॉक्टरनी सांगितल्याप्रमाणें मीं गोळी घेण्यासाठीं बाटली उचलली तों तीं एकदम हातांतून निसटून खालीं पडली व फुटली. मी औषध घेऊं नये असें पुन्हां बाबांनीं सूचित केलें होतें. पण तें न समजतां मी पुन्हा डॉ. रुस्तुमजीकडे गेलों. ते हंसले व त्यांनीं दुसरी बाटली दिली. मीं औषधाचा एक डोस घेतला. तात्काळ माझ्या पाठींतील ठणका आणि ताप दोन्हीं अतिशय वाढले.

१३ तारखेस सबंध दिवस मी द्वारकामाईंत काढला. धुनीजवळ बसून मी बाबांच्या फोटोकडे एकाग्रचित्तानें पहात बसलों होतों. पाठीला धुनीचा शेक लागत होता. बाबांकडे पाहात असतां मला असें भासलें कीं बाबा हास्यमुखानें मला विचारीत आहेत, "कोणता शेक तुला अधिक बरा वाटतो? या धुनीचा कीं क्ष–किरणांचा? मी इथें असतांना तुम्हांला उदीखेरीज इतर औषध घेण्याची गरजच काय?'

मी एकदम मानावर आलों. माझ्या पाठींतील ठणका व ताप उतरत आहेत असें मला वाटलें. त्या रात्रीं ताप पूर्ण उतरला व मान, खांदे, पाठ यांमधील वेदना संपूर्ण नाहीशा झाल्या !

१४ तारखेस गुरुवार होता. त्या दिवशीं मला संपूर्ण बरें वाटलें. आईनें नवस केला होता. तो पुरा करण्यासाठीं १६ तारखेस आम्ही श्रीसाई सत्यनारायण-पूजा केली व नंतर १९ तारखेस पूर्ण निरामय होऊन आनंदानें आम्ही घरीं परतलों. आतां मला कसलाहि विकार उरला नसून वजनहि पूर्ववत् झालें आहे.

× × ×

## १७ टेलिफोन परत मिळाला

श्री. दिनकर कृष्णाजी चापनेरकर, मुख्याधिकारी, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ऑटो टेक्नॉलॉजी ( मॉडेल हाऊस, प्रॉक्टर रोड, मुंबई ४ ) यांचा अनुभवः—

गेल्या जूनमध्यें आमच्या देवघरांत श्रीसाईबाबांच्या प्रतिमेची स्थापना करून तिची इतर देवांदिकाबरोबर मी पूजा-अर्चा करूं लागलों. मनाला आराम वाटूं लागला. परंतु थोड्याच दिवसांनीं माझ्यावर दुर्धर दुःखाचा प्रसंग ओढवला. टेलिफोनचें दरमहा भरावें लागणारें भाडें मागील तीन वर्षांत माझ्याकडून वेळेवर भरलें जात नव्हतें. त्यामुळें मधुन-मधून माझा टेलिफोन वारंवार कापला जाई. अशामुळें एके दिवशीं कंपनीनें गुप्त पोलिसामार्फत माझा टेलिफोन कायमचा काढून नेला; व यामुळें मला पराकाष्ठेचें दुःख झालें.

कंपनीशीं पत्रव्यवहार सुरू केला. तो वाढत चालला. मी अगदीं गोंधळून गेलों होतों. अशा वेळीं कोणाला शरण जावें ? आपल्या मनींचें दुःख कोणापुढें ठेवावें ? परंतु अलिकडे मला बाबांचा आसरा आशादायक वाटूं लागला होता, व बाबांनींच कथिलेल्या वचनांचे चरण माझ्या डोळ्यापुढें उभे राहिले, ते असे :—

'नवसास माझी पावेल समाधि। धरा दृढ बुद्धी माझ्याठायीं !!'

या भावनेनें मी त्यांना शरण गेलों व त्यांच्यापुढें मोठ्या गाऱ्हाणें ठेवून विनविलें कीं, माझा टेलिफोन, माझ्या प्रयत्नानें व तुमच्या साहाय्यानें मला परत मिळाला, किंवा तो येणार असा दृढ विश्वास वाटूं लागला, कीं मी शिरडीला तुमच्या समाधीच्या दर्शनासाठीं धांव घेईन.

पत्रव्यवहार चालून होता. एके दिवशीं कंपनीच्या व्यवस्थापकाकडून प्रत्यक्ष चौकशीसाठीं मला बोलावणें आल्यावरून पत्रव्यवहाराची फाईल घेऊन मी त्यांच्या भेटीस गेलों. तत्पूर्वी कंपनीच्या कांहीं चुका बाबांच्या साहाय्यानें माझ्या लक्षांत आल्या होत्या. तरीहि टेलिफोन हवा असेल तर अमूक रकम भरा अशा या त्यांच्या पत्रानें मला निराशच केलें होतें. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी, कीं मुख्याधिकाऱ्यानें

आपल्या परीनें आपल्या चुका ओळखून त्यानें मला माझा टेलिफोन परत देण्याचें आश्वासन श्रीकृपेनें चटकन दिलें. झालें! हें ऐकतांच श्रीनें दिलेल्या न्यायाबद्दल माझ्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. त्या आनंदाच्या भरांत मीं तात्काळ जर कोणती गोष्ट केली असेल तर केलेल्या नवसाप्रमाणें पहिल्यांच गुरुवारीं, ता.१९-११-५३ रोजीं श्री सद्गुरु साईबाबांच्या समाधि-दर्शनास प्रथमच प्रयाण केलें. तेथें गेल्यामुळें माझ्या मनास झालेल्या आनंदाचें वर्णन मी कुठवर करूं? जावें त्याच्या जन्मा तेव्हां कळे. अनेक साईभक्तांनीं या आनंदाची अपार गोडी चाखलेली आहेच.

श्री साईबाबांच्या साहाय्यानें व कृपेनें माझा ४-७-५३ रोजीं काढून नेलेला टेलिफोन ४-१२-५३ रोजीं मला परत आणून दिला असून माझ्या व्यवसायाची स्थितीहि एकंदरींत प्रगतीच्या मार्गावर आहे.

~~~~~\*\*~~~~~

तुम कत बाह्मन हम कत शूद्र ?
हम कत लोहू, तुम कत दूध ?

—कबीर

**भावार्थः**—मला सांगा, तुम्ही ब्राह्मण कां आणि मी शूद्र कां? आमच्या आंगांत रक्त आहे आणि तुमच्या आंगांत काय दूध आहे?

× × ×

देवा ऐकें हे विनंती। मज नको तुझी मुक्ति। संतांचीया संगती। हेंचि सुख आगळें॥
तुझ्या नामाचा महिमा। तुज न कळे पुरुषोत्तमा। तुका म्हणे आम्हां। जन्म गोड यासाठीं॥

—तुकाराम


# शंकर आणि कंपनी
व
# प्रभात प्रोसेस स्टुडिओ

लाईन, हाफ्टोन, कलर ब्लॉक मेकर्स ॲण्ड
स्टीरीओ-टाईप मॅन्युफॅक्चरर्स

टेलीफोन नं. २७४६७ ] घोबीवाडी, ठाकुरद्वार रोड, मुंबई २
~~~~~

# श्री साईनाथ स्तोत्र

ॐ प्रणम्य सद्‌गुरो साई मायबापा दयाघना ।
जन्मोजन्म घडो सेवा देवा ही मम याचना ॥ १ ॥
विकल्प येउनी पिंगा घालिती प्रभु मन्मनीं ।
येउं दे करुणा तूंतें सोडवी मज यांतुनी ॥ २ ॥
नक्र, मत्स्य दुराशेचे तोडिती भवसागरीं ।
धांव रे, पाव रे आतां सत्वरीं वांचवी हरी ॥ ३ ॥
कीर्तिसी ऐकुनी तूझ्या पावलों प्रभु त्वपदीं ।
दयेची भीक तूं देवा घालिशी मजला कधीं ॥ ४ ॥
जगन्नायक तूं नाथा, प्रतापी सूर्य तूं स्वयें ।
हेरंब, मारुती, शंभो, पूजितां यश निश्चयें ॥ ५ ॥
भक्त मुक्त तुवां केले संकटीं तुज बाहता ।
कृपेची येउं दे गंगा पातक्यावरि या अतां ॥ ६ ॥
आश्वासिलें तुम्हीं भक्ता " न मे भक्तः प्रणश्यति " ।
विश्वास ठेवुनी आलों नाथा मी चरणांप्रति ॥ ७ ॥
अनंता अंत ना पाहे करी चातक चिंतना ।
सत्वरीं ये दयामेघा, करी अमृत–सिंचना ॥ ८ ॥
अज्ञान तिमिर नाशोनी, शुद्ध बुद्ध करी मला ।
उद्धरी सांगुनी सेवा मागणें सर्वदा तुला ॥ ९ ॥
महादोषा प्रभो माझे आणावे न तुम्हीं मनीं ।
प्रार्थना नित्य ही नाथा पदीं मस्तक ठेवुनी ॥ १० ॥

( श्री साईनाथ महाराज की जय )

स्तोत्राची रचना
२१–८–१९४७ गुरुवार.

कविः—रामचंद्र गोविंद जोशी,
नरसोबाचें देऊळ,
४०९ सदाशिव, पुणें २

# चमत्कार खरे कीं खोटे

लेखक : वाङ्मयप्रभु खंडेराव सदाशिव त्रिलोकेकर

श्रीसाईसच्चरितांतील ३५ अध्यायांतील कथा भाग मजेदार आहे. ह्यांतील कथा-प्रसंग जितके मनोरंजक आहेत तितकेच ते उद्बोधक आहेत. श्रीसाईबाबांचे एक परम भक्त श्री. काका महाजनी, ह्यांच्याबरोबर एकदां श्री. धरमसी जेठाभाई, मुंबईचे एक सुप्रसिद्ध सॉलिसिटर, हे शिरडीस गेले. त्या वेळीं शिरडींत त्यांची श्री. तर्खड, एक प्रार्थना समाजिस्ट, ह्यांची गांठ पडली. दोघेही सुपरिचित आणि प्रार्थना समाजिस्ट असल्यामुळें धरमसीनें तर्खडांस 'कां, येथें कां येतां ? येथें चमत्कार होतात म्हणून ऐकतों.' असा प्रश्न केला. उत्तरादाखल तर्खड म्हणाले, 'मी कांहीं त्या भावनेनें येत नाहीं. पण जशी ज्याची भावना त्या हेतूनें येथें लोक येतात.'

सॉलिसिटर धरमसी आणि श्री. तर्खड बोलूनचालून प्रार्थना समाजिस्ट, म्हणजे निराकाराचे उपासक; तेव्हां तर्खडांना शिरडींत पाहून धरमसींना आश्चर्य वाटणें स्वाभाविक होतें. मूर्तिपूजा हें एक खूळ आहे. साधुसंत हीं माणसेंच आहेत, त्यांच्या भजनीं लागणें म्हणजे महामूर्खपणा होय, चमत्कारांच्या बाता सबगोलंकारी आहेत. अशा मताचे प्रार्थना समाजाच्या संप्रदायांतील दोन साथी शिरडींत एकत्र भेटतांच शिरडींत घडणाऱ्या चमत्कारांबद्दल मिस्किल चिकित्सेनें धरमसीनें प्रश्न करावा आणि त्याचें सरळ उत्तर देण्याची तर्खडांनीं टाळाटाळ करावी हें साहजिकच आहे. इंग्रजी विद्येच्या आणि सुधारणेच्या संस्कारांनीं आमची चमत्कारावरील श्रद्धा करपून गेलेली आहे. ह्यामुळें शिकलेल्या लोकांचा आजहि चमत्कारांवर विश्वास बसत नाहीं. त्यापैकीं कांहीं थोड्या लोकांनी चमत्कारांचा अनुभव आला असूनहि हे अनुभव उघडपणें कबूल करण्यास कचरतात. त्यांना भय वाटतें कीं ह्यामुळें आपल्या सुशिक्षितपणाला बाध येऊन आपलें हसें होईल.

ह्या भीतीचें बीज आमच्या अंत:करणांत पहिल्यानें इंग्रजी राजवटीनें पेरलें. ह्या आमच्या धार्मिक समजुतीच्या आणि श्रद्धेच्या उन्मूलनाची पूर्वपीठिका मोठी मजेदार आहे. आमच्या हिंदू संस्कृतीवर जर कोणी जोराचा पहिला हल्ला केला असेल तर तो बंगालमधील प्रसिद्ध सुधारक राजा राममोहन रॉय ह्यांनीं केला. राममोहन रॉय ह्यांनीं आमच्या वैदिक आणि इतर धार्मिक वाङ्मयावर इतका निकराचा हल्ला केला कीं, 'वेद हे अपौरुषेय नाहींत' हें त्यांनीं बेधडकपणें विधान केलें. इतकेंच नव्हे तर संस्कृत भाषा आणि वाङ्मय कुचकामाचें आहे, असें आपलें मत स्पष्टपणें ठोकून दिलें. राजा राममोहन रॉय हे श्रीमंत होते. इंग्रजी शिक्षणाच्या

व सुधारणेच्या झगमगीनें त्यांचे डोळे दिपून गेले. त्यांत खुद्द इंग्लंडात त्यांनीं बराच काळ काढलेला त्यामुळें संस्कृतीच्या बाबतींत त्यांनीं गोऱ्या साहेबांवरसुद्धां ताण केली. हिंदी विद्यालयांत संस्कृतसारख्या निकामी भाषेला स्थान देतां कामा नये, हा त्यांचा पराकाष्ठेचा आग्रह! ह्याचीच 'री' लॉर्ड मेकॉले ह्यांनीं आपल्या शिक्षणावरील मिनिटांत ओढली. विलियम बेंटिकपे तर हे एक मोठे आधारस्तंभच होते. ही १८३५ तील गोष्ट. ह्याच वेळीं राजा राममोहन रॉय ह्यांनीं बंगालमध्यें ब्रह्मो समाजाची स्थापना केली. हे ब्रह्मोसमाजिस्ट निर्गुणाचे उपासक. आमचें सर्व संस्कृत भाषेतील धार्मिक वाङ्मय ह्या भाकड कथा आहेत, हें ह्यांचें मत. ह्याच मताचा अनुवाद मेकॉलेनें आपल्या शिक्षणावरील शिफारशींत केला आहे.

आमच्या सगुण भक्तीवर आणि धार्मिक श्रद्धेवर दुसरा जोराचा हल्ला आर्यसमाजाचे संस्थापक, स्वामी दयानंद सरस्वती ह्यांनीं केला. परमेश्वराचे अवतार हें सर्व थोतांड आहे, आमचे भिन्न भिन्न संप्रदाय म्हणजे लबाड लोकांचे अड्डे आहेत, एका वैदिक उपासनेखेरीज बाकी सर्व उपासना खोट्या आहेत, हें स्वामीजींचे मत !

ब्रह्मो समाजाचेंच एक अनुकरण म्हणून मुंबईत प्रार्थना समाजाची स्थापना झाली. मोठ मोठ्या शहरांत ह्या संप्रदायांचा प्रकट प्रचार सुरू झाला. शहरांतील पांढऱ्या गळोटीचे, मध्यम वर्गीय कारकूनपेशाचे लोक मेंढरांप्रमाणें ह्या भिन्न भिन्न संप्रदायांत पडले! ह्या जोरदार संप्रदायांचा प्रतिकार करून लोकांची श्रद्धा स्थिर करण्याचें कार्य एकोणिसाव्या शतकांत परमभागवत अशा संतांनींच मुख्यत्वें केलें. हें संतांचें ऋण आम्ही सदैव श्रद्धेनें ध्यानांत ठेवलें पाहिजे. बंगाल्यांत स्वामी रामकृष्ण परमहंस ह्यांनीं ब्रह्मो समाजाची लाट थोपवून घेतली. आमच्या बाजूला संत श्रीनरसिंह सरस्वती, श्रीअक्कलकोट स्वामी, श्रीमाणिकप्रभु इत्यादि संत-भागवतांनीं आमच्या धार्मिक श्रद्धेवरील हें संकट टाळलें.

संत, त्यांचे चमत्कार आणि त्यावरील आमची श्रद्धा ह्या गोष्टीविरुद्ध हल्लींच्या सुविद्य वर्गांत आज जें पाखंड, अविश्वास आणि चिकित्सकपणा वाढला आहे त्याची पूर्वपीठिका इंग्रजी राजवटींत कशी घडली, ह्याचें वर थोडक्यांत सिंहावलोकन केलें आहे. इंग्रज राजवटींत विशेषतः मोठमोठ्या शहरांतून आमच्या धार्मिक संप्रदायांच्या परंपरा तुटल्यामुळें आमची चमत्कारांवरील श्रद्धा उडाली. चमत्कार खरे की खोटे ? ह्या विषयावर माझे परममित्र महाराष्ट्र–भाषा–भूषण आजगांवकर ह्यांनीं एक सुंदर लेख लिहिला होता. त्या लेखांत त्यांनीं चमत्कारांची सोपपत्तिक कारणें देण्याचा प्रयत्न केला होता. पण माझ्या मतें ज्या घटनेचीं सोपपत्तिक कारणें देतां येतात तो चमत्कारच नव्हे. सिद्धीच्या जोरावर योग्याला अनेक चमत्कार करितां येतात असें श्री ज्ञानेश्वरमहाराजांनीं ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायांत स्पष्टपणें म्हटलें आहे. नाथांनीं तर आपल्या एकनाथी भागवतांत ८ मुख्य सिद्धी व १० गौण सिद्धी ह्यांचीं सविस्तर वर्णनें दिलीं आहेत. त्या वर्णनांवरून चमत्कार हें एक

अतींद्रिय शास्त्र असून त्या शास्त्राप्रमाणें त्या शास्त्राच्या अभ्यासूना त्यांत कांहींच अविश्वसनीय असें वाटत नाहीं, हें चांगलेंच सिद्ध होतें.

चमत्कारांचें शास्त्र अभ्यासिल्यानंतरच चमत्कार खरे कीं खोटे, हा प्रश्न विचारण्याचा माणसाला अधिकार पोचतो. विशेषतः संतांचीं चरित्रें लिहिणारांना ह्या चमत्कारांच्या अतींद्रिय अशा शास्त्राची निदान माहिती तरी असावी लागते. श्री ज्ञानेश्वरांचें चरित्र लिहावयाचें असेल तर श्री ज्ञानेश्वरांनीं केलेल्या चमत्कारांवर निदान लेखकाची श्रद्धा तरी असली पाहिजे. सुप्रसिद्ध प्राध्यापक आळतेकर ह्यांनीं आपल्या 'श्री. ज्ञानदेव' ह्या ग्रंथांत श्री. ज्ञानेश्वरांचें चरित्र लिहिलें आहे. पण ज्ञानेश्वरमहाराजांनीं रेड्याच्या तोंडून वेद बोलविले ह्या कथाभागाकडे आले नीं त्यांची लेखणी अडखळली! ज्ञानेश्वर हे एक लोकसेवक व समाजसुधारक होते हा त्यांचा दृष्टिकोण. उपयुक्तता वादाच्या परंपरेत वाढलेल्या प्रा. आळतेकरांना श्री ज्ञानेश्वरांनीं रेड्याच्या तोंडून वेद बोलविले हें असंभाव्य वाटलें. ह्या गोष्टी त्यांनीं सपशेल झूट मानल्या आहेत. जेवढें म्हणून कांहीं चक्षुर्वैसत्यं असेल तेवढेंच त्यांना मान्य! पण ज्ञानेश्वरींतील ११ वा अध्याय त्यांनीं शांतपणें वाचिला तर चमत्कारांचें शास्त्र, हें 'चक्षुर्वैसत्यं'च्या पलीकडल्या कोटींतलें आहे, हें प्रत्यक्ष श्री ज्ञानेश्वरांचेंच त्यांच्या शंकेस समर्पक उत्तर मिळालें असतें.

११ व्या अध्यायांत श्रीकृष्णानें प्रेमाच्या भरांत अर्जुनाला 'ज्ञानदृष्टि' दिल्याशिवाय आपलें विराट स्वरूप दाखविलें. आपण आपलें एवढें विराटस्वरूप दाखवीत असतांहि अर्जुन नुसता एखाद्या दगडी स्तंभाप्रमाणें आपल्या पुढें उभा आहे, हें पाहून श्रीकृष्णानें आश्चर्यव्यक्त केलें. त्या वेळीं अर्जुनानें देवाला जें उत्तर दिलें त्या अर्जुनाच्या शब्दांत श्री ज्ञानेश्वरांनीं चमत्कारांचें शास्त्र कोणत्या स्वरूपाचें आहे, हें स्पष्टपणें विशद केलें आहे. अर्जुन म्हणतो,

जें अतींद्रिय म्हणौनि व्यवस्थिलें।
जें ज्ञानदृष्टीच्या विभागा फिटलें।
ते तुम्ही चर्मचक्षूपुढां सूदिलें।
मी कैचेनि देखें पां॥

ही ओवी जर प्राध्यापक आळतेकरांनीं मननपूर्वक, अभ्यासपूर्वक व अतींद्रियशास्त्राच्या दृष्टीनें वाचली असती तर श्रीज्ञानेश्वरांनीं रेड्याच्या तोंडून वेद वदविले, ह्या चमत्काराचा कथाभाग लिहितांना त्यांची लेखणी अडखळली नसती. ह्यावरूनच चमत्कारांचें हें एक अतींद्रिय असें शास्त्र आहे आणि चमत्कारांच्या गोष्टी कोणी सांगितल्या तर त्यांचा वेडगळ, अंधश्रद्ध, अडाणी म्हणून उपहास करणाराच स्वतःस उपहासास पात्र करून घेत असतो; इतकेंच नव्हे तर आपल्या पारमार्थिकशास्त्राच्या अज्ञानाचें प्रदर्शन करीत असतो, ही भाविकांनीं आणि अभाविकांनीं सुद्धां पक्की खुणगांठ बांधावी.

संतांपुढें कोणी पाखंडी गेला कीं अशा लोकांसमोरच संत त्यांच्या नेत्रांत अंजन घालण्यासाठीं कांहीं तरी चमत्कृति करीत असतात. स्थूलदृष्टि किती मर्यादित आहे आणि त्याच्यापलीकडे असलेलें ब्रह्मांड किती गूढ आणि विस्तीर्ण आहे ह्याची थोडीशी चुणुक दाखविण्यासाठीं सुद्धां संत केव्हां केव्हां चमत्कार करीत असावेत असें वाटतें.

येथें ओघास आलें म्हणून सांगावेसें वाटतें कीं, जगविख्यात जर्मन तत्ववेत्ता कँट ह्याच्या 'क्रिटिक ऑफ प्यूअर रीझन' ह्या ग्रंथाचें सार सुद्धा हेंच आहे कीं स्थूलबुद्धि ही मर्यादित आहे, आणि स्थूलबुद्धि व स्थूलदृष्टि यांच्या मर्यादेपलीकडे असलेल्या म्हणून चमत्कारांच्या घटना त्यांस गोचर होणें अशक्य आहे हें स्पष्ट आहे. प्रार्थना समाजिस्ट सॉलिसिटर घरमसी यांना शिरडीस नेमका हाच अनुभव आला. तो कसा तो पहा.

ते शिरडींत श्रीसाईबाबांसमोर बसले होते. त्यांचे शेजारी त्यांचे मित्र श्रीयुत तर्खड हे होते. श्री. काका महाजनी यांनीं श्रीसाईमहाराजांना द्राक्षें अर्पण केलीं. श्रीसाईबाबांनीं त्यांतील चारचार द्राक्षें प्रत्येकाच्या हातावर ठेविली. श्री. धरमसी यांना सबीज द्राक्षें खाण्याची त्यांच्या डॉक्टरांनीं मनाई केली होती, तरी सुद्धां त्यांनीं ती खाऊन त्यातील बिया व चोथा आपल्या हातांत ठेवून दिला. त्यावेळीं श्री. धरमसीच्या मनांत शंका आली कीं, श्रीसाईबाबा हे मोठे संत असून 'मला सबीज द्राक्षें खातां येत नाहींत हें त्यांस कसें कळूं नये?' ही कांक्षा त्यांच्या मनांत येतांच श्रीसाईमहाराजांनीं पुन्हां त्यांना व श्री. तर्खडांना आणखी कांहीं द्राक्षें दिलीं. श्री. धरमसी यांनीं तीं तशींच हातांत ठेविलीं. हें पाहतांच श्रीसाईबाबांनीं 'खाऊन घेरे तीं' असें त्यांस सांगितलें. त्यांनीं तीं नाइलाजानें तोंडांत टाकलीं. पण तीं द्राक्षें निर्बीज असलेलीं पाहून त्यांस अत्यंत आश्चर्य वाटलें. त्यांनीं लगेच श्री. तर्खडांना हळूंच प्रश्न केला, 'तुमचीं द्राक्षें सबीज आहेत कीं निर्बीज आहेत?' श्री. तर्खड उत्तरले, 'माझीं द्राक्षें सबीज आहेत.' या उत्तरानें धरमसी गार झाले आणि त्यांच्यां मनांतील चमत्काराविषयींच्या सर्व शंका-कुशंका पार मावळून गेल्या व श्रीसाईबाबांच्या अंतर्ज्ञानाची व योगसामर्थ्यानें हा चमत्कार करण्याच्या सिद्धीविषयीं पूर्ण खात्री पटली.

असो, अखेरीस सॉलिसिटर धरमसी, प्रार्थनासमाजिस्ट व अशा चमत्कारावर पूर्ण अश्रद्ध अशा गृहस्थाचें पाखंडमत जाऊन त्यांना श्रीसाईबाबांच्या या चमत्काराचा अनुभव कसा आला व ते श्रीसाईमहाराजांस कसे शरण गेले हा उद्बोधक कथाभाग श्रीसाई-चरितांत श्री. हेमाडपंत यांनीं अत्यंत रसाळपणें वर्णिलेला आहे. तो वाचकांनीं जरूर पहावा.

---

# श्रीसाईलीलामृत

श्री. प्र. सु. आगासकर यांनीं लिहिलेलें 'श्रीसाईलीलामृत' हें पुस्तक गेल्या दसऱ्याला शिरडी संस्थाननें प्रकाशित केलें आहे. त्या पुस्तकास श्री. ना. आ. सावंत, यांनीं लिहिलेली प्रस्तावना येथें दिली आहे...

संसारांत सदैव सुख मिळावें म्हणून माणसाची सारखी धडपड चाललेली असते. आपल्याला सुखाची प्राप्ति कशी होईल याबद्दलच्या कांहीं निश्चित कल्पनाही माणसाच्या मनांत असतात. पैशानें सुख मिळेल या समजुतीनें तो नेहमीं 'कनका'च्या मागें लागलेला असतो; स्त्री हें सुखसाधन आहे असें वाटून तो 'कामिनी'च्या नादीं लागतो; किंवा लौकिक व प्रतिष्ठा हीं सुख देतील या कल्पनेनें तो 'कीर्ति' संपादन करण्यासाठीं अविरत धडपडतो. कनक, कामिनी आणि कीर्ति हीं मिळविण्यासाठीं अविरत परिश्रम चालू असतां सुख किंवा आनंद मात्र माणसापासून दूर दूर पळत असल्याचाच अनुभव येतो. कनक–कामिनी–कीर्ति यांसाठीं सतत श्रमून तीं मिळालीं नाहींत तर माणूस दुःखी होतोच; परंतु नवल असें कीं, यांची प्राप्ति झालेली असली तरीही माणूस दुःखीच राहातो. जवळ गडगंज संपत्ति असलेला कोट्याधीश, शेंकडों स्त्रियांचा जनानखाना बाळगणारा उमराव अथवा त्रिखंड कीर्ति मिळालेला एखादा सेनापति यांचें अंतरंग पाहतां आलें तर तें इव्यास आणि असमाधान यांनीं भरलेलें आहे असेंच आढळून येईल.

माणसाचें मन हें दिवसाचे चोवीस तास, महिन्याचे तीस दिवस आणि वर्षाचे बाराही महिने, सदोदित असंतुष्ट असतें. 'आपल्याला कांहींतरी हवें आहे' ही आसक्ति आणि जें हवें आहे तें मिळत नाहीं याचें दुःख, हीं माणसाचें मन सारखें व्यापून राहिलेली असतात. या स्थितींत सांसारिक दुःखें, देहाचे आजार आणि मनाच्या यातना यांनीं माणूस अत्यंत गांजला असतांना, क्वचित् त्याच्या मनांत विचार येतो कीं, 'मनाला ज्यानें निर्मळ समाधान लाभेल असें कांहीं साधन या जगांत आहे काय? ज्यानें असें सतत समाधान प्राप्त करून घेतलें आहे असा कोणी महाभाग पृथ्वीवर असूं शकेल काय?' या विचारानें माणूस आजूबाजूस पाहूं लागला म्हणजे त्याला एक अत्यंत आश्चर्याची गोष्ट आढळून येते. ती ही कीं, जगांत नित्यसमाधानी, नित्यसुखी असे कांहीं महापुरुष आढळतात, पण ते सव एकूणएक निरपवादपणें कनक, कामिनी आणि कीर्ति यांचा संपूर्ण त्याग केलेलेच असतात. सुख हें आसक्तींत नसून अनासक्तींत आहे, बाह्य जगांत नसून आपल्या अंतरंगांत आहे असें आपले संत–महात्मे पुरातन कालापासून उच्चरवानें सांगत आले आहेत. परंतु माणूस इतका अधिरा आणि अदूरदर्शी असतो कीं, या अधिकारी महात्म्यांचें म्हणणें नीट समजूनही घेण्याचा प्रयत्न न करतां, तो त्याच्याकडे दुर्लक्ष करून कनक–कामिनी–कीर्तीच्या काल्पनिक सुखामागें धावत सुटतो.

माणसाचा हा अजाणपणा त्याच्या ध्यानांत आणून देण्यासाठीं, खऱ्या सुखाची आणि नित्यसमाधानाची प्राप्ति कशी होते याचा मार्ग त्याला स्पष्टपणें दाखविण्यासाठीं, आणि सुखाच्या लालचीनें आडमार्गाला धांवत सुटलेल्या दुःखी जीवांना परत मार्गावर आणण्यासाठीं, वेळोवेळीं मोठमोठ्या विभूतींचा अवतार झालेला आढळून येतो. श्रीसाईबाबा हे अशाच अवतारी विभूतींपैकीं एक होते. साठ वर्षे ते शिर्डी हें आपल्या नित्यनिवासाचें स्थान करून राहिले होते. त्यांचा जन्म कोठें झाला, त्यांचे आईबाप कोण होते, त्यांचें शिक्षण किती झालेलें होतें, इतकेंच काय पण ते धर्मानें हिंदु होते कीं मुसलमान या गोष्टींसंबंधानें निर्णायक मत देण्यासारखा पूर्ण विश्वसनीय असा कोणताच पुरावा उपलब्ध नाहीं. त्यांचें मूळ गांव कोणतें, त्यांचें खरें नांव काय, त्यांचें बाळपण कसें गेलें, त्यांना कोणीं वाढविलें, यासंबंधीं कांहींही माहिती मिळत नाहीं. लोकांना अज्ञात असलेल्या, एका लहानशा खेड्यांत राहिलेल्या, आणि संपत्तीचा थाटमाट अथवा पांडित्याची कीर्ति अशासारख्या कोणत्याच लौकिक गोष्टींचा काडीमात्र मपका नसलेल्या या पुरुषानें आपल्या हयातींतच नव्हे तर आपल्या निर्याणानंतरही लक्षावधि लोकांचें अंतःकरण खेंचून घ्यावें आणि त्यांच्या संसारतप्त मनांना समाधानाची शीतलता मिळवून द्यावी हें केवढें नवल !

पण यांत नवल तरी कसलें ? अज्ञानाच्या अंधकारांत चाचपडत पडलेल्या मानवजातीला सत्याचा प्रकाश दाखवून सन्मार्गाला लावणाऱ्या अवतारी विभूति, ह्या प्रारंभीं जगानें उपेक्षिलेल्या होत्या असेंच नेहमीं आढळून येत नाहीं काय ? आज हजारों वर्षे ज्याच्या तत्त्वोपदेशानें असंख्य जीवांचें परमकल्याण झालें आहे, त्या भगवान् श्रीकृष्णाचा जन्म कैद्याच्या कोठडींतच झाला होता ना ! अर्ध्या जगाने ज्याच्यापुढें आपलें मस्तक विनम्र केलें आहे त्या येशू ख्रिस्तानें गुरांच्या गव्हाणींतच जन्म घेतला होता ना ! जगाच्या सर्व भागांत ज्यांचा अमृतसंदेश हळूहळू पण अधिकाधिक पसरू लागला आहे त्या श्रीरामकृष्ण परमहंसांचें जगांतले अवतारकार्य, एका छोट्या खेड्यांतल्या चंद्रमोळी झोंपडीच्या पडक्या खोलींतच सुरू झालें होतें ना ! पण जगाला अज्ञात अशा परिस्थितींत आपल्या लौकिक जीवनाला प्रारंभ करणाऱ्या या विभूतींनीं आज जगाचा कानाकोपरा आपल्या अवतारकार्याच्या उज्ज्वल दीप्तीनें उजळून टाकला आहे. रात्रीच्या प्रशांत समयीं दंव पडत असतांना त्याचा यत्किंचित् आवाज कोणाला ऐकूं येत नाहीं. परंतु सकाळीं उठून पाहावें तों त्या दंवाच्या थेंबांनीं सर्व फुलें प्रफुल्ल आणि विकसित झालेलीं आढळून येतात. महान् विभूतींचें कार्यही असेंच गाजावाजा न होतां अत्यंत शांतपणें होत असतें. माणसांचीं मनें विकसित करण्याचें आणि त्यांना चिरसुख देण्याचें हें कार्य असतें.

श्रीसाईबाबांचें चरित्र जो कोणी वाचील, त्यालाही मानवजातीच्या कळवळ्यानें परदुःख नाहींसें करण्यांत बाबांच्या जीवनांतला क्षणन् क्षण कसा खर्च होत होता हें दिसून येईल. मनुष्याला त्याच्या दीनस्थितींतून बाहेर काढून सुखाचा लाभ करून

देणारा, त्याला स्वानंदसाम्राज्याच्या सिंहासनाच्या प्राप्तीचा मार्ग दाखवून देणारा हा महात्मा स्वतः भिक्षावृत्तीनें गुजराण करीत होता, लांकडाच्या फळीवर झोंपत होता आणि एका उपेक्षित मशिदींत राहात होता. परंतु ज्या ज्या वस्तूंना त्यांनीं स्पर्श केला त्या त्या सर्व वस्तु आज त्यांच्या त्या दैवी स्पर्शामुळें दिव्यतेज लामून राहिल्या आहेत; कष्टी जीवांना दिलासा देण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत उत्पन्न झालें आहे.

बाबांनीं स्वतःचें स्वतंत्र, विशिष्ट असें कोणतेंहि तत्त्वज्ञान सांगितलें नाहीं. षड्-दर्शनांप्रमाणें 'साई–दर्शन' म्हणून कोणतीहि तत्त्वविवेचनाची नवी शाखा उत्पन्न झालेली नाहीं. पण त्यांचें अवघें जीवन हेंच मुळीं संपूर्ण व महान् तत्त्वज्ञानाचा साक्षात्कार घडविणारें होतें. त्यांच्या चरित्रांत अनेक चमत्कारांच्या विविध घटना आढळून येतात. या घटना वाचीत असतां, अरबी भाषेंतील सुरस गोष्टी वाचून वाचक थक होतो, त्याप्रमाणें वाचकाचें मन विस्मयचकित होऊन जातें. पण हे चमत्कार म्हणजे साईलीलेचें खरें रहस्य नव्हे. या चमत्कारांच्या बुडाशीं आढळून येणारी बाबांची दीन-वत्सलता, अनासक्ति, धगधगीत वैराग्यवृत्ति, चित्ताची समता आणि आत्मतृप्ति या गोष्टींत त्यांचें विभूतिमत्व सांठविलेलें आहे.

प्रस्तुत पुस्तकाच्या एकवीस प्रकरणांत साईबाबांच्या जीवनांतील अनेक उद्बोधक कथा अत्यंत जिव्हाळ्यानें आणि सुलभ भाषेनें वर्णन करून सांगितलेल्या आहेत. बाबांवरील भक्तीनें प्रेरित होऊन लेखकानें या गोष्टी कथन केल्या आहेत. त्या सांगतांना उपदेशकाचा भाव त्यानें कोठेंही आणलेला नाहीं अथवा प्रचारकाचा थाट त्यानें कोठें मांडलेला नाहीं. बाबांच्या जीवनांतील ज्या गोष्टी त्याला स्वतःला अत्यंत मनोवेधक वाटल्या, हृदयस्पर्शी भासल्या व त्याच्या मनानें बोधप्रद ठरल्या, त्या त्यानें येथें दिल्या आहेत. या गोष्टी सांगतांना लेखक स्वतः त्यांत रंगून गेला आहे; त्यामुळें त्या वाचतांना लेखकाच्या आंतरिक तळमळीचा स्पर्श होऊन वाचकही त्यांत नकळत रंगून जावा इतक्या त्या नितांतरम्य वठल्या आहेत. 'आपण फक्त बाबांच्या गोष्टी सांगायच्या, त्यांतील उपदेश वाचक आपापल्या वृत्तीप्रमाणें ग्रहण करतील, आपलें काम प्रवचनाचें नसून निवेदनाचें आहे' असें लेखकानें मनोमन ठरविलेलें असलें तरी, त्याला नकळत त्यानें बाबांच्या जीवनदृष्टीचें दर्शन वाचकांना मधून-मधून घडविलें आहे. तें त्यानें सहज, नकळत आणि स्वाभाविक स्फूर्तीनें केलेलें असल्यामुळेंच सरस व मनोज्ञ वठलें आहे.

बाबांच्या एकंदर अवतारकृत्याची दिशा कशी होती त्याचें लेखकानें सहजगत्या केलेलें पुढील वर्णन पहा. पृष्ठ ११ वर तो लिहितो, 'महाराजांचे पुष्कळ भक्त बाबांना साधकाचे सिद्ध झालेले मानीत नसून प्रत्यक्ष परमेश्वराचा अवतार मानतात. बाबा स्वतः मात्र कांहींही बोलतांना अगर उपदेश करतांना हा अधिकार आपल्या-कडे घेत नसत. त्यांच्या बोलण्यांत नेहमीं 'अल्लाचा' सेवक,' 'बंदा' असे शब्दप्रयोग असत. ते स्वतः असें म्हणत कीं, 'माझ्यावर माझ्या गुरूची पूर्ण कृपा आहे. मी

केवळ निमित्तमात्र आहें. गुरूच्या कृपेनें आणि आशीर्वादानें मी भक्तांची संकटांपासून मुक्तता करतों, आणि त्यांना सन्मार्गांची दिशा दाखवून देतों.' साठ वर्षांच्या काळांत त्यांचा भक्तसंप्रदाय हजारोंनीं वाढला, पण त्यांपैकीं एकाहि व्यक्तीजवळ बाबांनीं 'अनल हक' म्हणजे 'मी स्वतः परमेश्वर' असे उद्गार काढले नाहींत. 'मी परमेश्वराची ओळख करून देतों, स्वतः मी देखील दयाघन परमेश्वराचा बंदा सेवक आहे.' असेंच ते सर्वांना म्हणत. नुसती तोंडानें बडबड करण्यापेक्षां हातानें कृति करून दाखविण्याकडे बाबांचा कल होता. एखाद्या धर्मोपदेशकाप्रमाणें लांब लांब प्रवचनें किंवा व्याख्यानें देऊन सदुपदेश करण्याचा बाबांनीं प्रयत्न केला नाहीं. सहज एखादी लीला ते करून दाखवीत, आणि त्याचा गहनगूढ अर्थ समजण्यास इतरांना मात्र आपल्या बुद्धीला चालना द्यावी लागे.'

बाबांचें सर्व 'लीला–रहस्य' या एका उताऱ्यांत सांठविलेलें आहे असें म्हणण्यास मला तरी कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. अतर्क्य सामर्थ्य अंगीं असलेल्या बाबांच्या ठिकाणीं असलेली लीनता पाहिली म्हणजे 'अणोरणीयान् महतो महीयान्' या शब्दांची आठवण झाल्याविना राहात नाहीं. या श्रीसाईलीलामृतांतील कथा वाचून वाचकाचें मन कांहीं काळ तरी संसारताप विसरेल आणि अंतःकरणाला चिरसमाधान मिळवून देणाऱ्या ईश्वरभक्तीच्या मार्गाकडे तें ओढ घेऊं लागेल याबद्दल संशय नाहीं. नित्यसुख हवें असल्यास 'आत्मा अरे वा द्रष्टव्यः श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः' असें प्राचीन ऋषींनीं सांगितलें आहे. आत्मदर्शन करून घ्या, त्याचें श्रवण करा, नित्य मनन करा, त्याचा निदिध्यास लावून घ्या, असें त्यांचें सांगणें आहे. आजच्या काळांत आत्मदर्शन करून घेण्याचा खडतर ज्ञानमार्ग हा सर्वसुलभ राहिलेला नाहीं. पण अनेक साधुसंतांनीं व अवतारी पुरुषांनीं सोपा भक्तिमार्ग मात्र उजळ करून ठेविला आहे. त्या मार्गाचा अवलंब करण्यासाठीं, एका शब्दाचा बदल करून 'श्रीसाई वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः' असें कोणीं म्हटलें तर तें यथार्थ व कालोचित ठरेल, नव्हे काय ?'

---


आर. एन्. शिंदे ॲण्ड सन्स्

चष्म्यांचे व्यापारी

मुख्य दुकान : २०७, गिरगांव राड, मुंबई ४

शाखा : [१] चामार बाग रोड, परळ, मुंबई १२.

[२] मुकुंद मॅनशन, न. चिं. केळकर रोड, दादर, मुंबई २८

# श्री साईनाथ माहात्म्य !

॥ अभंग

श्रीसाईनाथ । शिरडी निवासी ॥
भक्तिभावें त्यासि । दंडवत ॥ १ ॥

भक्तांचिया काजा । साईनाथ बाबा ॥
अवतरले बा । शिरडी धामीं ॥ २ ॥

महाधाम चार । तीर्थेंहि तीं फार ॥
शिरडीसी अपार । भक्त मेळा ॥ ३ ॥

दर्शनासि त्यांच्या । भक्त–जन येती ॥
लीला त्यां दाविती । साईबाबा ॥ ४ ॥

साईनाथ होय । काम–कल्पद्रुम ॥
स्वयंभू तें धाम । शिरडी ग्राम ॥ ५ ॥

म्हणूनियां जाइ । भक्त जनांसवें ॥
साईनाथा–सेवे ॥ प्रेमादरें ॥ ६ ॥

साई हे माउली । भक्तांसि साउली ॥
धैर्यदायि भली । निजभक्तां ॥ ७ ॥

म्हण साईप्रति । जानकाचा सुत ॥
करावें तें हित । साईनाथ ॥ ८ ॥

—भिकाजी रामचंद्र पेडणेकर

# संतांचे उपकार

: लेखिका :
सौ. लीलाबाई
ज. पुरंदरे

काय या संतांचे मानूं उपकार । मज निरंतर जागविती ।
काय देवा यांसी व्हावें उतराई । ठेवितां हा पायीं जीव थोडा ।
सहज बोलणें हित उपदेश । करूनी सायास शिकविती ।
तुका म्हणे वत्स धेनूचिया चित्तीं । तैसे मज येती सांभाळीत ॥

संत तुकोबारायांची ही अभंग वाणी म्हणजे संतांच्या प्रेमळपणाचें, त्यांच्या सर्वज्ञतेचें, त्यांच्या आध्यात्मिक निष्ठेचें आणि सामर्थ्याचें आविष्कार वाणीनें प्रस्थापित केलेलें अभंग प्रतीकच !

तुकोबारायांचें अंतःकरण, सामान्य जनांना महासुखप्राप्ति व्हावी म्हणून संतांनीं जो बोध केला आहे तो वाचून, ऐकून, मनन करून संतांनीं केलेल्या उपकृतीविषयीं कृतज्ञतेनें इतकें भरून आलें कीं, ह्या संतांचे आपल्यावर कधींहि न फिटणारे उपकार आहेत, असे उद्गार त्यांच्या मुखांतून निघाले. ते म्हणतात 'काय या संतांचे मानूं उपकार । मज निरंतर जागविती'. संतांचे उपकार वर्णावे तेवढे थोडेच आहेत. आनंदघन–दीनदयाळाच्या चिंतनाचा, उपासनेचा, भजनाचा व नामस्मरणाचा–विसर पडूं नये, म्हणून ते वारंवार जाणीव करून देतात कीं, हृदयमंदिरांत सतत प्रभुस्मरणाची जागृति ठेव, प्रभुचिंतनाच्या कामीं आळस, झोप उचित नाहीं; कारण प्रभुचिंतनाच्या कामीं आळसानें झोंपी गेलास, तर तुला विषयोपभोगाची दुःस्वप्नें पडतील आणि तुझ्या अंतरंगीं रज–तमाचे विकार निर्माण होतील, आणि ते तुझी शांति नष्ट करतील. म्हणून सावध रहा आणि विकारांच्या आधीन न होतां विवेकयुक्त क्रिया कर; म्हणजे तुला महासुख–निधानाची सहज प्राप्ति होईल.

असा प्रेमळ उपदेश करणाऱ्या संतांचे उपकार वर्णन करणें ही शब्दांच्या सामर्थ्याच्या पलीकडली गोष्ट आहे. तरी त्यांनीं केलेल्या उपकारांची जाणीव असल्यामुळें ते देवाला विचारतात कीं, देवा ! ह्या संतांचे अंशतः उतराई होण्यासाठीं मीं करावें तरी काय ? तूंच सांग. अर्थात् देवाला ही विनवणी करीत असतांना 'ठेवितां हा पायीं जीव थोडा' असें म्हणून संतांच्या पायीं माझे पंचप्राण वाहिले तरी सुद्धां त्यांच्या उपकाराची फेड होणार नाहीं, ह्याची जाणीव करून दिली आहे. संतांचें सहज बोलणें सुद्धां, सामान्य जनांना हितप्रद होईल अशा उपदेशामृतानें भरलेलें असतें. म्हणजे अज्ञानी, प्रपंचांतील आपत्तींनीं व्याकूळ झालेल्या हीन दीन जीवांना विषयोपभोगांच्या ठिकाणीं

अंतःकरण निर्विकार करून निष्का मनानें सत्कार्यरत होण्याचा उपदेश ते करतात. इतकेंच नव्हे तर संत स्वतः श्रम घेऊन महासुखाचें साधन मिळविण्याच्या कामीं, आम्हीं काय काय करावें आणि कसें वागावें, ह्याची शिकवण देतात.

शेवटच्या कडव्यांत तुकोबाराय म्हणतात, 'तुका म्हणे वत्स धेनूचिया चित्तीं। तैसे मज येती सांभाळीत.' येथें तुकोबारायांनीं संतांना गाईची उपमा दिली आहे, आईची नव्हे. कारण आई ही प्रेमळ मार्ग दर्शन करणारी खरीच, तरी पण न जाणो, बालक चुकलें तर ती वाचायुक्त असल्यामुळें शब्दांनीं ताडण करण्याचा संभव आहे. आणि संत तर दया–क्षमा–शांति ह्या तीन देवतासम असलेल्या वृत्तींची साक्षात् मूर्ति। तेव्हां त्यांच्या ठिकाणीं, प्रेमानें कां होईना, पण रोष संभवतच नाहीं। म्हणून संत हे गाईसारखे असें म्हटलें आहे. कारण वत्स कुठेंहि असो त्याच्याविषयींचें प्रेम गाय जाईल तेथें आपल्या मनांत ठेवीतच असते. शिवाय अडचणीच्या ठिकाणीं, धोक्याच्या जागीं वत्स जाऊं लागलें तर त्याला कोणत्याहि प्रकारें न दुखवितां गाय स्वतः त्या आडमार्गी उभी राहून, वाट अडवून वा अन्य युक्तीनें वत्साला वळवून योग्य मार्गावर आणते. त्याप्रमाणें माझें कुठें चुकूं नये म्हणून वारंवार उपदेश करून कोणत्याहि प्रकारचा माझ्याविषयीं मनांत रोष न ठेवतां, मी वत्स जो ह्या भव–कुरणांत चरत आहें, त्यां मला काम–क्रोधादि आडवाटांपासून परावृत्त करून, सांभाळून घरीं–म्हणजे स्वस्वरूपीं वारंवार आणून ठेवतात. अशा ह्या संतरूप कामधेनू मुमुक्षूच्या सर्व कामना पुरवून सुखाची समृद्धि देणाऱ्या आहेत.

संत देवापेक्षांहि दयाळू आहेत. .कारण भवसागरांत पडलेल्या मानवांना बुडतांना पाहून, दुःखें, आपत्ति, शोक, निराशा आदि विपत्तींत त्यांचा होत असलेला कोंडमारा पाहून ह्या दुःखी जीवाविषयीं त्यांच्या अंतःकरणांत अपार दया निर्माण होते; आणि मग ते देवाप्रमाणें तटस्थ न रहातां, कर्मांच्या ठिकाणीं पूर्ण उदासीनता–निवृत्ति प्राप्त झाली असूनहि उपदेश करण्याचें मार्गदर्शन करण्याचें पवित्र कर्म करण्यास उद्युक्त होतात.

कोणत्याहि प्रकारें फळांची अपेक्षा न करतां, केवळ स्वतःचें कर्तव्यकर्म आचरणांत आणण्याच्या बुद्धीनें उपदेश करण्याचें संतांचें कार्य म्हणजे निष्काम कर्मयोगाचें एक उज्वल उदाहरण होय। 'मानवांनो, जीवनाचा पथ आक्रमीत असतां सदाचरण, सद्विवेक, सद्भावना आणि ईश्वरभक्ति यांची नित्य स्मृति ठेवा आणि शुद्ध मनानें, शुद्ध अंतःकरणानें, शुद्धबुद्धीनें सतत सक्रियाच करून आपलें जीवन सफल करा. आणि आपला जीवन–पथ नित्य प्रकाशित असावा, तो सुखावह व्हावा, असें वाटत असेल तर निष्ठेच्या मन्य दीपामध्यें ईश्वर भक्तीची ज्योत अखंड तेवत ठेवा.' असा कळकळीचा उपदेश करणारे संत धन्य आहेत आणि त्यांचा उपदेश ऐकणारे, तो पाळणारें मानव देखील धन्यच; कारण तो उपदेश आचरणांत आणून तेहि संतच होतात.

जीवनाचें मोल देऊन देखील न फिटणारे उपकार आपल्यावर संतदयाळांनीं केले आहेत, आपण त्यांचे ऋणी आहोंत। ऋण फेडण्याचें राहो, पण त्यांच्या अमोल

एका साधकाचा मनोवेधक अनुभव

# गुरुकृपेनें वासनाजय

लेखक : पुरुषोत्तम मराठे

श्री. दिलीपकुमार रॉय या नांवाचे एक बंगाली गृहस्थ योगी श्रीअरविंद यांचे एकनिष्ठ भक्त आहेत. श्रीअरविंदांच्या पाँडिचरी आश्रमांत ते अनेक वर्षे राहिले होते आणि अरविंदांच्या मार्गदर्शनाखालीं त्यांनीं योगाभ्यास केला होता. बहुश्रुत, रसिक पण चिकित्सक असल्यामुळें त्यांच्या मनाला अध्यात्मसाधनेविषयीं वेळोवेळीं पडणारे प्रश्न ते अरविंदांना पत्रद्वारें स्पष्ट विचारीत, आणि श्रीअरविंद पत्रद्वारेंच त्यांच्या शंकांचें निरसन करण्यासाठीं सविस्तर विवेचन करीत.

ईश्वराला संपूर्णतः शरण जाणें म्हणजे काय करायचें ? असा प्रश्न दिलीपकुमारांनीं एकदां श्री अरविंदांना विचारला होता. त्या प्रश्नाचें उत्तर देतांना अरविंदांनीं लिहिलें—

'ईश्वरप्राप्तीची खरीखुरी आस माणसाला लागली म्हणजे त्याचें चित्त शुद्ध करण्याचें, त्याची साधना अधिकाधिक प्रखर बनविण्याचें आणि त्याला दैवी अनुभव मिळवून देण्याचें कार्य ईश्वरच करीत असतो. देवावर पूर्ण विश्वास हवा, संपूर्ण श्रद्धा हवी; आणि त्याला शरण जाण्याची खरीखुरी अंतःकरणापासूनची तीव्र इच्छा हवी. आपल्या स्वतःच्या प्रयत्नांनीं कांहीं घडतें असें न मानतां आपला सर्व भरिभार पूर्णतः देवावर टाकण्याची प्रवृत्ति दृढ झाली पाहिजे. मीं माझ्या स्वतःच्या साधनेंत हीच वृत्ति ठेवली होती; माझ्या योगाच्या शिकवणुकीचा हाच गाभा आहे. पण ही वृत्ति एकदम निर्माण होत नाहीं, ती हळूहळू वाढत जाते. आपल्या मनाला जसजशी स्थिरता प्राप्त होईल तसतशी ही वृत्ति वाढीस लागेल.

'देवाला शरण जा, सर्व कांहीं त्याला अर्पण करा, असें मी जेव्हां जेव्हां म्हणतों तेव्हां तेव्हां अंतःकरणाच्या या प्रवृत्तीबद्दल हें मी बोलत असतों...

'या अंतःकरण प्रवृत्तीचें प्रमुख लक्षण म्हणजे ईश्वरावर संपूर्ण श्रद्धा व विश्वास हें होय. असा निष्ठावान् माणूस असें म्हणतो, 'मला ईश्वरप्राप्तीखेरीज दुसरें कांहीं नको. मी ईश्वराला संपूर्ण शरण गेलों आहें. त्याच्या प्राप्तीचा एकमेव निदिध्यास मला लागून राहिला आहे. त्याचें दर्शन मला अवश्यमेव झालेंच पाहिजे. अमुक वेळींच आणि अमुक तऱ्हेनेंच त्याचें दर्शन व्हावें असें मी म्हणत नाहीं. तें मी सर्वस्वीं त्या दयाघनावर सोपविलेलें आहे. मी त्याच्यावर दृढ निष्ठा ठेवून राहीन, त्याच्या इच्छेपुढें मान लववीन, त्याच्या दर्शनाची आस उराशीं बाळगून संसारांतील सर्व

उपदेशाप्रमाणें वागण्याचें जरी आपण ठरविलें तरी देखील आपल्याला त्यांची अल्पशी सेवा केल्याचें समाधान लाभेल, कारण तुकोबा म्हणतात, 'जे कां रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले। तोची साधु ओळखावा। देव तेथेंची जाणावा ॥

ज्या दीन दुबळ्या दुःखी जीवांना आपले म्हणून संतांनीं उपदेश केला आहे, त्यांतलाच मीहि एक जीव आहे, माझें अज्ञानजन्य दुःख नष्ट करण्याचें कार्य ज्या महान् संतांनीं केलें त्या संतांच्या ठिकाणीं देव आहेच आहे असा अनुभवहि मला आला आहे. कारण ते शेवटीं म्हणतात, 'तुका म्हणे सांगूं किती। तेचि भगवंताची मूर्ती ॥' तुकोबारायांचे हे अनुभवाचे बोल आहेत. म्हणून अज्ञानी, दुःखी, भवतापांत तळमळणाऱ्या जीवांना आपले म्हणून संतांनीं त्यांच्याशीं आपुलकीचें नातें जोडल्याबरोबर ते अभागी जीव भाग्यवान् झाले. असो. दीन दुबळ्या अभागी जीवांना आपल्या सामर्थ्यानुरूप जमेल तसें साहाय्य देण्याचा प्रयत्न करा, असा बोध साधुसंतांनीं केला आहे. त्याला अनुसरून आपल्या प्रपंचाचा भार वाहात असतांना शक्य झाल्यास दुःखी जीवांचें दुःख निवारतां आलें तर तें आपण अवश्य निवारावें, म्हणजे अंशतः तरी साधु-बोधाचें सार्थक होईल.


जीवनाला योग्य वळण लावून मोक्षमार्गावर बुद्धिरूप जीवात्म्याला आणून सोडण्याचें महत्कार्य संत करतात. शेवटीं श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, 'मोक्षरेखे आला। भाग्यें विनटला। साधुंचा अंकिला। हरिभक्त ॥'. केवळ हरिभक्त नव्हे, तर साधूंनीं ज्याच्यावर कृपा करून ज्याला उपदेशामृत पाजलें आहे, असाच हरिभक्त परमभाग्याचा. कारण तो साधुबोधाला पात्र झाल्यामुळेंच केवळ मोक्षाच्या सीमेपर्यंत जाऊं शकतो. चिरसौख्यद अशा ब्रह्मपदावर आपल्याला नेऊन बसविणाऱ्या संतांचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. ते उपकार फेडण्याचा प्रयत्न न करतां, 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती।' या संतोक्तीवर पूर्ण निष्ठा ठेवून ईश्वरी योजनेमुळेंच आपल्यावर उपकार करण्यासाठींच संत प्रगट होतात असें मानून, आपलें आपण समाधान करावें आणि आपण त्यांना नित्य शरण जावें यांतच आपलें हित आहे.

---

## अभिप्राय

**प्रभुप्रभातः**—'प्रभुप्रभात' या मासिकाचा दिवाळी अंक प्रतिवर्षाप्रमाणें वाचनीय निघाला आहे. वाङ्मयप्रभु श्री. खं. स. त्रिलोकेकर यांच्या आगामी ग्रंथांतून घेतलेला श्रीज्ञानेश्वरांविषयींचा लेख विचारप्रेरक आणि उद्बोधक आहे. कथा, लेख, कविता इत्यादींनीं सजलेला हा अंक वाचकांना आवडावा.

---



[ काल्पनिक

रहाटयास बाबा जेव्हां जात । झेंडू जाई जुई आणित ॥
निजहस्तें उखरीं खुपसीत । पाणीही घालीत नेमानें ॥

( साईसचरित अ. ५ ओंवी ४६



( काल्पनिक )

तैसेच हे श्रीसाईनाथ । तरुण सोळा वर्षांचे वयांत ॥
निंबतळीं शिरडी गांवांत । प्रथम भक्तार्थ प्रकटले ॥

[ साईसच्चरित अ. ४ ओंवी १११ ]

प्रसंगांना, अडचणींना तोंड देईन. माझें मन स्थिर होऊन सदैव त्यांच्या चिंतनांत निमग्न होऊन राहो. कांहींहि घडो, माझी ही दर्शनाकांक्षा मी सतत जागृत ठेवीन आणि ईश्वर माझी 'ही' इच्छा पुरी करीलच करील अशा दृढ निष्ठेनें राहीन.'

'ही वृत्ति वाढीस लागली पाहिजे. एकदम ही वृत्ति चुटकीसरशीं उत्पन्न होणार नाहीं. ही वृत्ति एकदां जागृत झाल्यावर ईश्वरावर सर्व सोंपवून स्वस्थ राहावें, आपल्या मनाच्या नानाविध लहरींना या वृत्तींत ढवळाढवळ करूं देऊं नये...

'साधनेचा हा एकमेव मार्ग आहे असें नाहीं. इतरहि अनेक साधनामार्ग आहेत. पण मला माहीत असलेला मार्ग हाच-दृढ निष्ठेचा, संपूर्ण श्रद्धेचा...

'मार्ग कोणताहि पत्करला तरी चालेल, पण एकदां एक मार्ग निश्चित केला म्हणजे मग मात्र चिकाटीनें 'देहं वा पातयेत् अर्थं वा साधयेत्' अशा निश्चयानें त्या मार्गाची अखेर गांठली पाहिजे.'

दिलीपकुमार साधनेचें असें शिक्षण श्रीअरविंदांकडून घेत असतांना अत्यंत क्षुल्लक दिसणाऱ्या मनःप्रवृत्तींशींहि त्यांना कसें झगडावें लागलें आणि गुरूला शरण जाण्यानेंच आपल्या मनावर त्यांना कसा विजय मिळवितां आला याचें मनोवेधक वर्णन त्यांनीं अनेक ग्रंथांतून केलें आहे. त्यांतील एक उद्बोधक अनुभव त्यांच्याच शब्दांत खालीं देतों. ते लिहितात.

'आपल्या अंतःकरणांत उसळणाऱ्या विविध वासनांचें निर्मूलन करण्याचा जों जों मी प्रयत्न करूं लागलों, तों तों हा प्रयत्न किती खडतर आहे याचा मला अनुभव येऊं लागला.

'सामान्यपणें मला माझा क्रोध आंवरणें हळूहळूं शक्य होऊं लागलें, पण क्रोध प्रकट केला नाहीं तरी, मनालाहि चीड वाटूं नये, हें मात्र जमेना. अनेकदां अत्यंत रुचकर पदार्थ खाण्याचें नाकारणें मला शक्य होई, पण त्या पदार्थांची वासनाच सुटांवी हें मात्र शक्य होत नसे.

'मी प्रथमतः आश्रमांत आलों तेव्हां अर्थात्च तिथें असणारा शाकाहार मलाहि स्वीकारावा लागला. पण माझ्या बंगाली जिभेला मांस व मासळी—विशेषतः मासळी—यांची अतिशय ओढ होती. मासळीचा तिथल्या जेवणांतला अभाव मला अत्यंत जाणवे. मला शाकाहाराची संवय होईल, असें भविष्य लोकांनीं वर्तविलें होतें. पण तें भविष्य खरें ठरलें नाहीं. हळूहळूं मांसाबद्दलची माझी ओढ इतकी वाढली कीं, माझ्या मनाशीं मला त्या ओढीबद्दल सारखें भांडावें लागे! ही वासना जिंकण्याची मीं खूप धडपड केली, पण व्यर्थ! मला मासळीची स्वप्नें पडूं लागलीं! आठ वर्षें आश्रमांत राहून मी बाहेरच्या जगांत गेलों तेव्हां, माझी मासळीबद्दलची ओढ पहिल्या इतकीच कायम आहे, असें मला आढळून आलें जिभेच्या या लालचीला मी बळी पडलों. तीन महिन्यांनीं मीं परत आश्रमांत

आलों तो थोड्या उदास अशा वृत्तींतच. आजच्या सर्वश्रेष्ठ योग्याच्या हाताखालीं मीं साधनेचे पाठ घेतले आणि आश्रमाबाहेर जातां क्षणींच जिभेच्या असल्या क्षुल्लक लालचीला मी बळी पडलों, याची विलक्षण खंत माझ्या मनाला सारखी वाटत होती!

'पण मीं कितीहि भगीरथ निश्चय मनाशीं केले तरी कलकत्ता व इतर कोठें मी गेलों आणि जेवतांना माझ्या पुढ्यांत मासळी आली कीं ती खाण्याचा मोह कांहीं मला कधींहि आवरत नसे. पुन्हां पुन्हां मी मनाशीं निर्धार करीं कीं, 'बस्! यापुढें मासळीला स्पर्शहि करायचा नाहीं.' आणि पुन्हां पुन्हां तो निश्चय मोडे! माझ्या आप्तमित्रांनीं जेवतांना मासळीचा आग्रह केला कीं तो मला मोडवत नसे!

'हळूहळू मी सरळ उघडउघड मासळीवर ताव मारूं लागलों. सैतानानें बायबलचा आधार घ्यावा, तसें मी माझ्या या वासनेचें समर्थन करूं लागलों. १९३७ मध्यें एका मित्राला लिहिलेल्या पत्रांत मीं म्हटलें होते कीं, 'आध्यात्मिक दृष्टीनें सात्विक अन्नाच्या महत्त्वाचें उगाच अवास्तव स्तोम माजविलें आहे असें मला वाटतें. अन्न हा खरोखरी केवळ आरोग्याचाच काय तो प्रश्न आहे,' इ.

'पण मनांतली रुखरुख गेलेली नव्हती. अखेर ती माझ्या आयुष्यांतली संस्मरणीय रात्र आली. राजराव धीरेंद्र नारायण रॉय यांच्या राजवाड्यांत कांहीं दिवस तेव्हां माझा मुक्काम होता. त्यानें आग्रह केला तरी कित्येक दिवस मीं मासळीला स्पर्श केला नव्हता. परंतु त्या विशिष्ट रात्रीं त्यानें माझ्या सन्मानार्थ मोठ्या खान्याचा बेत केला होता. अनेक मोठमोठ्या साहित्यिकांना त्या रात्रीं जेवणाला निमंत्रण होतें. यजमान आणि मित्र यांनीं मला जेवतांना बराच आग्रह केला व त्या आग्रहाला बळी पडून मीं अखेर मला आवडणारीं शेवंडें आणि गंगेतील रुचकर 'हिलसा' यांवर यथेच्छ ताव मारला.

'या जेवणानंतर येणारी अनिवार्य प्रतिक्रिया मनांत सुरू झालीच. आजवर मला कधींहि वाटली नव्हती इतकी स्वतांबद्दलची शरम मला वाटली. त्या रात्रीं कांहीं केल्या मला झोंप येईना. अखेर मी उठलों; एकदोन उदबत्त्या लावल्या, आणि गुरुदेवांच्या फोटोसमोर बसून पश्चात्तप्त अंतःकरणानें त्यांची मीं मनोभावानें करुणा भाकली. त्यांचें स्मरण-चिंतन करूं लागतांच माझ्या डोळ्यांतून घळघळां अश्रू वाहूं लागले...

'वाचकांची कशी खात्री पटवून द्यावी हें मला समजत नाहीं. मी आतां जें सांगणार आहे तें त्यांना खरें वाटायचें नाहीं. परंतु मी त्यांना कळकळीनें सांगतों, कीं माझा पुढील अनुभव वर्णन करतांना मीं तो कोणत्याहि प्रकारें विकृत केलेला नाहीं. जसें घडलें तसें यथातथ्य सांगण्याचा प्रयत्न मी करीत आहे.

'त्या रात्रीं मला स्वप्नांमध्यें गुरुदेवांची तेजःपुंज आकृति दिसली. गुरुदेवांनीं मला आशीर्वाद दिला आणि म्हटलें, 'उद्यांपासून मासळीच्या वासनेवर तूं जय मिळविशील.'

'गुरुदेव अदृश्य झाले. मी जागा झालों. माझ्या अंतःकरणांत अननुभूत आनंदाच्या लहरी उसळत होत्या. दुसऱ्या दिवसापासून मीं मासळी खाण्याचें सोडून दिलें, इतकेंच

नाहीं तर ती खाण्याची माझी इच्छाहि नाहींशी झाली. त्यानंतर अगदीं प्रसंगात्र पडला त्यावेळीं मीं चुकून केव्हां तरी मासळी घेतली आहे, पण पूर्वीसारखी या पदार्थाची ओढ मला बिलकूल उरलेली नाहीं; जिनेनें आतां या वस्तूची गुलामगिरी पार झुगारून दिली आहे. त्या रात्रीनंतर 'आपण मासळी खावी' ही उर्मी माझ्या चित्तांत एकवारहि उठलेली नाहीं. गत वर्षी संगीताच्या निमित्तानें मीं लांबलचक दौरा काढला होता. अनेकदां पंक्तींत बसलेला असतांना मासळीचे विविध पदार्थ वाढपी घेऊन येत. पण त्यांची मला कधींच आसक्ती वाटली नाहीं. नंतर मला एकदां सहज माताजींचे शब्द आठवले. त्या म्हणाल्या होत्या कीं, एखादी वासना जिंकण्यांत तुम्हांला खरोखरचें यश मिळालें म्हणजे मग वासनापूर्तीपेक्षां वासना-त्यागांतच अधिक आनंद असतो असा तुम्हांला अनुभव येईल.

'श्रद्धा असली म्हणजे दैवी शक्ति तुमच्या साधनामार्गांत तुम्हांला साहाय्य करते असा वारंवार अनुभव येऊनहि त्याबद्दल पुन्हा पुन्हां संशय येत राहतो हें किती नवल आहे!'

---

# लेखकासाठीं सूचना

(१) लेख पानाच्या एकाच बाजूला सुवाच्य अक्षरांत शाईनें लिहिलेला असावा. डाव्या बाजूला भरपूर मार्जिन सोडावी.

(२) लेख, कविता वगैरे साहित्य प्रसिद्धीकरितां स्वीकारणें किंवा न स्वीकारणें अगर त्यांत थोडाफार बदल करणें हा अधिकार सर्वस्वीं संपादकांचा आहे. न स्वीकारलेले लेख परत पाहिजे असल्यास पुरेसें पोष्टेज पाठवावें. नापसंत लेख तीन महिन्यांनंतर निकालांत काढण्यांत येतील.

(३) लेखकानें आपलें पूर्ण नांव व पत्ता कळवावा. टोपण नांवानें लेख प्रसिद्ध करावयाचा असला तरीही पूर्ण नांव व पत्ता ऑफिसच्या माहितीकरतां कळविणें जरूर आहे.

(४) स्वीकृत लेख अंकांत प्रसिद्ध झाल्यावर यथाशक्ति मोबदला देण्यांत येईल.

—संपादक

---

# जीवन-सहलींतील मार्गदर्शक

लेखक : वा. ह शिंदे

जीवन हें दुःखदायक अगर दुर्दैवाची परवड आहे अशा दृष्टीनें त्याच्याकडे बघून उपयोग नाहीं. मृत्यु हा निश्चित आहे. स्वःतांला न समजणाऱ्या किंवा न रुचणाऱ्या गोष्टींवरून जीवनांत निरुत्साही होऊन, निष्कारण रुखरुख करीत बसण्यांत कांहींच अर्थ नाहीं.

आपण सहल करण्यास निघतों; त्याच दृष्टिकोनांतून जीवनाकडे पाहिल्यास, सहलींत जसा त्रास होतो, अडचणी येतात तसाच त्रास, अडचणी जीवनांत देखील येतात. पण सहलींत त्रास, अडचणी येऊन सुद्धां जसें एक प्रकारचें उत्साही वातावरण निर्माण होतें, तसेंच जीवनांतहि झालें पाहिजे.

सहलीच्या वेळीं अनोळखी प्रदेशांत, त्या प्रदेशाची पूर्ण माहिती असलेल्या वाटाड्याची जशी जरूरी भासते, तशीच हा संसार-सागर सुखा-समाधानानें तरून जाण्यासहि वाटाड्याची जरूर असते.

विद्या संपादन करणें हा जीवनांतील पहिला टप्पा होय. त्यासाठीं सुविद्य गुरूची जरूरी असते. तसेंच संसार-सागर सुखा-समाधानांनें तरून जाण्याच्या दुसऱ्या टप्प्यासहि साधुसंतांसारख्या सद्गुरूची जरूरी असते.

जीवनांतील हा दुसरा टप्पा ओलांडून जाण्याच्या बाबतींत मानव इतका बेफिकीर किंवा संसारांत गुरफटून गेलेला दिसून येतो कीं, कांहीं कालपर्यंत त्याला या गोष्टींचा विचारहि करण्यास वेळ मिळत नाहीं.

सोडलेला बाण, वाहून गेलेलें पाणी, बोलून गेलेला शब्द आणि निघून गेलेलें आयुष्य परत येत नाहीं, हें प्रत्येकाला कळतें. पण हें कटु सत्य उशिरां सुचण्यांत काय अर्थ आहे ? उतार वयांत, रुक्ष वाळवंटाच्या किनाऱ्याला येऊन पोहोंचल्यावर दुर्दैवी प्रवाशासारखी स्थिती झाल्यावर, तेथून परत मागें फिरेन म्हटलें तरी तें शक्य होणार आहे का ? बरें ! उतार वयांतहि रुक्ष वाळवंट तुडवून पैलतीराला जाणें तर क्रमप्राप्तच आहे. . पण— कण्हत, कुंथत, तडफडत आणि मागें आशा ठेवून पैलतीरीं जाण्यांत तरी काय अर्थ आहे ? आणि म्हणूनच आधींपासून पैलतीरीं जाण्याचा सुलभ आणि सुखकर मार्ग तयार करून ठेवणें जरूरीचें आहे. या दुसऱ्या टप्प्याचें मार्गदर्शन करणारे म्हणजे साधुसंतांसारखे सद्गुरू होत. तुकाराम महाराज म्हणतात,

सद्गुरुवांचोनी सांपडेना सोय । धरावे ते पाय आधीं त्यांचे ।
लोह—परिसाची न साहे उपमा । सद्गुरु—महिमा अगाधची ।
तुका म्हणे ऐसें आंधळे जन । गेले विसरून खऱ्या देवा ।

आणि ते कसे असावेत यासंबंधीं ते आपल्या दुसऱ्या एका अभंगांत म्हणतात,

अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ । त्याचे गळा माळ असो नसो ।
आत्मा अनुभवी चोखाळल्या वाटा । त्याचे माथा जटा असो नसो ।
परद्रव्य अंध निंदेसी जो मुका । तोचि संत देखा तुका म्हणे ।

वरील एकंदर गोष्टीचा विचार केल्यास, आधुनिक काळांत संसारी जीवन सुखा-समाधानानें तरून जाण्यास श्रीसाईबाबांच्या चरणीं श्रद्धेनें व भक्ति—भावानें लीन होणें हाच एक मार्ग आहे. कारण श्रीसाईबाबा हयात असतांना आणि समाधिस्थ झाल्या-वरहि त्यांच्या अनेक भक्तांना जे विविध अनुभव आले व मार्गदर्शन झालें, त्यावरून असें सिद्धच होतें कीं श्रीसाईबाबा सर्वश्रेष्ठ परमात्मा आहेत. त्यांची श्रद्धापूर्वक, मनो-भावानें भक्ति करणाऱ्यांचा सर्व भार ते वाहातात. ते आपल्या एका वचनांत म्हणतात 'साई म्हणे तोचि तोचि धन्य । झाला जो अनन्य माझ्या पायीं.'

तेव्हां श्रीसाईबाबांच्या चरणीं श्रद्धापूर्वक भक्तिभावें लीन झाल्यास, जीवनांतील सुलभ आणि सुखकर मार्ग खात्रीनें दिसतील.




## ऑगस्ट १९५३

या महिन्यांत बऱ्याच सोईस्कर अशा सुट्या होत्या व श्रावण मासामुळें धार्मिक सणही बरेच आले होते. त्यामुळें श्रीचे दर्शनास येणाऱ्या भक्त लोकांची गर्दी मागील महिन्यापेक्षां या महिन्यांत बऱ्याच प्रमाणांत वाढली होती. भक्तांकडून अनेक प्रकारच्या देणग्या श्रींस अर्पण करण्यांत आल्या. अभिषेक, अर्चन, पूजा, नैवेद्य वगैरे भक्तांचे धार्मिक विधि संस्थानतर्फे यथासांग केले गेले.

या महिन्यांत खालील कलावंतांनीं आपापल्या कलेची हजेरी श्रींपुढें दिली.

**भजन**—सिन्नरकर भजनी मंडळी, शनेश्वर भजनी मंडळ, संगमनेर व ह. भ. प. आत्मारामबुवा जयवंत–भिवंडी

**कीर्तन**—ह. भ. प. ताहाराबागकर बुवा

**हार्मोनियम वादन**—श्री. श्रीराम परशुराम कदम, सातारा

**गायन**—श्री. एस्. बी. परब, श्री. फाटक, श्री. डी. एन्. नाडकर्णी, श्री. एल्. ए. रांजणेकर, श्री. उमेशचंद्र व सौ. नलिनी मुळगांवकर, श्री. मालचंद पेंढारकर, मास्टर लहानु नागपुरे, व नारायणराव नागपुरे–मुंबई व डॉ. वासु भट, पुणें.

**नृत्य**—कु. शांता आर. गांधी (वय वर्षे ९) धुळें

श्रावण वद्य ८ स श्रीकृष्ण जन्मानिमित्त (गोकुळअष्टमीनिमित्त) संस्थान गवई यांचें कीर्तन समाधि मंदिरांत झालें. दुसरे दिवशीं रात्रीं श्रीच्या रथाची मिरवणूक गांवांतून निघाली. नेहमीप्रमाणें रथासमोर गारूड झालें. यंदाचा विशेष म्हणजे संस्थान नोकरवर्गातर्फे व संस्थान अधिकाऱ्यांच्या देखरेखीखालीं श्रीचे द्वारकामाईत गोकुळअष्टमीनिमित्त ता. २५–८–५३ ते ता. ३१–८–५३ पर्यंत अखंड नामसप्ताह झाला. त्या सप्ताहाच्या पोथीची मिरवणूकही श्रींच्या रथाबरोबरच काढण्यांत आली. श्रावण वद्य १० स गोपाळकाल्याचा कार्यक्रम होऊन तीर्थप्रसाद वांटण्यांत आला.

संत सावता माळी व संत नामदेव यांचे पुण्यतिथीनिमित्त व नेहमीप्रमाणें एकादशीस संस्थान गवई यांचीं कीर्तनें झालीं.

या महिन्यांत केंद्रीय मंत्रिमंडळांतील कृषिमंत्री नामदार डॉ. पंजाबराव देशमुख हे श्रींचे दर्शनास येऊन गेले.

# सप्टेंबर १९५३

श्रींचे दर्शनास येणाऱ्या भक्त लोकांची रीघ नेहमीपेक्षां या महिन्यांत जरा जास्त होती. अनेक कलावंत या महिन्यांत श्रींचे दर्शनास येऊन गेले व त्यांनीं समाधिमंदिरांत बाबांचे समोर आपापल्या कलेंची हजेरी दिली. गांवच्या लोकांनीं गांवांत गणपति-उत्सव साजरा केला होता, त्यानिमित्तही पुष्कळ कलावंत मुंबईहून आले होते त्यांनींही समाधिमंदिरांत आपली कला दाखवून श्रींची अल्प सेवा केली. या सर्व कलावंतांचा उल्लेख स्थलाभावीं करणें अशक्य होय याबद्दल वाईट वाटतें.

या महिन्यांत भक्तांकडून श्रींस अनेकप्रकारच्या देणग्या व वस्तू अर्पण करण्यांत आल्या. भक्तांचे धार्मिक विधि संस्थांतर्फे यथासांग पार पडले. नेहमींप्रमाणें एकादशीस संस्थान गवई यांची कीर्तनें झालीं. शिवाय अहिल्याबाई होळकर पुण्यतिथि निमित्तान, गणेशचतुर्थी निमित्तानें त्यांची आणखी दोन कीर्तनें झालीं.

चोराल। उपरति

याशिवाय नवल विशेष म्हणजे मागील महिन्यांत संस्थान हद्दींत कोणा एका भक्ताचे साधारण १२२ रुपये चोरीस गेले होते. ज्यानें हे पैसे लांबविले होते त्यास श्रीसाईकृपेंकरून उपरति झाल्यामुळें त्यानें या १२२ रुपयांपैकीं १०० रुपये इंशुअर्ड पोष्टानें संस्थानचे सर कारकून श्री. मो. त्र्यं. खडकतकर यांचे नांवावर, ते पैसे योग्य त्या इसमास देण्याविषयींची सूचना करून पाठविले. उरलेले पैसेही आपण लवकरच पाठवूं असें त्यानें पत्रांत लिहिलें आहे. ज्या भक्ताचे हे पैसे असतील त्यानें त्याबद्दल सरकारकून यांचेजवळ खात्री पटवून ते पैसे घेऊन जावें.

# ऑक्टोबर १९५३

या महिन्यांत श्रींचे दर्शनास येणाऱ्या भक्त लोकांची रीघ फार मोठ्या प्रमाणावर चालू होती. याच महिन्यांत श्रींचा पुण्यतिथी उत्सव होता. त्यानिमित्तानें व पुढें कोजागिरी पौर्णिमानिमित्तानें श्रींचा हजारों भक्तगण त्या १०।१२ दिवसांत येऊन गेला. अनेक भक्तांकडून श्रींस देणग्या व वस्तू अर्पण करण्यांत आल्या. भक्तांचे सर्व धार्मिक विधि संस्थानतर्फे यथासांग पार पडले.

खालील प्रसिद्ध कलावंतांनी आपल्या कलेंची हजेरी बाबांसमोर दिली—

गायन—श्रीपाद गोविंद नेवरेकर आणि मंडळी, पुणें; सौ. वत्सलाबाई पर्वतकर, मुंबई; श्री. जगन्नाथबुवा सुरतकर; श्रीमती शामला माजगांवकर, मुंबई; सौ. गुलाबबाई सुधगांवकर, मुंबई; श्री. वसंतराव तेंडुलकर, अहमदाबाद व श्री. गणपतराव गुरव, जळगांव.

सारंगी वादन—श्री. दत्ताराम पर्वतकर, मुंबई

तबला वादन–श्री. रामराव पर्वतकर, मुंबई

सनईवादन–श्री. दामुअण्णा बेलापूरकर

कीर्तन–श्री. दिगंबर शंकर देशपांडे, पुणें; ह. भ. प. छबुताई पुरोहित व सोनुताई लिमये (गोवर्धन संस्था, पुणें)

या महिन्यांत संस्थान गवई यांचें कीर्तनं एकाच एकादशीस (भाद्रपद वा॥ ११) झालें. आश्विन शु॥ १ स संस्थानचे एक विश्वस्त श्री. श्रीपाद बाळकृष्ण देव यांचे बाबांच्या पुण्यतिथीचें कीर्तन समाधि–मंदिरांत झाले.

**नवल विशेष**–ता. ७ रोजीं संत कैकाडी महाराज यांचें कीर्तन संस्थान कचेरी समोरील भव्य पटांगणांत झालें. श्रीसाईमहाराजांसारख्या संताच्या गांवीं अशा संतांच्या कीर्तनाचा कार्यक्रम म्हणजे 'जनसेवेनें' म्हटल्याप्रयाणें कोयना–कृष्णा संगमच. आसपासच्या गांवांहून हजोरों लोक कीर्तनास आले होते. दुसरा विशेष कार्यक्रम म्हणजे बाबांचा पुण्यातिथि उत्सव. हा उत्सव साईबाबा संस्थानतर्फे १७–१०–५३ ते १९–१०–५३ पर्यंत मोठ्या उत्साहानें व थाटामाटांत साजरा झाला. ह्या उत्सवाची समग्र हकीकत इतरत्र दिली आहे. कोजागिरी पौर्णिमेमिमित्तानेंहि हजारों भक्त शिर्डीस आले होते. संस्थान व्यवस्थापक समितीचे एक सन्माननीय सभासद डॉ. गव्हाणकर हे मुद्दाम दरवर्षी कोजागिरी पौर्णिमेस आपल्या अनेक मित्र मंडळीसह शिर्डीस येतात व कीर्तन, भजन, इ. रूपानें श्रींची सेवा करतात. याहि वर्षी ते आपल्या अनेक मित्रमंडळीसह आले होते. कोजागिरी पौर्णिमेनिमित्त श्रींचे मंदिरांत रात्रभर जागर करण्यांत आला. कीर्तन, भजन, गायन, तंतुवाद्यवादन वगैरे विविध प्रकारांनीं भक्त लोकांनीं श्रींची सेवा त्या रात्रीं केली. रात्रीं १२ चे सुमारास संस्थानचे सन्माननीय खजिनदार श्री. बाबासाहेब कीर्तीकर यांचे हस्तें श्रींचे पादुकांस अभिषेक, विष्णुसहस्रनामार्चन, तुळशीअर्चन, पूजा वगैरे कार्यक्रम होऊन नंतर चंद्रपूजा करण्यांत आली व पुढें संस्थानतर्फे दूध, नारळाचें पाणी, कॉफी, पेढे, साखर वगैरे प्रसाद भक्त लोकांस वांटण्यांत आला.

मुंबई राज्याचे उपमंत्री श्री. के. एफ. पाटील, महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. देवकीनंदन नारायण, सरदार मेजर भीमराव नागोजीराव पाटणकर, कोल्हापूर, हे या महिन्यांत आपल्या मंडळीसह श्रींचे दर्शनास येऊन गेले.

शिरडीचें हवापाणी उत्तम आहे. थंडी चांगलीच जाणवते.

## नोव्हेंबर १९५३

या महिन्याचें वैशिष्टय म्हणजे गर्दी. श्रींचे दर्शनास येणारे परगांवचे लोक रोज अक्षरशः हजारांनीं येत असत आणि त्यामुळें शिरडीस सबंध महिनाभर यात्रेचें स्वरूप प्राप्त झालें होतें. ता. ११, १२ व १३, तसेंच १९ व २७ या दिवशीं तर विलक्षण गर्दी होती. संस्थानची जागा अपुरी पडल्यामुळें व गांवांतही योग्य जागा न मिळाल्यामुळें

अनेक भक्त लोकांना उघड्यावर व लेंडीबागेंत झोंपण्याचा व राहण्याचा प्रसंग आला. रात्रीं चोऱ्यामाऱ्यांचे प्रसंग होऊं नयेत म्हणून ता. ११ व १२ या रात्रीं, तसेंच ता. २७-च्या रात्रींही रात्रभर विजेचे दिवे चालू ठेवण्यांत आले. त्यामुळें अनेक संभाव्य चोऱ्या-माऱ्यांचे प्रसंग टळले. संस्थानचे सरकारकून श्री. मो. त्र्यं. लडकतकर यांनीं या प्रसंगीं जातीनें लक्ष घालून भक्त लोकांची शक्य ती राहण्याची व इतर सोय केली. कित्येक वेळां त्यांनीं दुसऱ्या दिवशींच्या अभिषेकांची टिकिटें आदल्याच रात्रीं देण्याची व्यवस्था करून, तसेंच भोजनाची व स्नानाची कुपनें देण्याची वेळ वाढवून भक्तांच्या रांगांची संख्या व लांबी कमी केली. संस्थानतर्फें नवीन बांधकाम हातीं घेण्यांत आलें आहे.

या महिन्यांत भक्तांचे बरेच धार्मिक विधी होते. ते सर्व संस्थानतर्फें यथासांग पार पाडण्यांत आले. श्रींस बऱ्याच देणग्या व वस्तू अनेक भक्तांकडून मिळाल्या. तसेंच बऱ्याच कलावंतांनीं आपापल्या कलेची हजेरी श्रींचे समाधी–मंदिरांत दिली. ह. भ. प. नारायणबुवा दीक्षित, पुणें, व ह. भ. प. बाबा आळतेकर यांचे श्रींपुढें कीर्तनाचे व संगीत भजनाचे कार्यक्रम झाले. संस्थान गवई यांची दोन्ही एकादशीस नेहमीप्रमाणें कीर्तनें झालीं.

या महिन्यांतील नवल विशेष म्हणजे दिवाळीचा सण व तुळशीचे लग्न. या दोन्ही प्रसंगीं समाधि–मंदिरावर व इतरत्र संस्थानतर्फें विजेच्या दिव्यांची सुंदर रोषणाई करण्यांत आली होती. गुरुपादुकास्थानाजवळ संस्थानचे एक सेवेकरी श्री. कृष्णराव यांनीं पणत्यांची दीपमाळ लावून व विजेच्या दिव्यांची विशेष रोषणाई करून, सुशोभित फुलांच्या माळा नक्षीदार रीतीनें लावून या स्थानास फारच शोभा आणली होती. नहमीं-प्रमाणें नरकचतुर्दशीचे दिवशीं श्रींस सूर्योदयापूर्वी अगदीं पहाटेसच मंगलस्नान घालण्यांत आलें. दुसरे दिवशीं समाधिमंदिरांत लक्ष्मीपूजनाचा कार्यक्रम संस्थानचे स्थानिक विश्वस्त श्री. बाजीराव तात्या कोते पाटील यांचे हस्तें मोठ्या थाटांत करण्यांत आला दिवाळीचे चारी दिवस संस्थानतर्फें निरनिराळ्या प्रकारची शोभेची दारू उडविण्यांत आल्यामुळें बालगोपाळ मोठ्या खुषींत होते. द्वारकामाई व भोजनगृह या दोन्हीं ठिकाणी तुलसी-विवाहाचा कार्यक्रम वाद्यांच्या गजरांत व मोठ्या थाटामाटांत पार पाडण्यांत आला. दिवाळीनिमित्त सर्व संस्थान नोकरांस संस्थानतर्फें फराळ देण्यांत आला.

संस्थानतर्फें चालविण्यांत येणारा धर्मार्थ (होमिओ) दवाखाना दिवसदिवस प्रगतिपथावर आहे. या दवाखान्याचा फायदा आक्टोंबर महिन्यांत सुमारें १५०० रोग्यांनीं व नोव्हेंबर महिन्यांत सुमारें ११०० रोग्यांनीं घेतला या दोन महिन्यांत

दवाखान्यास बऱ्याच साईभक्तांनीं देणग्या दिल्या. त्यांतल्या कांहीं ठळक देणग्या खालीलप्रमाणें.

| | | | रु. | आ. | पै |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. के. एम्. वर्तक, मुंबई | आक्टोबर ५३ | १५० | ० | ० |
| २ | ,, दीना बॅक्स्टर, | ,, ,, | ५० | ० | ० |
| ३ | ,, सुपरिटेन्डण्ट अमिन ,, | ,, | ५० | ० | ० |
| ४ | मेसर्स डी. आर. बॅनर्जी अँड को., मुंबई ,, | | १०१ | ० | ० |
| ५ | श्री. ई. व्हि. राव नायडू | ,, | ५०० | ० | ० |
| ६ | ,, जाल बाटलीवाला, हुबळी-नोव्हेंबर १९५३ | | १२२ | ० | ० |

याशिवाय सौ. टी. सी. नसरवानजी, मुंबई या महिलेनें दवाखान्यास सुमारें ३०० रुपये किंमत असलेल्या एका 'इन्फ्रा-रेड रेडियंट हीट लॅंपची' देणगी दिली. तसेंच श्री. वर्तक यांनीं दिलेल्या देणगींत संस्थानतर्फे सुमारें ४०० रुपयांची भर घालण्यांत येऊन दवाखान्याकरितां एक 'अल्ट्रा व्हॉयोलेट रेज' चा दिवा घेण्यांत आला. या दोन वस्तुंमुळें दवाखान्याच्या उपयुक्ततेंत भर पडली असून रोग्यांची फारच उत्तम सोय झाली आहे.

श्री. आण्णासाहेब गोपाळराव आवटे, एम्. एल्. ए., अध्यक्ष पुणें जिल्हा कॉंग्रेस कमिटी, (२) श्री. नारायणराव रामजी उर्फ बाळासाहेब वाळुंज-एक शेतकरी कामकरी व सामाजिक कार्यकर्ते, तळेगांव दाभाडें (३) श्री. डी. पी. भाटकर-कोल्हापूर (४) श्री. व्ही. डी. कारखानीस (५) श्री. एफ्. राणा-नगर जिल्हाधिकारी, (६) रामदुर्गच्या राणीसाहेब, तसेंच सरदार बिवलकर, सरदार पाटणकर, सरदार आबासाहेब मुजुमदार, भोरचे युवराज, नागपूरचे श्रीमंत गणपतभय्या बुटी वगैरे बरीच मोठी मंडळी श्रींचे दर्शनास या महिन्यांत येऊन गेली.

हल्ली शिरडींत थंडी चांगलीच पडते. हवापाणी उत्तम आहे.

द. ब. राणे
स. चिटणीस

---

# बाबा ! अतुल आहे तुमचा प्रभाव

कु. मनोरमा कृ. मट

बाबा ! एकदां वाटतं, तुमचा प्रभाव पूर्णचंद्राच्या शीतल किरणांप्रमाणें आहे. पण छे ! पूर्णचंद्राच्या प्रकाशाला पौर्णिमा अमावास्येनुसार भरती ओहोटी असते. पण बाबा ! तुमचा प्रभाव काय असा कमी जास्त होणारा आहे !

✤

एकदां वाटतं, तुमच्या, प्रभावाची बरोबरी, साऱ्या सृष्टीला समृद्ध करणाऱ्या पावसाच्या टपोऱ्या थेंबांशीं करावी. पण छे ! त्याच पावसाच्या थेंबांचा अतिरेक झाला तर सारीच नासाडी होते. पण बाबा ! तुमच्या कृपेची कितीहि बरसात झाली तरी असा अनिष्ट परिणाम थोडाच होणार !

✤

एकदां वाटतं, तुमचा प्रभाव फुलाच्या दरवळणाऱ्या सौरभासारखा आहे. पण छे ! फूल कोमेजलं कीं त्याचा सुवासहि लुप्त होतो. बाबा ! आपण समाधि घेतलींत तरी आपला प्रभाव अमर आहे.

✤

एकदां वाटतं, तुमचा प्रभाव पावित्र्यानें भरलेल्या अन् मांगल्यानें प्रसन्न वाटणाऱ्या मंदिरांतील गाभाऱ्यांत शांतपणें तेवत असलेल्या नंदादीपासारखा आहे. पण छे ! नंदादीपालाहि वाऱ्याचें भय असतेंच पण, बाबा ! आपल्या प्रभावाला कोणाची भीति !

✤

पूर्णचंद्राच्या शीतल किरणांचा आल्हाददायक प्रकाश कोणाहि डोळस माणसाला बघतां येतो, पावसाच्या टपोऱ्या थेंबांचा आनंद कोणाहि डोळस माणसाला लुटतां येईल, फुलाच्या परिमलाचा आस्वाद कोणीहि घेईल, देवाला हात जोडणारा कोणीहि डोळस माणूस गाभाऱ्यांतला नंदादीप पाहूं शकेल. पण बाबा ! आपल्या कृपेला पात्र ठरलेला भक्तच आपला प्रभाव जाणू शकेल. आपल्या पायीं मन लीन असल्याशिवाय व चित्त एकाग्र झाल्याशिवाय आपल्या प्रभावाचें सुरम्य दर्शन कोणालाच घडणार नाहीं.

---

# स्फूर्तीच्या ठिणग्या

मला एका गोष्टीबद्दल मात्र कांहीं कानमंत्र सांगावासा वाटतो. हिंदुस्थानांतलीं दहा-पांच माणसें एकत्र होऊन कांहीं उद्योग करूं लागलीं म्हणजे जी एक चूक बहुधा नेहमीं करतात, ती चूक त्यांना शेवटीं गोत्यांत घालून कार्याचाहि फडशा पाडते. आमच्यांत अद्यापि खऱ्या व्यापारी तत्त्वाचा प्रवेशच झालेला नाहीं. धंदा म्हटला कीं तो धंदाच. तोच त्यावेळीं परमेश्वर. त्यांत स्नेहसंबंध आड येतां उपयोगी नाहीं. हें लक्षण आम्हां हिंदूंत अद्यापि आढळत नाहीं. 'हा माझा अमका; याची भीड कशी मोडावी? हे कोण बायकोचे साले। तुपावेगळा घांस न गिळे।' अशा प्रकारच्या भिडेचें दडपण एखाद्या उद्योगावर पडलें कीं त्याखालीं त्याचा सारा चुराडा होण्याला वेळ किती? असली भिकारी लाज प्रथम सोडून द्या. हिशेब नेहमीं चोख राखीत जा. आपल्या ताब्यांत जें कांहीं द्रव्य असेल त्याचा हिशोब पैपर्यंत बरोबर ठेवला पाहिजे. ज्या कार्यासाठीं जें द्रव्य जमा झालें त्याचा उपयोग त्याच कार्याला झाला पाहिजे. उपाशी मरण्याची वेळ आली तरी प्राणरक्षणार्थसुद्धां त्यांतील एक कवडीसुद्धां वेंचतां उपयोगी नाहीं. याला म्हणतात धंद्यांतला चोखपणा. हा आपल्या अंगीं केव्हां येणार? भीड तोडायला आम्ही केव्हां शिकणार! दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे चिकाटी. जी गोष्ट हातीं धरली तिला एकसारखें चिकटून राहावयाचें. ध्यानीं मनीं स्वप्नीं ती एकच गोष्ट ठेवून तिची अव्यभिचारी भक्ति करावयाची. अशी भक्ति असली तर यश तुमचेंच आहे हें काय निराळें सांगायला पाहिजे!

*    *    *

आपला उद्योग झटून करा; एका दिवसांत, एका महिन्यांत अथवा एका वर्षांतहि मोठी यशःप्राप्ति होते असें नाहीं. यासाठीं लवकर यशःप्राप्ति न झाली तरी हताश होऊं नये. त्याचप्रमाणें आपलें ध्येय सदोदित उच्च दर्जाचें असावें. त्या एकाच ध्येयास सदोदित चिकटून राहावें. तसेंच आपलपोटेपणा आणि मत्सर यांचा तर गंधहि आपल्या ठिकाणीं असूं देऊं नये. सत्यकार्याकरितां वाटेल तें सोसण्याची तुमची तयारी असली पाहिजे. तसेंच मनुष्यमात्राच्या आणि आपल्या देशाच्या कल्याणाकरतां अत्यंत एकनिष्ठपणें तुम्हीं उद्योग केला पाहिजे. इतकी तयारी असली तर एखादा देशच काय पण सारें जग तुम्ही हालवून सोडाल.

—श्रीस्वामी विवेकानंद

# श्रीसाई लीला 'त्रैमासिक' मिळण्याचीं ठिकाणें

(१) श्री. बाबुराव डी. वागधे,
चीफ एजंट, स्वदेश बिल्डिंग, गिरगांव नाका, मुंबई ४.

(२) श्री. बोधलेकर, दादर बी. बी. स्टेशन समोर, मुंबई.

(३) श्री. सावळाराम बंडू दांगट, बोरीबंदर, मुंबई.

(४) श्री. इ. आर. मालपेकर,
दागिन्यांचें दुकान, जितेकर चाळ, ठाकूरद्वार, मुंबई २.

(५) श्री भाऊ भोरोबा ढगे,
टोप्यांचे व्यापारी, ठाकुरद्वारमुंबई २.

(६) मेसर्स मनोहर बुक डेपो,
गोखले सोसायटी लेन, पोयबावडी, परेल, मुंबई १२.

(७) मेसर्स ठकार आणि कंपनी,
कोहिनूर सिनेमा समोर, रानडे रोड, दादर, मुंबई २८.

(८) .धी बॉम्बे बुक डेपो, गिरगांव. मुंबई ४,

(९) मेसर्स सारंग बुक डेपो.
मुनीम हाऊस, चिंचपोकळी, मुंबई १२.

(१०) मेसर्स दातार आणि पुरोहित,
वैद्यवाडा, बॉम्बे रोड, ठाणें.

(११) मेसर्स मंगला वस्तु भांडार,
अहिल्याबाई चौक, कल्याण.

(१२) पनवेल न्यूज पेपर स्टॉल, पनवेल

(१३) श्री. भाऊसाहेब लोंढर,
४०७/४०८ बुधवार पेठ, पुणें २.

(१४) श्री साईप्रसाद मिना फोटोचा कारखाना.
३३६, बुधवार पेठ, पुणें २.

(१५) नाडकर्णी आणि कं. ( स्पोर्टस् )
खेळाच्या वस्तूंचे व्यापारी, धोबीतलाव, मुंबई, २.

(१६) श्री बाबुराव अण्णाराव चौगुले,
२५२ ठळकवाडी, बेळगांव.

(१७) प्रेमळ विठ्ठल मंदिर, फणसवाडी, मुंबई २.

(१८) श्री वा. ह. शिंदे, रावते बि. १ ली भटवाडी.
गिरगांव. मुंबई ४. ( संस्थानची इतर पुस्तकेंही मिळतील. )

(१९) विजयकुमार परफ्यूमरी स्टोअर्स, कीर्तीकर मार्केट पहिली गल्ली,
दुकान नं. १८ दादर, मुंबई.

बाहेरगांवीं एजंट्स नेमणें आहे, तरी मुंबई ऑफिसच्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

श्री साईबाबा प्रसन्न

## नाडकर्णी आणि कंपनी ( स्पोर्टस् )

( स्थापना १८९६ )

महाराष्ट्रांतील सर्वांत पहिलें खेळांच्या वस्तूंचें दुकान

- भारतीय व परदेशी खेळाचें साहित्य या दुकानीं मिळतें.
- मुंबई राज्यांतील बहुतेक शाळा–कॉलेजांना, आम्हीं क्रीडा–साहित्य पुरवितों.
- या दुकानांत खरेदी म्हणजे उत्कृष्ट माल आणि एकंदरींत पैशाची बचत, यांची ग्वाही.
- मालाच्या किंमतींचा कॅटलॉग ( घाऊक व किरकोळ ) मागणी केल्यास पाठविला जाईल.

आल्हा चेंबर्स
धोबी तलाव, मुंबई २

टेलि. नं. २३०८१

## ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

३६३, मंगळदास मार्केट समोर, मुंबई नं. २

❀ होजियरी ❀ तयार कपडे ❀ फर्निशिंग फॅब्रि...

व इतर सर्व तऱ्हेच्या कापडाचे व्यापारी

रिटेलर्स व होलसेलर्स

टे. नं. २२८४४

॥ श्री साईबाबा प्रसन्न ॥

## स्थावर मिळकत

आम्हीं बरीच वर्षे मोठमोठ्या व्यापारी व इतर नामांकित जमिनदार लोकांत इस्टेट एजंटचें काम करीत असून आमच्यामार्फत मुंबई ( उपनगरांत ) पुणें, ठाणें इ. प्रसिद्ध ठिकाणीं लहान–मोठ्या मिळकतीची (प्रॉपर्टीज्) खरेदी–विक्री चालू असते.

अंदाजें किती किंमतीची व कोणत्या विवक्षित ठिकाणीं मिळकत खरेदी–विक्री करण्याचे योजिलें आहे ( हें कळणें अत्यंत महत्त्वाचें आहे ) हें कृपा करून फक्त पोस्ट कार्ड लिहून कळविल्यास तात्काळ खुलासा होईल.

पत्रव्यवहाराचा पत्ता : रामभाऊ जोशी,
फायनान्स ॲन्ड एस्टेट एजंटस् पोस्ट–विरार, (जि.)